# खरे दहशतवादी कोण?

डॉ. सुलभा ब्रह्मे

# प्रस्तावना

२४ डिसेंबर १९९९ – इंडियन एअरलाइन्सच्या विमानाचे अपहरण करून ते कंदाहारला उतरवून, उडवून देण्याची धमकी!

११ सप्टेंबर २००१ – न्यूया्ॅर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर विमाने आदळवून दोन्ही मनोरे भुईसपाट!

१३ डिसेंबर २००१ – भारतीय संसदेवर दहशतवादी हल्ला!

६ ऑगस्ट २००२ – अमरनाथ यात्रेकरुंवर बेछूट गोळीबार!

७ जुलै २००५ – लंडनमधील भुयारी रेल्वे व बसमध्ये साखळी बॉम्बस्फोट!

११ जुलै २००६ – मुंबईमध्ये सात लोकलगाड्यांमध्ये साखली बॉम्बस्फोट!

८ सप्टेंबर २००६ – मालेगावमध्ये मशिदीजवळ तीन बॉम्बस्फोट!

या आणि अशा अनेक बातम्या भारतातून आणि अन्य देशांमधून रोज थडकत असतात. यावरून असे वाटते, की दहशतवादी हल्ले म्हणजे काही व्यक्तींचा किंवा गटाचा निरपराध नागरिकांवर विशिष्ट मागणी पुरी करून घेण्यासाठी किंवा केवळ दहशत निर्माण करावी या हेतूने केलेला हल्ला. त्यामध्ये हल्लेखोर प्राणावर उदार झालेले असतात व अनेकदा प्राण गमावतातही. थोडक्यात "ईप्सित' साधण्यासाठी प्राणत्याग किंवा आत्मघातही ते करतात.

इंडियन एअरलाईन्सच्या विमानाचे अपहरण करून तुरुंगात असलेल्या दहशतवादी गटातील पुढाऱ्यांच्या सुटकेची मागणी करण्यात आली, ती पुरी करेपर्यंत दबावासाठी काही प्रवाशांची मुद्दाम निर्घृण हत्या करण्यात आली आणि मागण्या पुऱ्या झाल्यावर प्रवासी व विमानाची सुटका झाली.

११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेमधील हल्ल्याची जबाबदारी कोणी घेतली नाही व तो हल्ला कोणी केला याबाबतचे वास्तव कधी पुढे आले नाही. पण त्या हल्ल्यानंतर प्रेसिडेंट बुशने दहशतवादाचा बिमोड करण्याचा विडा उचलल्याचे जाहीर केले. एवढेच नव्हे तर जे आमच्याबरोबर दहशतवादाविरोधीच्या लढ्यात उतरणार नाहीत ते सारे दहशतवादी ठरवून अमेरिकेने आपली लक्ष्ये पुकारली. ओसामा बिन लादेन, तालिबान, सद्दाम हूसेन, इराक, इराण, उत्तर कोरिया----- अमेरिकेच्या हितसंबंधांनुसार ही यादी वाढतच जाणार आहे! जणू काही अमेरिका जगाची सम्राट आहे व अमेरिकेचे मांडलिकत्व न पत्करणाऱ्या कोणाही नेत्याला सत्तास्थानी राहाता येणार नाही, अशा मग्रुरीत अमेरिका धमकावण्या देत आहे. या धमक्यांपाठोपाठ ७ ऑक्टोबरला अमेरिकेने अफगाणिस्तानवर बाँब व रॉकेटचा तुफान माराही सुरू केला.

राज्यकर्त्यांच्या अशा दहशतवादी हल्ल्यांना राज्यकर्ते अर्थातच "कायदा व सुव्यवस्था' राखणे,

"लोकशाही व स्वातंत्र्याचे रक्षण', "मानवी हक्कांचे रक्षण', अशी गोंडस बिरुदे देऊन आपल्या दहशतवादी कारवायांचे समर्थन करतात. भारत सरकार जेव्हा कायदा–सुव्यवस्थेबद्दल बोलते तेव्हा त्यात अनुस्यूत असते जमिनीसाठी झगडणाऱ्या कुळांना गप्प करण्यासाठी पोटा कायद्याखाली अटक, छळवणूक, चकमकीत हत्या अशी बेमुर्वत शासकीय जुलूम–जबरदस्ती. अमेरिकन राज्यकर्ते जेव्हा स्वातंत्र्याच्या रक्षणाच्या गप्पा मारतात तेव्हा त्यांना अभिप्रेत असते बहूराष्ट्रीय कंपन्यांचे विकसनशील देशांतील निसर्गसंपत्तीची व जनतेची बेगुमान लूट करण्याचे स्वातंत्र्य (!) काश्मीरमध्ये एका अमेरिकन वार्ताहराचे अपहरण होऊन हत्येची धमकी दिली जाते तेव्हा "मानवी हक्का'साठी अमेरिका आकाशपाताळ एक करते पण गुजरातमध्ये भाजप शासन कट रचून हजारो मुस्लिमांची हत्या करते तेव्हा अमेरिकेला ती "मानवी हक्काची' पायमल्ली वाटत नाही. थोडक्यात संपत्तीधारी, सत्ताधारी, गौरवर्णीय, उच्चवर्णीय आदींवर हल्ला झाला तर तो दहशतवाद, परंतु दलित, स्त्रिया, मुस्लिम आदींचे मानवी हक्क पाायदळी तुडवायला शासनकर्ते मोकळे! आपण कोणत्या बाजूने उभे आहोत यावरून "दहशतवादी' कोण हे ठरवले जाते. तुम्ही ब्रिटिश राज्यकर्ते असाल तर भगतसिंगने केलेला बॉंबस्फोट ही दहशतवादी कृती ठरते. व भगतसिंग राज्यद्रोही ठरतो. पण तुम्ही भारतीय नागरिक असाल तर तुमच्या दृष्टीने भगतसिंग हा स्वातंत्र्यासाठी बलिदान करणारा क्रांतिकारक असतो.

थोडक्यात, दहशतवादाचा वरवर भासतो तसा साधा–सरळ अर्थ लावता येत नाही. आपली सत्ता टिकवण्यासाठी सत्ताधारी करीत असलेल्या जुलूमजबरदस्ती–दडपशाहीमुळे जनआंदोलने उभी राहातात. माणसांची सामंत व गुुलाम, जमीनदार व भूदास, भांडवलदार व कामगार अशी जातवारी लावून गुलामांना बळजबरीने राबवून सामंतांनी ऐषारामी भोगविलासी जीवन जगायचे! जगातल्या २२५ सर्वात धनाढ्यांनी जगातल्या ४७% श्रमिकांच्या उत्पन्नाएवढी संपत्ती आपल्या हाती एकवटायची! मग न्यायासाठी श्रमिक लढा का उभा करणार नाहीत ?

या समस्येची गुंतागुंत लक्षात घेता दहशतवादाचे विविध पैलू स्पष्ट होण्यासाठी यासंबंधातील तीन/चार कळीची प्रकरणे उदाहरणादाखल पुस्तिकेमध्ये चर्चेस घेतली आहेत. प्रथम अमेरिकेने साऱ्या जगभर जरब–दहशत बसवण्यासाठी अलिकडे केलेली कारवाई – अफगाणिस्तानवरील हल्ले – त्याचा इतिहास व कारणमीमांसा तपशिलात दिली आहे. दहशतवादाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे साम्राज्यशाही देशांनी जगभर मुक्तपणे आर्थिक लूट करण्यासाठी कळीच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा ताबा ठेवण्यासाठी चालवलेली दादागिरी. तेल ही गेल्या शतकापासून सर्वात मौल्यवान निसर्गसंपत्ती बनली आहे आणि ती आखाती देशात केंद्रित आहे. तेव्हा आखाती देशांवरील वर्चस्वासाठी दहशतवादी कारवायांचा अमेरिका–इंग्लंड तीन प्रकारे वापर करून आहेत. एक, आखाती मुलुखावर पकड ठेवण्यासाठी बळजबरीने इस्त्राएलची निर्मिती, दुसरे,

अमर्याद सत्ता हाती असलेल्या जुलमी दहशतवादी शेख–अमीरशाह्या उचलून धरून आपले वर्चस्व कायम ठेवणे व तिसरे, इराण–इराकसारख्या देशांनी अमेरिकेचे वर्चस्व झुगारले तर युद्धे, आर्थिक नाकेबंदी अशा दहशतवादी मार्गांनी त्यांना टाचेखाली ठेवण्याचा प्रयत्न. अरब भूमीत इस्त्राएलला घुसवणे, त्यानंतरची इस्त्राएलची अतिक्रमणे आणि सततचे दहशतवादी हल्ले यांच्या वि ेषणावरून अमेरिका-इंग्लंडच्या तेलाच्या अर्थ–राजकारणाचे दहशतवादी स्वरूप स्पष्ट होते.

अफगाणिस्तान व अरब देशांवर पकड ठेवण्यासाठी अमेरिका एका बाजूला बळाचा, तर दुसरीकडे धार्मिक मूलतत्ववादाचा अत्यंत दुष्ट पद्धतीने वापर करत आहे. परंतु प्रसार असा केला जातो की इस्लाम धर्मच मूलतत्ववादी आहे आणि त्याचा धोका अमेरिकेला आहे. वास्तविक अमेरिकेनेच इस्लाममधील प्रतिगामी शक्तींना बुद्ध्या उचलून धरून धर्माचा असुरी पद्धतीने वापर चालवलेला आहे. अगदी वेगळ्या आर्थिक –सामाजिक परिस्थितीत– समाजसत्तावादी अर्थसमाज व्यवस्थेत – सोविएत युनियनमधील इस्लामिक प्रजासत्ताकांमध्ये इस्लामचे स्थान कसे बदलले याचा आढावा आपणास हेच दाखवतो, की कोणत्याही धर्मात लवचिकता आहे. परंतु त्याचा जर मूलतत्ववादी पद्धतीने वापर करायचा ठरवला तर त्यातून "तालिबान' उभा राहातो. किंवा विश्व हिंदू परिषद, बजरंग दल उभे राहातात. साम्राज्यशाही देश व त्यांचे अंकित पाकिस्तान, भारत आदी देशांतील राज्यकर्ते आपली अनियंत्रित सत्ता व मत्ता टिकवण्यासाठी वाढती गरिबी व बेकारीमुळे वैफल्यग्रस्त बनलेल्या तरूणांना पैसा व धर्मवेडाची अफू चढवून दहशतवादी गटात ढकलत आहेत व त्यातून जनतेमध्ये फाटाफूट व जनतेचा बुद्धीभेद करीत आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय उपखंडातील साम्राज्यशाही पिळवणूक, वाढता जमातवाद व धार्मिक मूलतत्ववाद आणि दहशतवाद हातात हात घालून कसे आगेकूच करीत आहेत आणि त्यामध्ये सामान्य कष्टकरी जनता कशी उद््ध्वस्त होत आहे याचा धावता परामर्श घेऊन आजच्या आव्हानांना आपण भारतीय कसे सामोरे जाऊ शकतो याचे थोडक्यात विवेचन केले आहे.

भारतातील तरुण पिढीला साम्राज्यवाद, धार्मिक मूलतत्ववाद व दहशतवाद यांच्याशी मुकाबला करायचा तर त्यामागचे गुंतागुंतीचे वास्तव समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने एक मर्यादित प्रयत्न येथे केला आहे.

वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया, आशंका, सूचना अवश्य कळवाव्यात आणि लोकशाही हक्क रक्षणासाठीच्या आंदोलनातील सक्रीय सहभागासाठी अवश्य संपर्क साधावा.

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय सुलभा ब्रह्मे
१२९ ब/२, एरंडवणे, पुणे – ४.

## दोन शब्द

""*दहशतवाद हे दुबळ्यांचे अस्त्र आहे अशी मांडणी ही गंभीर वि ेषणात्मक गफलत आहे. जुलूमजबरदस्तीच्या इतर हत्यारांप्रमाणे दहशतवाद हे बलिष्ठांचे अस्त्र आहे. ते "आपल्या'विरुद्धचे हत्यार आहे. (जे कोणी "आपण' असू ते)''* – नोम चोमस्की, अमेरिकन विचारवंत.

– पोलीस, सुरक्षा दले, लष्कर, मिसा, टाडा, पोटा असे काळे कायदे, तुरुंग, छळछावण्या, गुप्तहेर संघटना ही जुलूमजबरदस्तीची हत्यारे राज्यकत्र्यांयच्या हाती असतात आणि लोकांचे जगण्याच्या हक्कासाठी लढे, न्यायासाठी लढे, स्वातंत्र्यासाठी लढे चिरडण्याकरता सत्ताधारी या जुलूमजबरदस्तीच्या हत्यारांचा बेगुमान वापर करतात.

– आणि पददलित, शोषित यांच्या हातात काय असते?

– न्यायासाठी, स्वातंत्र्यासाठी, ताठ मानेने लढा देत आत्मबलिदान!

– मानवी हक्क, मानवी जीवन यासाठी लढा देत ते शहीद बनतात!

– जनता ती मशाल हाती घेऊन लढा पुढे चालू ठेवते!

– स्पार्ताकस, खोसे मार्ती, भगतसिंग, चे गेवारा....

– एक – दोन – शंभर – हजार – लाख – कोटीकोटी क्रांतिवीरांची – स्वातंत्र्यवीरांची निर्घृण हत्या राज्यकर्ते करत असतात

– जनतेचे शोषण आणि निसर्गाची लूट करून आपल्या तुंबड्या भरण्यासाठी राज्यकर्ते बेछूट हूकूमशाही गाजवतात!

– दहशवादी कारवाया करून हजारो असहाय्य स्त्रिया–मुले यांचाही बळी घेतात!

– तालिबानला सत्ताभ्रष्ट करण्यासाठी पाकिस्तानमार्फत अमेरिका तालिबानला देत असलेली शस्त्रास्त्रे व इतर मदत थांबवून तेथील जनतेच्या आर्थिक पुनर्वसनासाठी युनोमार्फत मदत करण्याऐवजी ७ ऑक्टोबर २००१ ला ओसामा बिन लादेनला पकडण्याची सबब पुढे करून अफगाणिस्तानवर अमेरिकेने सुरू केलेले बेफाम हल्ले त्याच परंपरेतील आहेत.

– २८ फेब्रुवारी २००२ पासून भारतात गुजरातमध्ये शासनाच्या पाठिंब्याने अल्पसंख्याकांचे हत्याकांड घडवण्यात आले तेही त्याच परंपरेतील. भारतीय नागरिकांचे लोकशाही हक्क व भारतीय घटनाच त्यामुळे धोक्यात आली.

शासन व प्रचारमाध्यमे दहशतवादाचे वास्तव स्वरूप दडवून ठेवून व्यक्तिगत किंवा गटांच्या अतिरेकी करावाया म्हणजेच दहशतवाद अशी दिशाभूलजनक कल्पना जनमानसात बिंबवतात. या मिथ्या कथेचे

पितळ उघड पाडून खरे दहशतवादी कोण याचे विवरण करणे, राज्यकर्त्यांच्या दहशतवादी हल्ल्याचे धोके समजून घेणे आणि असे हल्ले रोखण्यासाठी काय करावे याचा विचार करणे अगत्याचे आहे. त्यासाठी ही पुस्तिका.

# १. दहशतवादी नं. १ – अमेरिका

११ सप्टेंबर २००१ : ११ सप्टेंबर २००१ रोजी सकाळी न्यूया्ॅर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दोन जुळ्या उत्तुंग मनोऱ्यांवर अध्र्या तासाच्या अंतराने अपहरण केलेली दोन अमेरिकन जेट विमाने सफाईने आदळवून या गगनचुंबी इमारती जमीनदोस्त केल्या गेल्या. त्याचवेळी वॉशिंग्टनमध्ये पेंटॅगॉनवर आत्मघातकी विमानहल्ला झाला. अमेरिकेची संपत्ती व लष्करी शक्तीच्या मानबिंदूंवर हा आघात होता. या घटनेबाबत अमेरिकेत अनेक प्रतिक्रिया उमटल्या. त्यापैकी एक पुढे उधृत केली आहे.

अध्यक्ष महाराज खरे सांगा : ११ सप्टेंबर २००१ रोजीच्या हल्ल्यानंतर अमेरिकेतील "स्पेस ॲण्ड सिक्युरिटीज स्टडीज'या प्रकल्पांचे अध्यक्ष डॉ. रॉबर्ट बोमन अमेरिकन अध्यक्षांना आवाहन करतात की ""अध्यक्षमहाराज खरे सांगा.'' डॉ. बोमन म्हणतात ""काही वर्षांपूर्वी अतिरेक्यांनी दोन देशांतील अमेरिकन वकिलाती उद्‌ध्वस्त केल्या. तेव्हा अध्यक्ष क्लिंटन यांनी लादेनच्या तळावर रॉकेट हल्ले चढवले. त्यावेळी बिल क्लिंटन टीव्हीवरील भाषणात म्हणाले, "आपण अमेरिकी नागरिक "स्वातंत्र्य', "लोकशाही', आणि "मानवाधिकार' या मूल्यांचे रक्षण करतो, जगभर त्याचा पाठपुरावा करतो म्हणून आपला देश अतिरेक्यांच्या हल्ल्याचे लक्ष्य बनला आहे.''

""अध्यक्ष महाराज या अतिरेकी हल्ल्यांमागचे सत्य कारण तुम्ही जनतेस सांगितलेच नाही. आपण लोकशाही, स्वातंत्र्य व मानवतावाद यांचे भोक्ते असल्यामुळे आपल्यावर अतिरेक्यांचे हल्ले होतात, असे तुम्ही सांगितलेत.

काय हे सत्य आहे?

नाही!''

""अमेरिका ही अतिरेकी हल्ल्याचे लक्ष्य ठरली आहे आणि ठरत राहणार आहे. कारण जगभरात आपण हूकूमशाही, दडपशाही, पिळवणूक यास सक्रीय साथ देत आलो आहोत. आपल्या सरकारांनी घृणास्पद कृत्ये केली आहेत. कित्येक देशांत निवडून आलेल्या लोकप्रिय नेत्यांचा पाडाव घडवून आणून गुप्तचर यंत्रणेने (सीआयए) त्या जागी असे हूकूमशहा गादीवर बसवले, की जे आपल्या हातचे बाहूले बनून राहतील. असे नेते आपण निवडलेत, की जे अमेरिकन बहूराष्ट्रीय कंपन्यांना त्यांच्या देशातील नैसर्गिक संपत्तीची निर्वेध लुटमार करू देतील. अशी किती उदाहरणे सांगावीत!

चिलेमध्ये निवडून आलेले अध्यक्ष आयेंदे यांच्या जागी क्रूर लष्करी हूकूमशहा विनोचे यांना सी.आय.ए.ने गादीवर बसवले. आजही चिलेची अवस्था सुधारलेली नाही.

इराकवरील हल्ल्यात अडीच लाख लोक मारूनही आपण सद्दाम हूसेनना हटवू शकलो नाही. त्यानंतरही

दहा लाख लोक मरण पावले असावेत. त्यात अर्धेअधिक बळी पाच वर्षांखालील मुलांचे होते.

निकारागुवा व इतर लॅटिन अमेरिकन देशांत असंख्य वेळा आपण हेच प्रकार केले आहेत. तेथील लोकभिमुख नेत्यांना स्वदेशातील खनिज संपत्तीचा लाभ स्वदेशीयांना मिळावा असे वाटू लागताच आपण त्यांच्या जागी चरित्रहीन, क्रूर हूकूमशहा आणून बसविले; ज्यांनी अमेरिकन कंपन्या – डॉमिनोशुगर, युनायटेड फ्रुट कंपनी, फोलगर्स व चिक्कीटा बनाना यांना मुक्त संचार करू दिला. अशा एकामागोमाग एक देशात आपण लोकशाहीचा गळा घोटला आहे. मानवी हक्कांची चेष्टा केली आहे. व्यक्तिस्वातंत्र्य पायदळी तुडवणाऱ्यांना सक्रीय मदत केली आहे आणि म्हणून कित्येक देशांत अमेरिकेबद्दल द्वेष फैलावला आहे आणि म्हणून अमेरिका अतिरेकी हल्ल्याचे लक्ष्य नं.१ ठरली आहे.''

""लादेन हवा – मृत किंवा जिवंत'' : अमेरिकेतील अनेक विचारवंत, लेखक, पत्रकार, आदींना अमेरिकेवर हल्ला झाला यामागे अमेरिकेच्या दहशतवादी कारवाया आहेत व अमेरिकेने त्या थांबवल्या पाहिजेत असे वाटते. अमेरिकन सत्ताधीश मात्र विचार करायला तयार नाहीत. ११ सप्टेंबरचा हल्ला कसा आणि कोणी केला याचे उत्तर तयारच होते. अफगाणिस्तानमधील तालिबान राज्यकर्त्यांयचा पोशिंदा ओसामा बिन लादेन हा या कटाचा म्होरक्या ठरविण्यात आला. त्याचे अरब साथी– त्यांची नावे व कल्पित छायाचित्रेही प्रसिद्ध झाली. जॉर्ज बुशने हट्ट धरला, "मला लादेन हवा : मृत वा जिवंत. आमच्याबरोबर येतील ते स्वातंत्र्य व संस्कृतीप्रेमी आणि विरोध करतील ते दहशतवादी', अफगाणिस्तानचे सत्ताधारी तालिबानला हूकूम सुटला की, "ओसामाला ताब्यात द्या.' तालिबानने सुचवले, "गुन्हाचा पुरावा सादर केला तर तटस्थ राष्ट्राकडे ओसामाला सोपवू.' सम्राट बुश खवळले, "पुरावा मागता? ओसामाला संरक्षण देता, याद राखा.'' युद्धाच्या धमकावण्या सुरू झाल्या आणि ७ ऑक्टोबरला काबूलवर तुफानी बॉम्बफेक व क्षेपणास्त्रांचा मारा अमेरिकेने सुरू केला.

वर्ल्ड ट्रेड सेंटरवर कोणी हल्ला केला, याबाबत कोणताही ठोस पुरावा हाती नसताना अफगाणांची कत्तल, त्यांच्या शहरा–घरांचा विध्वंस आणि लाखोंना शेतीवाडीवरून उठवून निर्वासित बनवण्याची क्रूर कारवाई अमेरिका करू लागली. त्याला इंग्लंड व भारतीय राज्यकर्त्यांयनी जोरदार पाठिंबा दिला. युरोपीय देश, रशिया, जपान, तुर्कस्तान, सोविएत आशियाई प्रजासत्ताके यांनी कारवाईला मदत केली, तर बुशच्या हूकमाखाली पाकिस्तान या कारवाईत सामील झाले. या अमानुष हल्ल्यांना मुस्लिम जगतात मोठा विरोध झाला. युरोपात जोरदार विरोधी निदर्शने झाली. अमेरिकेतही विरोध व्यक्त झाला. पण अमेरिकेचे अफगाणिस्तानवरील दहशतवादी हल्ले थोपवण्यास जगातील जनता असमर्थ आहे.

""युद्ध नको, न्याय हवा'' : युरोपमध्ये सप्टेंबरअखेर आणि अमेरिकेत व युरोपात अमेरिकेचे अफगाणिस्तानवर बॉंबहल्ले सुरू झाल्यावर ७ ते १४ ऑक्टोबर २००१ च्या दरम्यान ""युद्ध नको, सूड

नको, न्याय हवा'' अशा घो◌ेषणा देत सुमारे ४० देशात शांतता चळवळींच्या पुढाकाराने जोरदार मोर्चे–निदर्शने झाली. ७ ऑक्टोबरला न्यूया◌ॅर्कमध्ये १०० संघटनांनी टाईम स्क्वेअरमध्ये आयोजित केलेल्या निषेध मोर्चात १०,००० वर निदर्शक सामील होते. अशीच निदर्शने वॉशिंग्टन, बर्कले, बॉस्टन, मॅडीसन, इ. शहरांत झाली. पीटस्बर्ग येथे तर निदर्शकांची संख्या २५००० वर होती. लंडनमध्ये १३ ऑक्टोबरला संघटित के◌े$लेल्या मोर्चात आशियाई, मध्यमवर्गीय, कामगार आदी ५०,००० वर निदर्शक होते. त्यामध्ये तरुणांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. बर्लिनमध्ये शांतता संघटना, ट्रेड युनियन्स व डावे राजकीय पक्ष यांनी आयोजित केलल्या मोर्चात ३०,००० तरुण व मध्यवयीन सहभागी झाले. टोरोंटो (कॅनडा), स्टुटगार्ट, जिनेव्हा, बर्न (स्विट्झर्लंड), बुडापेस्ट, ॲमस्टरडॅम, ॲथेन्स, बार्सेलोना व नेदरलँड, ग्रीस, स्पेनमधील अन्य शहरे, ऑस्ट्रिया, बेल्जियम आदी देशात जोरदार निदर्शने झाली. इटलीमध्ये तर १४ ऑक्टोबरला पेरूगियापासून असिसीपर्यंत शांतता "मार्च' काढण्यात आला. त्यात दोन लाखाहून अधिक निदर्शकांनी भाग घेतला. भारतामध्ये नवी दिल्ली, कोलकता, धनबाद, डेहराडून, इटावा, रोहतक, कर्नाल, पानिपत, हिसार आदी ठिकाणी युद्धविरोधी व न्यायाची मागणी घेऊन निदर्शने झाली.

अमेरिकेतील शांतता आंदोलनाच्या मागण्या : १५ सप्टेंबर : मॅनहटन (न्यूया◌ॅर्क) : न्यूया◌ॅर्क ग्रीनस्, वॉर रेझिस्टर्स लीग, आर्टिस्ट नेटवर्क, फोरम ऑफ इंडियन लेफ्टिस्ट, अर्मेनियन सिस्टर्स, टॅक्सी वर्कर्स अलायन्स --- अशा ७५ संघटनांच्या प्रतिनिधींच्या सभेमध्ये बरीच चर्चा होऊन पुढील भूमिका मान्य झाली.

१) ११ सप्टेंबरचा हल्ला व त्यामध्ये झालेली हजारोंची हत्या याचा तीव्र निषेध.

२) ११ सप्टेंबरचा हल्ला प्रवृत्त करण्यास अमेरिकेचे गेल्या ५० वर्षांतील अमानुष हल्ले व कारवाया जबाबदार आहेत: (अ) १९५४ : अमेरिकेने ग्वतेमालात सत्तेवर बसवलेल्या हूकुमशहाने हजारो शेतकऱ्यांची हत्या केली. (आ) १९६५ : डोमिनिकन रिपब्लिकमध्ये ३००० लोकांची हत्या केली. (इ) १९७३ : चिलेमध्ये सी.आय.ए.च्या कटाखाली सत्तांतर घडवले त्यामध्ये ३०००० मृत्यूमुखी (ई) १९६५–७५ : १० लाखावर इंडोनेशियन व पूर्व>तिमूरचे नागरिक ठार केले. (उ) १९८० : निकरागुआत ३०००० नागरिक ठार केले. (ऊ) पनामा, अंगोला, एल्. साल्वादोर, कंपूचिया, लीबिया, लेबानन, सुदान, पॅलेस्टाईन, युगोस्लाव्हियामध्ये हजारो ठार (ए) १९९१ : इराकवरील हल्ल्यात दोन लाख ठार व आर्थिक बंधनाखाली १० लाख यमसदनी पाठवले.

३) ११ सप्टेंबरच्या हल्ल्याला युद्ध करून प्रतिहल्ला करणे हे उत्तर नाही. दहशतीचे हे दुष्टचक्र तोडले पाहिजे.

४) दहशतवादाच्या नावाखाली नागरी स्वातंत्र्यावर घाला घालता कामा नये.

५) जगभरच्या जनतेला न्याय दिला तरच जागतिक शांतता प्रस्थापित करता येईल.

६) मुस्लिम, अरब स्थलांतरितांबाबत अमेरिकेत वाढत असलेला दूषित पूर्वग्रह थोपवणे.

विविध विद्यापीठांमधून युद्धविरोधी विचार-मंच (ढशरलह-ळ) संघटित झाले. अर्थात इलेक्ट्रॉनिक प्रसारयंत्रणेने या युद्धविरोधी आंदोलनांना फारसे स्थान दिले नाही. बुशच्या हातात हात घालून युद्ध व बदल्याचा उद्घोष बी.बी.सी. व सी.एन्.एन्. करीत राहिले. तरीही युदधविरोधी शांतता संघटना चिकाटीने आपल्या मागण्या विशेषत: आर्थिक-राजकीय पातळीवर न्याय देण्याची निकड जोराने मांडत राहिल्या.

ज्वालामुखीवरचे नंदनवन : अमेरिकनांप्रमाणे ११ सप्टेंबर व नंतरच्या घटनांमुळे अमेरिकेतील अनिवासी भारतीयही विचार करू लागले. अमेरिका म्हणजे स्वातंत्र्य व संधी – दक्षिण भारतातील ब्रा÷णद्वेष, शीख, मुस्लिमांवर धर्माच्या नावाने लादली जाणारी कर्मठ बंधने, भ्रष्टाचार व वशिलेबाजी यामुळे संधीची होणारी मुस्कटदाबी या साऱ्यातून "मुक्तता' आणि बहूराष्ट्रीय समाजात व्यक्तिगत उन्नतीला अमर्याद वाव असे मानून अमेरिकेत स्थलांतरीत झालेल्या भारतीय शिक्षित वर्गातील संवेदनशील भारतीयांना आता स्पष्ट दिसू लागले आहे की स्वातंत्र्य व लोकशाहीच्या नावाने अमेरिका करीत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे ज्वालामुखी बनलेल्या, न्यायासाठी आसुसलेल्या जगताच्या डोक्यावर हे तथाकथित नंदनवन उभे आहे. जगभरची जनता – पॅलेस्टाईन – इराक – सुदान – निकरागुआ – कूबा – चिले – इराण – या "स्वतंत्र' जगातल्या नंदनवनातील सुखसमृद्धीपासून वंचित अशी सर्व जनता – सर्व तऱ्हेच्या अन्याय आणि हालअपेष्टांच्या नरकात दशकानुदशके खितपत पडलेली जनता – या जनतेस ११ सप्टेंबरला शहेनशहा अमेरिकेवर झालेला हल्ला "न्यायाची' आशा (देवाने न्याय दिला असेही अनेक श्रद्धाळूंनी म्हटले) पल्लवीत करणारा ठरला. अमेरिकेत "सुखाने' राहाणाऱ्या देशी-परदेशी जागरूक नागरिकांना अमेरिकेने आजवर केलेल्या राक्षसी अत्याचार-अन्यायांबाबत विचार करायला लावणारा ठरला.

मात्र अमेरिकेतील सामान्य जनमत युद्धखोरी उचलून धरत आहे असे चित्र मीडियाने उभे केले. पण प्रा. नोम चोम्स्कीने म्हणतात, की त्याबाबत नि:संदिग्ध मतचाचणी केली गेली नाही. "प्रत्युत्तर द्यावे काय' याचे उत्तर "होय'असे आले, तरी प्रत्युत्तर म्हणजे अफगाणिस्तानवर लष्करी हल्ला असे स्पष्ट केले तर सहमती बऱ्याच प्रमाणात कमी होते. अमेरिका लक्ष्य बनवत असलेला लादेन हा तर अमेरिकेनेच निर्माण केलेला दहशतवादी आहे हे वास्तवही गुलदस्त्यात ठेवून प्रसारमाध्यमे दिशाभूल करत राहिली.

वंशाचा एक्का : अमेरिकेने लादेनला दहशतवादी ठरवले त्याबाबत न्यूया्ॅर्कमधील एक बोलपट निर्माते लिहितात – ""मी कसा विश्वास ठेवणार की, वाळवंटामध्ये तंबूत झोपणारा (ओसामा बिन लादेन) अत्याधुनिक जंबो जेट्स चालवण्याचे एवढे उत्कृष्ठ प्रशिक्षण देऊ शकतो की, आपल्या तीन लक्ष्यांवर ते अचूक हल्ले करतात. पाठोपाठ चार विमानांनी आपले नियत मार्ग का बदलले आहेत, अशी कोणाला शंकाही

येत नाही.

आपण निकरागुवामध्ये ऐंशीच्या दशकात पैसे देऊन दहशतवादी तयार केले, त्यांना शिक्षण दिले आणि शस्त्रे दिली. त्यांनी ३०००० वर नागरिक ठार केले. ती आपली "कर्तबगारी' होती! तुम्ही आणि मी, ३०००० निरपराध नागरिकांना ठार केले, पण हे लक्षात कोण ठेवणार? आपण पुष्कळशा जुलुमी राजवटीना पैसा देतो, या राजवटी हजारो निरपराध नागरिकांना ठार करतात. परंतु हे अपरिमित मानवी दु:ख आपल्या रोजच्या जीवनात क्षणभरसुद्धा आ ापल्याला व्यथित करीत नाही. आपल्या कराच्या पैशातून आपण चिले, विएतनाम, गाझा, साल्वादोर... येथे दहशतवाद माजवण्यासाठी पैसा ओतला. जगभर हजारोंच्या संख्येने मुलांना अनाथ बनवले. जेव्हा ही अनाथ मुले मोठी होतील आणि आपल्या मदतीने पोसलेल्या दहशतवादाच्या भीषणतेची त्यांना जाणीव होईल....

परंतु अलिकडे झालेले दहशतवादी हल्ले वाळवंटातल्या बेटयांनी केलेले नाहीत, ते आपल्याच नागरिकांनी केले आहेत. आपल्या शासनाचा द्वेष करणारे निवृत्त लष्करी बेटे..... परंतु या शक्यतेबाबत एक अवाक्षरही कोणी काढले नाही. असे का? कारण अरब हे कितीतरी अधिक चांगले लक्ष्य आहे. अमेरिकेला नव्या शत्रूविषयी द्वेषाने तापवण्यासाठी वंशाचा एक्का चपखल बसतो. जे आपल्यासारखे दिसत नाहीत, त्यांच्याबाबत द्वेष तापवणे फार सोपे!

लादेन – सी.आय.ए. चा हस्तक : ११ सप्टेंबरचा नायक म्हणून अमेरिका गाजावाजा करीत असलेला ओसामा बिन लादेन आणि तालिबान खरेतर सी.आय.ए.च्या भट्टीत तयार झालेले आहेत. ओसामा बिन लादेन हा मूळचा सौदी अरेबियाच्या दक्षिणेकडील येमेन या अरब राष्ट्रातला. ओसामाचे वडील बडे बांधकाम व्यावसायिक. सौदी अरेबियात मक्का–मदिना येथील विकास प्रकल्पात खोऱ्याने पैसा मिळवलेले अब्जाधीश. सौदी शेखशी निकटचे संबंध असलेल्या प्रतिष्ठित कुटुंबातील पदवीधर ओसामा – महात्वाकांक्षी, हिकमती व चलाख. मुस्लिम मूलतत्ववादी–वहाबी पंथाचा अनुयायी. अफगाणिस्तानमधील प्रागतिक शासन उलथवून टाकण्याचा अमेरिकेने निर्णय घेतल्यावर या कामगिरीवर म्होरक्या म्हणून शेख घराण्यातल्या कर्तबगार तरुणाच्या शोधात सी.आय.ए. होते. पण शेखपुत्र अशा धोक्याच्या कामगिरीसाठी कसे तयार होणार? पण मूलतत्ववादी ओसामा सी.आय.ए.ला सामील झाला व सोविएत युनियनची सेना माघार घेईतो (१९८९) तो सी.आय.ए.च्या सोविएतविरोधी कटाचा सूत्रधार होता. १९९१ साली अमेरिकेने इराकवर हल्ले करण्यासाठी सौदी अरेबियाच्या शेखच्या सहमतीने अमेरिकेचे सैन्य सौदी अरेबियात उतरले. "पवित्र'मुस्लिम भूमीत अमेरिकन सैन्य उतरवण्यास शेखने परवानगी दिल्याने ओसामाने टीकात्मक भूमिका घेतली. त्यामुळे सौदी अरेबियाने ओसामाची हकालपट्टी केली आणि तो सुदानमध्ये आश्रयासाठी गेला. सौदी राजवट उलथवण्याची चिथावणी दिल्याचा आरोप करून १९९४ मध्ये ओसामाचे सौदी नागरिकत्व

रद्द करण्यात आले. १९९६ साली अमेरिकेच्या दडपणाखाली त्याला सुदानही सोडावे लागले व तो अफगाणिस्तानमध्ये तालिबानचा सूत्रधार बनला. त्याच्या नेतृत्वाखालील अल् कायदा ही मूलतत्ववादी संघटना विविध देशात पसरली. या संघटनेचे सुमारे १०,००० जिहादी इंग्लंड, अमेरिका, युरोप, रशिया, इजिप्त, पाकिस्तान असे देशोदेशी विखुरले आहेत. ११ सप्टेंबरच्या हल्ल्यानंतर बुशने लादेनलाच हल्ल्याचा सूत्रधार ठरवला. प्रसारमाध्यमांनी ओसामाला अफाट प्रसिद्धी दिली. सी.आय.ए.ला थांगपत्ताही लागू न देता मोठा कट रचून एवढ्या शिताफीने अमेरिकेवर बिनचूक हल्ला करण्याची ताकद व धमक आहे, असे अमेरिकेने ठरवलेला ओसामा अमेरिकेच्या दहशतवादी कारवायांमुळे तीव्र संताप असलेल्या जनतेचा "हीरो' बनला. अर्थात या प्रतिक्रिया व घोषणा जल्लोषापुरत्याच मर्यादित होत्या. "बदल्याचे' फतवे निघाले तरी बदल्याच्या घटना घडल्या नाहीत. त्यामुळे ओसामाच्या अल् कायदा संघटनेची ताकद, जगव्यापी जाळे व चोरटे हल्ले करण्याच्या क्षमतेबाबत प्रसारमाध्यमे जे चित्र रंगवतात ते अतिरंजित असल्याचे स्पष्ट झाले.

गेली वीस वर्षे अफगाणिस्तानवर वर्चस्व स्थापन करण्यासाठी अमेरिकेच्या कूट कारवाया चालू आहेत. त्याची कारणे समजण्यासाठी अफगाणिस्तानमधील स्थित्यंतराकडे धावती नजर टाकणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अफगाणिस्तानमधील हितसंबंध, अमेरिकेच्या कारवाया व त्याचे जागतिक परिणाम समजून घेणे सोपे जाईल.

## २. सारीपटावरचे प्यादे – अफगाणिस्तान

अफगाणिस्तान हा टोळ्यांचा समाज. टोळ्याटोळ्यांमधील लढायांत आणि विविध जमातीतील सत्तास्पर्धेत चिरफाडलेला. तेथील मुख्य जमाती पख्तून (३८%), ताजिक (२५%), हजारा (शिया) (१५%), उझबेक (१२%), बलुची, आयमक, फरसिवान, तुर्कमन, नूरस्तानी, ब्राहूई, किरगीझ इ. एकूण लोकसंख्येत ८०% सुन्नी व २०% शिया मुस्लिम. १८८० साली अमीर अब्दुल रहमानच्या सत्तेखाली अफगाणिस्तान प्रथमच एकछत्री राज्याखाली आले तरी जनतेत नागरिकत्व व राष्ट्रीयत्वाची कल्पना रुजलेली नव्हती. जमात–टोळी प्रमुखांची आपली अधिसत्ता टिकवायची ईर्षा एखाद्या केंद्रीय राजसत्तेला मानायला तयार नव्हती. आपले अधिकार व सवतासुभा सांभाळण्यासाठी टोळ्याटोळ्यांतला संघर्ष हा अफगाण समाजाचा स्थायीभाव होता. ब्रिटिशांनी १८३९–४२, १९७८–८०, १९१९ मध्ये युद्ध करून अफगाणिस्तानवर आपले वर्चस्व स्थापण्याचे प्रयत्न केले ते अफगाण जनतेने प्राणपणाने मोडून काढले. पण त्यातून अफगाणिस्तान हे "राष्ट्र' उभे राहिले नाही. ९० टक्के जनता खेडोपाडी विखुरलेली आहे. मुल्ला, टोळीप्रमुख, उमराव, जमीनदार या वर्गाचे ग्रामीण जनतेवर पुरे वर्चस्व आहे. अपुऱ्या पावसाने दुष्काळाच्या वेढ्यात, निसर्गाच्या लहरीवर जीवन अवलंबून असल्याने ग्रामीण जनता अगतिक व धर्मभोळी, पीराला भजणारी व अल्लाच्या कृपेच्या आशेवर जगणारी आणि नास्तिकता हे पाप मानणारी आहे.

राजकीय स्थित्यंतरे : पहिल्या महायुद्धानंतर १९१९साली ब्रिटन–अफगाणिस्तान यामध्ये तहनामा झाला आणि अफगाणिस्तानचे स्वतंत्र स्थान मान्य झाले. १९१९–१९२९ या काळातील राजे अमीर अमानुल्ला यांनी समाजसत्तावादी सोविएत शासनाशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. काबूलमध्ये आधुनिक शाळा, उद्योगधंदे व सामाजिक सुधारणांचे प्रयत्न – बहूपत्नित्वाला बंदी, बुरखा त्याग इ. – त्यांनी केले. आर्थिक प्रकल्पासाठी भांडवल उभारण्याकरता कर वाढवले. परंतु सामाजिक सुधारणांस अनुकूल असा आर्थिक पाया घातला गेला नसल्याने त्या रुजल्या नाहीत. या आधुनिकीकरणाला व करांना पारंपरिक सत्तास्थानांतून तर मोठा विरोध झाला व १९२९ साली अमानुल्लाची उचलबांगडी करण्यात आली. १९३३ साली १९ वर्षीय झहीर शहा गादीवर बसला. १९५३ पर्यंत त्यांच्या नावाने त्यांच्या काकांचा हूकूमशाही अंमल चालू होता. १९५३ साली राजा झहीर शहा व त्यांचा चुलत भाऊ दाऊद खान यांनी सत्ता ताब्यात घेतली व दाऊदखानने शिक्षणविस्तार, स्त्रियांना बुरखात्यागास परवानगी (१९५९), अमेरिका व सोविएत युनियनच्या मदतीने रस्ते, कारखाने आदी विकास प्रकल्प हाती घेतले. १९७३ साली झहीर शहाला पदच्यूत करून राजेशाही बरखास्त करून दाऊदखान अध्यक्ष बनला. दाऊदची राजवट एकाधिकारी व जुलमीच होती. दाऊदच्या आधुनिकीकरण व सुधारणांच्या प्रयत्नांच्या विरोधात बुरहनुद्दीन रबानी (काबूल विद्यापीठातील इस्लामिक कायद्याचे अध्यापक) यांच्या नेतृत्वाखाली गुलुबुद्दीन हिकमतयार (कडवा

विद्यार्थी नेता), महंमद शहा मसूद आदी विद्यार्थी यांनी अफगाण इस्लामिक प्रजासत्ताक स्थापन करून शरियाचा अंमल आणण्याचा आदर्श पुढे ठेवून १९७४ साली दाऊदविरोधी कट रचला. दाऊदला त्याचा सुगावा लागल्याने अटकेच्या भीतीने ते काबूल सोडून पेशावरला आश्रयाला गेले. भुट्टोने त्यांचे स्वागत केले, त्यांना लष्करी प्रशिक्षण दिले व शस्त्रास्त्रे पुरवली. तेव्हापासून परागंदा अफगाण नेते, विद्यार्थी व टोळीवाले यांना हाताशी धरून पाकच्या कारवाया चालूच होत्या. सौदी अरेबियाची त्याला मोठी मदत होती.

सौरक्रांती : १९७८ साली अफगाणिस्तानमध्ये दाऊदखानला पदच्युत करून सौरउठावातून (एप्रिल) "अफगाण जनता लोकशाही पक्ष' (खल्क व परचम या डाव्या पक्षांची आघाडी) सत्तेवर आला. त्यांनी समाजवादी सुधारणांचा कार्यक्रम जाहीर केला व ते सोविएत युनियनची मदत व मार्गदर्शन घेत होते. तेव्हा सोविएत वर्चस्व वाढण्याच्या भयगंडाखाली अमेरिकेने अफगाणिस्तानमधील नवे शासन पदच्यूत करण्यासाठी पाकिस्तानला हाताशी धरून मोठे कारस्थान रचले. सोविएत युनियनला अफगाणिस्तानमध्ये युद्धाच्या गर्तेत खोल खोल रुतवायचे आणि त्यातून राजकीय–आर्थिक दिवाळखोरीची वेळ आणून सोविएत समाजसत्तावादच नेस्तनाबूत करायचा असे षड्>यंत्री कारस्थान अमेरिकेने रचले आणि या कटाचा सूत्रधार – ओसामा–बिन–लादेन अभिमानाने वल्गना करतो की त्याने अफगाणिस्तानमध्ये सोविएतचे "पानिपत' केले. अमेरिकेला आपले कारस्थान यशस्वी करायला अफगाणिस्तानमध्ये चांगली अनुकूल भूमी मिळाली. नव्या शासनाच्या स्त्रीशिक्षण, धर्माचा पगडा व जमीनदार–सावकारांचे वर्चस्व कमी करण्याच्या धोरणाला मुल्ला–मौलवी, जमीनदार, टोळीप्रमुख अशा धार्मिक व राजकीय सत्ताकेंद्रांचा कडवा विरोध होता. नवे राज्यकर्ते कम्युनिस्ट (पुश्तु भाषेत "ज़्ीा' म्हणजे "देव' आणि फारसीत "ळिीि' म्हणजे "नाही') पाखंडी आहेत आहेत असा आरोप करून अंधश्रद्ध जनतेला त्यांनी बिथरवले. विविध टोळीप्रमुख व मुल्ला–मौलवींना सी.आय.ए.$ने हाताशी धरले. अफगाणिस्तानमधील परागंदा तरुणांना लष्करी प्रशिक्षण देऊन व अत्याधुनिक शस्त्रे पुरवून आणि त्यासोबत हजारो भाडोत्री "जिहादी' पाठवून अफगाणिस्तानमध्ये बंडाळी माजवली.

देशातील अस्थिरता–यादवी वातावरणात सत्ताधारी पक्षातील खल्क (पख्तून) व परचम (ताजिक) गटात परस्परांवरील आरोप प्रत्यारोप वाढले. खल्क नेता अमीन याने कुरघोडी करून ज्येष्ठ नेता तराकी याला ठार केले. त्यापूर्वीच परचम नेता करमालला प्रागला राजदूत म्हणून पाठविले होते. त्याचा अर्थ ओळखून करमालने सोविएत युनियनमध्ये राजकीय आश्रय घेतला. अमीनच्या दडपशाहीने गंभीर स्वरूप धारण केल्याने १९७९ डिसेंबरमध्ये सोविएत सेनेच्या मदतीने परचम नेता करमालने सत्ता ताब्यात घेतली. त्याने धार्मिक व आर्थिक सुधारणांबाबत सबुरीचे धोरण स्वीकारले. अमेरिकेने लष्करी हस्तक्षेप केला नसता तर करमालच्या समन्वयी नेतृत्वाखाली अफगाणिस्तान स्थिरावले असते.

जिहादी छावण्या : अफगाणिस्तानमधून परागंदा झालेल्या अफगाणांना मिळणारी मदत पाकचा लष्करशहा झियाच्या कारकीर्दीत वाढत गेली. (१९७७–१९८९) झियाला हाताशी धरून अमेरिका व इंग्लंड यांनी पैसा व शस्त्रपुरवठा याची भरघोस मदत केली. १९७९ साली इराणमध्ये खोमेनीची धर्मांध राजवट स्थापन झाल्यावर इराणचीही मदत सुरू झाली. सौदी अरेबियाच्या पैशातून मूलतत्ववादाला पद्धतशीरपणे खतपाणी घालून दहशतवाद्यांच्या सुमारे २५०० शाळा पेशावर परिसरात चालू करण्यात आल्या. पैशाच्या आमिषाने गोळा केलेले देशोदेशीचे बेकार, उद्ध्वस्त तरुण, पाकिस्तानी तरुण आणि अफगाणिस्तानमधील निर्वासित मुले–तरुण यांना पाक लष्करी अधिकाऱ्यांच्या तालमीमध्ये लष्करी शिक्षण मिळाले. केवळ कडवे धर्मवेड व लष्करी हडेलहप्पी याचे बाळकडू घेऊन दोन ते अडीच लाख जिहादी बाहेर पडले. सी.आय.ए.ने अफगाणिस्तानमध्ये अफूच्या लागवडीला उत्तेजन देऊन मध्य आशिया–तुर्कस्तान, पाकिस्तान, भारतमार्गे युरोप–अमेरिकेला निर्यात सुरू करून अफूचे व्यसन फैलावले व त्यातून मिळणारा गडगंज पैसा अत्याधुनिक शस्त्रास्त्र खरेदीसाठी वापरला. त्याद्वारे अमेरिकेने शस्त्रास्त्रनिर्मिती उद्योगास मोठी बाजारपेठ मिळवली.

यादवी युद्ध : इराणमधून प्रशिक्षित शिया, पाकिस्तानने सज्ज केलेले पख्तून>, ताजिक असे सुमारे १२ मोठे गट यांच्या सेना व शिवाय अनेक टोळीप्रमुखांच्या सेना (सुमारे २०० गट) यांनी अफगाणिस्तानमध्ये रणकंदन सुरू केले. त्या सर्वांचा शत्रू होता सोविएत सेना व करमालचे सरकार. परंतु त्यांच्यात सत्तास्पर्धा असल्याने अराजक वाढले. १९८५ पासून सोविएत सेना माघारी घेण्याबाबत व सर्वांच्या सहमतीने नवे अफगाण शासन प्रस्थापित करण्याच्या प्रस्तावावर युनोच्या पुढाकाराने चर्चा चालू झाली. परंतु त्यामध्ये पाकिस्तान व अमेरिका यांचा थंडा सहभाग होता. कारण त्यांची खात्री होती की सोविएत सेना माघारी फिरली, की अमेरिकेला अनुकूल असे शासन अफगाणिस्तानमध्ये स्थापन करता येईल.

१९८९ साली सोविएत सेना अफगाणिस्तानातून माघरी फिरली तेव्हा नजीबुल्ला शासन (१९८६–१९९२) सत्तेवर होते. जनरल रशीद दोस्तम हा त्याचा वजनदार लष्करी नेता होता. यावेळी विविध मुजाहिदीन गटांनी इस्लामाबादमध्ये (पाकिस्तान) हंगामी अफगाण सरकार स्थापन केले. नजीबुल्ला शासनाच्या जागी एक व्यापक आघाडी शासन स्थापन करण्याचे युनोचे प्रयत्न चालू होते. पण ते यशस्वी होत नव्हते. १९९१ साली सोविएत युनियनचे विघटन झाल्यावर नजीबुल्ला शासनाला मिळणारी सोविएत मदत थंडावली. जनरल दोस्तमने नजीबुल्ला शासनाशी गद्दारी केली आणि तो मसूदला मिळाला. यावेळी महंमद शहा मसूद हा मुजाहिदीन कमांडर पंजशीर खोऱ्यात पाय रोवून होता. पाकिस्तानमधील जमात–इ–इस्लामी पक्ष (मुख्य नेता बरहनुद्दीन रबानी) व हजारा लष्करी गट त्यांच्याबरोबर होता. त्यांनी १९९२ साली काबूलचा ताबा घेतला. नव्या शासनात हिकमतयार पंतप्रधान, रबानी अध्यक्ष व मसूद संरक्षणमंत्री

बनले. अशा रीतीने अमेरिकेने एका बाजूला सोविएत युनियनचे पानिपत व दुसऱ्या बाजूला शस्त्राची मोठी बाजारपेठ मिळवणे हे दोन्ही हेतू अफगाणिस्तानमध्ये हस्तक्षेप करून साधले व तेथे प्रतिगामी धर्मांध शासन प्रस्थापित केले.

नजीबुल्ला पदच्यूत झाल्याने आता विविध गटांना एक शत्रू उरला नाही व त्यांच्यातला सत्तासंघर्ष वाढला. या बंडखोरातले मुख्य गट म्हणजे ताजिक रबानी व मसूद यांचा, उझबेक दोस्तम$ याचा, पख्तून हिकमतयार याचा आणि शिया अली रशिदचा. हिकमतयार पख्तून असल्याने त्याला पाकिस्तानची विशेष मदत तर इराण शियांच्या (हजारा जमात) पाठीमागे होता. हिकमतयार याने सर्वेसर्वा होण्याच्या महत्वाकांक्षेने सत्तेवर आल्यावरही काबूलवर बेछूट हल्ले व रणकंदन चालू ठेवले. तोफा व अस्त्रांचा मारा करून निम्मे काबूल उद्ध्वस्त केले.

तालिबान : तालिबान (धर्माचे विद्यार्थी) या पख्तून तरूण गटाचा उदय कंदाहारचा कडवा मूलतत्ववादी मुल्ला उमर याच्या नेतृत्वाखाली नव्वदीच्या दशकाच्या प्रारंभी झाला. त्यामध्ये मुख्यत: निर्वासित छावण्यांमधील तरुण अफगाण मुले, अरब व पाक सैनिक सुद्धा बऱ्याच संख्येने सामील होते. पाक सीमेजवळच्या प्रदेशात सी.आय.ए.चा पैसा, शस्त्रास्त्रे यांच्या आधारे त्यांनी विविध टोळी नायकांना पैशाच्या जोरावर वश करून आपली सत्ता दक्षिण अफगाणिस्तानमध्ये प्रस्थापित केली. प्रारंभीच्या काळात विश्वासाने रबानीनेही त्यांच्याशी सहकार्य केले. कारण सत्तास्पर्धेत विजय मिळवण्यासाठी हिकमतयारने तुंबळ यादवी युद्ध माजवलेले होते व रबानी शासन अडचणीत होते. दोन वर्षे लढूनही हिकमतयारचे वर्चस्व स्थापन होईना तेव्हा पाकिस्तानने हिकमतयारचा पाठिंबा काढून घेऊन तालिबानला हाताशी धरले. लष्करी मार्गदर्शन, पैसा, रसद, शस्त्रास्त्रे, सैनिक पुरवले. १९९४ ते १९९६ या काळात अफगाणिस्तानमध्ये दक्षिणेकडून आगेकूच करत एकेका प्रदेशाचा दाम–दंड नीतीने ताबा मिळवत १९९६ साली काबूलपर्यंत तालिबान पोचले. २७ सप्टेंबर १९९६ रोजी पाकसेनेच्या मदतीने तालिबानने काबूल ताब्यात घेतले. रबानी–मसूदने माघार घेऊन उत्तर अफगाणिस्तान ताब्यात ठेवले. रबानी शासनालाच युनोची व बहूसंख्य देशांची मान्यता राहिली. पाकिस्तान, सौदी अरेबियाने तेवढी तालिबान शासनाला मान्यता दिली. अमेरिकेची अपेक्षा होती की तालिबान कडवे धर्मांध असल्याने सौदी अरेबियातील शेखप्रमाणे एकीकडे जुलमी मूलतत्ववादी राजवट चालवून दुसकडे अमेरिकेचे आर्थिक हितसंबंध लक्षात घेतील.

नवे राज्यकर्ते : अफगाण खेड्यापाड्यातून परागंदा झालेले, कुटुंब व सामाजिक संस्कारविहीन असे पोरके तरुण पोटासाठी पाकिस्तानने खोललेल्या "शाळा'मध्ये भरती झाले. त्यांना "जिहाद व हत्या' या मंत्रावर पोसून सौदी पैसा व पाक सेना, यांच्या बळावर अमेरिकेने अफगाणिस्तानचे राज्यकर्ते बनवले. कंदाहारच्या मुल्ला उमरच्या नेतृत्वाखालील तालिबानची राजवट सुरू झाल्यावर त्यांनी स्त्रियांना कामाला

बंदी करून (अफगाणिस्तानमध्ये यादवी युद्धामुळे हजारो विधवा आहेत आणि त्यांना मुलांच्या पोषणासाठी कामाविना गत्यंतरच नाही. केवळ काबुलमध्ये अशा ४०,००० विधवा होत्या.) चार भिंतीआड बंदिस्त केले. मध्ययुगीन हिंस्त्र शिक्षा, मानवी हक्कांची पुरी पायमल्ली अशी क्रूर राजवट सुरू झाली. फटके व गोळ्यांच्या धाकाखाली दारूपान, धूम्रपान, टी.व्ही., रेडिओ, करमणूक यावर बंदी घातली, स्त्रियांना बुरखा व पुरुषांना दाढी सक्तीची केली, सिनेमा, समारंभ, छायाचित्रण, खेळ, मौजमजा सारे बंद केले. काबूलच्या फुटबॉल स्टेडियममध्ये केवळ अघोरी शिक्षांचे प्रदर्शन सुरू केले. व्यभिचाराच्या आरोपावरून स्त्रियांना दगडांच्या माऱ्याने ठेचून ठार करणे, चोरी किंवा हेरगिरीच्या आरोपावरून हात,पाय तोडणे, गळा चिरणे आणि तोडलेले अवयव, ठार केलेली प्रेते दहशत बसवण्यासाठी भर चौकात टांगून ठेवणे अशा अत्याचाराने नागरिकांना भयग्रस्त करण्याचा व त्यांनी मने सुन्न–दगड बनवण्याचा प्रयत्न तालिबानने केला.

तालिबानजवळ अफूचा व अन्य चोरटा व्यापार एवढेच उत्पन्नाचे साधन होते. त्यामुळे पाकिस्तान व इराणमधून अन्नपुरवठा, इंधन, शस्त्रास्त्रे व अन्य मदतीवर तालिबान पूर्णतया अवलंबून असल्याने ते पाकिस्तानचे बाहूले शासन बनले होते. यादवी युद्ध व दुष्काळाने शेती उध्वस्त व हजारो मेंढ्या मृत्युमुखी पडल्याने ग्रामीण जनता दारिद्र्याच्या खाईत लोटली गेली होती. उद्योग बंद पडलेले, शाळा बंद केलेल्या, मुलांना फक्त धार्मिक शाळा खुल्या. तालिबानी मंत्री, उच्च अधिकारी व त्यांचे पाक व अरब सहकारी यांची अलिशान राहाणी व चैनचंगळ, तर श्रमिक जनता असहाय, भिकेला लागलेली! प्रारंभीच्या काळात जनतेवर सतत फटक्यांची जरब होती. पण हळूहळू तालिबानची "नीतीरक्षक सेना' दंड व कमिशन लाटायला चटावली. त्यामुळे स्त्रियांना चोरून कामाला जाणे शक्य होऊ लागले. रोज रात्री संचारबंदीच्या काळात तालिबानची "दुर्गुणनियंत्रकसेना' चोऱ्या, लुटालूट करायला मोकळी! अशा भ्रष्ट, अतिरेकी व अमानुष राजवटीखाली अफगाण जनता पुरी भरडून निघत होती. परंतु दुष्काळाच्या फेऱ्याखाली जीवन–मरणाच्या झगड्यात अडकल्याने प्रतिकारशक्ती क्षीण होऊन अगतिक बनली होती. उत्तर अफगाणिस्तामध्ये पंjजशीर खोऱ्यावर उत्तर आघाडी ताबा ठेवून होती. तालिबानची सत्ता केंद्रित होती ती २० अतिकडव्या तरूण पख्तूनच्या हातात. तालिबानवरील ओसामाचे वर्चस्व सर्वांना मान्य होते असे नाही. पण मुल्ला उमरचा शब्द शिरसावंद्य होता आणि उमर ओसामावर पुरा अवलंबून होता. कारण पैशाची तर मोठी मदत ओसामाकडून होत होतीच. शिवाय लष्करी व्यूहरचना आखण्यात, प्रशिक्षण देण्यात तो वाकबगार होता. विशुद्ध इस्लामी राष्ट्र उभारण्याचा आदर्श आणि अमेरिका पापी आहे म्हणून अमेरिकेविरोधात लढ्याचे आव्हान अमेरिकेनेच उभा केलेला लादेन करू लागला. अशा रीतीने ओसामा बिन लादेन व तालिबानला जन्म देऊन अमेरिकेने अफगाणिस्तानी जनतेवर अत्यंत जुलमी राजवट लादली. या भस्मासुराने आपले हातपाय देशोदेशी पसरले. अफूच्या व्यापारातील पैसा, सौदी मदत आणि विविध मुस्लिम देशांतून येणाऱ्या

निधीच्या जोरावर तालिबान व अल्–कायदा संघटना शेजारी देशात उदा. ताजिकिस्तान, उझबेकिस्तान, काश्मीर येथे मूलतत्ववाद व दहशतवाद पोसू लागल्या. १९९८ साली अमेरिकेच्या केनिया व टांझानिया येथील परदेशी वकिलातींवर बाँबहल्ले झाले त्याला अमेरिकन शासनाने ओसामा बिन लादेनला जबाबदार ठरवून क्षेपणास्त्रांचा मारा केला आणि सुदानमधील ५०% औषध पुरवठा करणारा कारखाना (तो ओसामाच्या मालकीचा आहे अशा चुकीच्या समजातून) उद्ध्वस्त केला.

११ सप्टेंबरच्या हल्ल्याचे निमित्त करून ७ ऑक्टोबर २००१ रोजी अमेरिकेने ओसामाला ठार करण्यासाठी व तालिबानला हुसकण्यासाठी अफगाणिस्तानवर बाँबहल्ले सुरू केले. हजारो नागरिकांना निर्वासित केले. घरदारे, सेवासुविधा, रस्ते उध्वस्त केले. निरपराध स्त्रिया–बालके यांचेही बळी घेतले. तालिबान हटवले गेले, पण नवी राजवट कोणाची, हा प्रश्न सोडवणे महाकठीण!

नवी समीकरणे : पाकिस्तानला अनुकूल अशीच राजवट अफगाणिस्तानमध्ये असणे हे पाकिस्तानला गरजेचे, कारण पाकिस्तानचा वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तान येथील पख्तून व बलुचींमध्ये स्वायत्ततेसाठी चळवळी चालू आहेत. अफगाणिस्तानमध्ये पाक–अनुकूल राजवट नसेल तर ती फुटिरतावादाला उत्तेजन देईल अशी पाकिस्तानला धास्ती वाटते. शिवाय वायव्य सरहद्द प्रांत ही पख्तून प्रदेशाची कृत्रिम फाळणी आहे. १८९२ साली ब्रिटिशांनी डुरांड सीमारेषा आखली व त्याद्वारे पख्तूनभूमीची फाळणी केली. निम्मी पख्तूनभूमी अफगाणिस्तानमध्ये व निम्मी त्यावेळच्या ब्रिटिश अमलाखालील हिंदुस्थानात समाविष्ट केली ती १०० वर्षे मुदतीच्या अटीवर. त्यानुसार १९९२ साली पाकचे वायव्य सरहद्द प्रांतावरील हक्क संपुष्टात आले. तेव्हा पाक राज्यकर्त्यांना अफगाणिस्तानवर वर्चस्व राखून पख्तूनस्तानची समस्या टाळायची आहे.

इराण, रशिया, भारत यांचा पाठिंबा असलेली उत्तर आघाडी सत्तास्पर्धेमुळे चिरफाळलेली. उत्तर आघाडीतील हिकमतयारला इराणची तर दोस्तमला तुर्कस्तानची मदत. हिकमतयार व उझबेक नेता दोस्तम हे दोन्ही नेते तालिबानप्रमाणेच कडवे धर्मांध व अतिक्रूर. उत्तर आघाडीचा नेता मसूद याची ९ सप्टेबर २००१ ला हत्या झाली. म्हातारा पदच्यूत राजा झहीर शहा नेता म्हणून पुढे करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न होता. तालिबानचा पराभव झाल्यावर बर्लिनमध्ये वाटाघाटी होऊन अमेरिकेचा अंकित हमीद करझाईच्या (पख्तून) नेतृत्वाखाली तात्पुरते आघाडी शासन २२ डिसेंबर २००१ रोजी स्थापन झाले. त्या तडजोडीबाबत रबानी, दोस्तम, इस्माईल खान, हिकमतयार, पीर अहमद गिलानी नाराज होते. जून २००२ मध्ये टोळीनायकांची सभा (लोया जिरगा) भरवून हंगामी शासन स्थापून करझाईच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले. परंतु अफगाण समाज हा अजूनही मोठ्या प्रमाणात टोळ्यांमध्ये विभागलेला आहे. शिवाय वांशिक–भाषिक तेढ आहेच. त्यामुळे सर्व गटांना स्थान देण्याचे ठरवले तरी ते एकोप्याने राज्यशकट

कसे चालवणार हा यक्षप्रश्न आहे.

अमेरिकेची गुन्हेगारी : अमेरिकेने ओसामा बिन लादेनला पकडण्यासाठी अफगाणिस्तानवर तुफान बॉम्बहल्ले करून नव्यानव्या शास्त्रज्ञांच्या अचूकतेची चाचणी घेतली. अफगाणिस्तानमधील शहरे, गावे, वीज व पाणीपुरवठा व्यवस्था, रस्ते, इस्पितळे उध्वस्त केली. हजारो क्लस्टर बॉंबचा वर्षाव करून इतस्तत: खेडोपाडी पसरलेल्या बॉंबला स्पर्श झाला तरी बॉंबचा स्फोट होऊन आबालवृद्धांना मृत्युमुखी ढकलण्याची तजवीज केली. लाखो अफगाण स्त्रिया–मुलांना निर्वासित बनवून त्यांची अन्नान्नदशा व हिवाळ्यातील हिमवादळे यांच्या तडाख्यात यमसदनी पाठवण्याची सोय केली. तालिबानना पैसे चारून शरण आलेल्या अरब सैनिकांना ठार करण्याची करामत केली. कैद्यांमध्ये लढाई पेटवून हजारो कैदी ठार केले. एवढा विध्वंस व अफगाण जनतेवर अत्याचार करून ओसामाचा थांगपत्ता नाही तो नाहीच. ओसामाला गिरफतार करण्याच्या नावाने अमेरिकन सेना अफगाणिस्तानमध्ये उतरली व ती तेथे ठाण मांडून आहे.

तरीही अमेरिकेच्या या दुष्कृत्याचा जोरदार निषेध करण्याऐवजी जुलमी तालिबान राजवट हटवण्याचे काम त्यातून साधले, असा फसवा प्रचार करण्यात आला. वास्तविक तालिबान शासन हे अमेरिकेच्या आशीर्वादाने पाकिस्तानने उभे केलेले एक बुजगावणे होते. त्याचे पालनपोषण पाकद्वारा होत होते. शस्त्रपुरवठा व संरक्षणव्यवस्था पाकची होती. ती बंद करणे अमेरिकेच्या हातात होते. कारण पाकिस्तान आर्थिक व लष्करी मदतीसाठी अमेरिकेवर पूर्णतया अवलंबून आहे. तालिबानचा बागुलबोवा करण्याचे काहीच कारण नव्हते. तरी अमेरिकेने पाच वर्षे तालिबानचा भस्मासूर अफगाण जनतेच्या डोक्यावर बसवला आणि दहशतवादाविरुद्ध युद्धाची गर्जना करून दोन महिने पुन्हा अफगाणिस्तान बेचिराख केले. एकूणच अफगाणिस्तानमधील गेल्या २३ वर्षांतील अमेरिकेच्या कृष्णकारवायांबाबत नाझी नेत्यांना युद्ध गुन्हेगारीसाठी आंतरराष्ट्रीय न्यूरेनबर्ग चौकशी न्यायालयात उभे केले त्याप्रमाणे अमेरिकन सत्ताधीशांच्या गुन्ह्यांचा जाब विचारण्याची गरज आहे.

तालिबान प्रणाली : अमेरिकेने अफगाणिस्तानमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी तालिबानला उभे केले. त्यांना सत्ताभ्रष्ट केले तरी तालिबान प्रणाली पराभूत कशी करणार? तालिबान व अल् कायदा आदींद्वारा मूलतत्ववादाचा प्रसार होतो तो जगात अमेरिकने उद्ध्वस्त केलेल्या लाखो तरुणांना साम्राज्यशाहीने पोसलेल्या जिहादी संघटनांमार्फत धर्मांधतेची झिंग चढवून पोट भरण्याची संधी मिळते म्हणून. अफगाणिस्तानमधील सोविएतविरोधी मोहीमेच्या काळात सुमारे ३५००० तरुणांच्या जिहादी फौजा पाक–छावण्यांमध्ये तयार केल्या. एक लाखांवर अधिक तरूणांना प्रशिक्षण दिले. अफगाण मोहिमेत त्यांची गरज जशी कमी होत गेली, तसे ते देशोदेशी पांगले. बोस्निया, कोसावा, चेचन्या, फिलिपाईन्स, अल्जेरिया, येमेन, इजिप्त, काश्मीर इत्यादी देशातील आतंकवादी कारवायांत ते सामील झाले. अमेरिका पाकिस्तान–

आय्. एस्. आय्. मार्फत त्यांना प्रशिक्षण, शस्त्रपुरवठा व पैसा पुरवला गेला. अमेरिकेचे तेलाचे, शस्त्रास्त्र विक्रीचे अर्थकारण आणि देशोदेशी अराजक माजवून आपली जागतिक अधिसत्ता पक्की करण्याचे राजकारण यासाठी अमेरिका आपल्या हातातील ही आतंकवादी प्यादी देशोदेशी खेळवत आहे. या खेळात जिहादी तरूण तर मोठ्या संख्येने मारले जात आहेतच पण त्याचबरोबर ज्या देशांमधून अमेरिका आपले डाव खेळते आहे त्या देशातील सर्वसामान्य जनताही भरडली जाते. (उदा. काश्मीर)

अफगाण प्रगतीत अमेरिकेचा कोलदांडा : १९७८ सालच्या सौर क्रांतीनंतर अफगाणिस्तानमध्ये आर्थिक, सामाजिक, धार्मिक सुधारणांचा प्रयत्न सुरू झाला. त्याला मुल्ला–मौलवी व टोळी प्रमुखांचा अर्थातच विरोध होता. परंतु अमेरिका, सौदी अरेबिया व पाकिस्तान यांनी धर्मांधांना प्रचंड पैसा व शस्त्रे यांचे बळ दिले नसते तर क्रमश: पारंपरिक टोळी >नायक व मुल्लांचे वर्चस्व कमी होणे शक्य होते. यादवी युद्धामुळे पासष्ठ लाख अफगाण निर्वासित झाले. लाखो जायबंदी झाले. हजारो मृत्युमुखी पडले. हजारो स्त्रिया विधवा व मुले अनाथ झाली. शहरे, गावे उद्ध्वस्त झाली. गेल्या वीस वर्षात यादवी, युद्धकाळात पेरलेली स्फोटके (श्रवि ाळशि ी) आणि उपासमार यामुळे २५ लाख अफगाण मृत्युमुखी पडले. या रणकंदनामुळे अफगाण समाज टोळ्यांमध्येच दुभंगलेला राहिला, धार्मिक अंधश्रद्धेत गुरफटलेला राहिला. २००१ साली तालिबानच्या अघोरी राजवटीच्या भीषण अनुभवानंतरही तालिबान पुन्हा डोके वर काढत आहे.

आजही अफगाणिस्तानच्या प्रश्नाला पारंपरिक राजकीय चौकटीत उत्तर दिसत नाही. केंद्रीय शासन ही संस्थात्मक संरचना अफगाणिस्तानला योग्य नाही. कारण अफगाणिस्तानची वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक रचना. सात लाख चौ.कि.मी. भूप्रदेश असलेला हा देश पर्वतराजींनी (७५%) व्यापलेला आहे. उत्तंुग पर्वतांच्या भिंतींनी विभागलेल्या निरुंद खोऱ्यांमध्ये काय ती लोकवस्ती, तुरळक शेती व कुरणे. ७% भूमी फक्त शेतीखाली. बर्फ वितळले की नद्यांना पूर. एरवी पाण्याचे दुर्भिक्ष्य. समुचित पाणीसाठाव्यवस्था केली तरच शेती सुधारणा शक्य आहे. २ कोटी> लोकसंख्या व २.२ कोटी मेंढ्या. मेंढपाळ चराऊ कुरणाच्या शोधात भटकणारे. फळफळावळ व सुक्यामेव्याचे नंदनवन. प्राचीन काळात रेशीम–मार्गामुळे व्यापारी महत्त्व होते. पण उंट–घोडेयुग संपून ट्रक वाहतूक सुरू झाल्यावर अफगाणिस्तान बाजूला पडले.

विकेंद्रित शासनयंत्रणा : असा खोऱ्याखोऱ्यात विखुरलेला टोळी समाज अजूनही टोळीप्रमुख व मुल्लांच्या वर्चस्वाखाली आहे. १८८८ पासून केंद्रीय राज्यसत्ता उभारण्याचा प्रयत्न झाला. परंतु केंद्रीय शासनाकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन नसल्याने ते कायम परकीयांवर अवलंबून राहिले. प्रारंभी ब्रिटिश, पुढे जर्मनी, अमेरिका व सोविएत युनियन. १९७८ नंतर केंद्रीय शासनाला सोविएत युनियनची आर्थिक व लष्करी मदत मिळाली, तर टोळी नायकांना अमेरिका, सौदी अरेबिया, पाक व इराणची मदत. तालिबान राजवट सर्वस्वी परकीयावलंबी, भ्रष्ट, लुटारू आणि टोळी नायकांचा विरोध कायमच होता. अशा परिस्थितीमुळे लोया

जिरगाने पारंपरिक पद्धतीने आघाडी शासन निवडून नेत्यांची मोट बांधून शासनव्यवस्था वरून लादली तरी भ्रष्टाचार, मनमानी कारभार आणि टोळीवाद हेच प्रश्न उभे आहेत. म्हणूनच अफगाणिस्तानमध्ये स्थानिक स्वराज्य व प्रांतीय शासन अशी पूर्णतया विकेंद्रित राजकीय हक्क व जबाबदारी असलेली शासनयंत्रणा संघटित करावयास हवी. व या सर्वांचे संघराज्य स्थापन करायला हवे. शिवाय जागतिक पातळीवरून आर्थिक पुनर्रचनेसाठी मोठी मदत येण्याची जरूर आहे. विविध स्वायत्त घटकांना आपल्या पायावर उभे राहाता येईल अशा दृष्टीने अफगाणिस्तानमधील शिक्षण व सामाजिक सुधारणांचे कार्यक्रम हळूहळू विस्तारत नेले, रस्तेबांधणी व आधुनिक दूरसंचरण यंत्रणा वाढून देवाणघेवा◌ाण वाढवली आणि आर्थिक विकासाद्वारा तरुण–तरुणींना कामाची नवी क्षेत्रे व संधी मिळाली तर सामाजिक व आर्थिक प्रगती सुरू करणे शक्य आहे.

हे साधायचे तर त्यासाठीची महत्त्वाची पूर्वअट म्हणजे अमेरिकेने गेली अठ्ठावीस वर्षे आपल्या सत्ताकारणाच्या पटावर पाकिस्तानला हाताशी धरून अफगाणिस्तानला एक प्यादे म्हणून वापरले आणि आता कॅस्पियन प्रदेशातील तेलावरील वर्चस्वासाठी अफगाणिस्तानला मुठीत ठेवण्याचा अमेरिकेचा डाव आहे, तो रोखला पाहिजे. १९९७ साली जागतिक बँकेच्या अभ्यासानुसार युनोकॅल या अमेरिकन बड्या तेल कंपनीने तुर्कमेनियामध्ये (मध्य आशिया) शोधन केलेल्या गॅसची वाहतूक अफगाणिस्तान, पाकिस्तानमधून पाईपने अरबी समुद्रापाशी पोचवणे किफायतशीर असल्याचे आढळले. कारण पाकिस्तान, भारत आदी वाढत्या आशियाई बाजारपेठेच्या दृष्टीने तो मार्ग कळीचा आहे. त्यामुळे अफगाणिस्तानमध्ये कुवेत, सौदी अरेबियाप्रमाणे अमेरिकेच्या मुठीतले शासन स्थानापन्न करणे अमेरिकी तेल कंपन्यांच्या दृष्टीने गरजेचे बनले. तेलावरील वर्चस्वासाठी गेली ५० वर्षे अमेरिकेची चालू असलेली राजकीय खेळी आणि शस्त्रास्त्र उद्योग तेजीत ठेवण्याची धडपड यापायी अमेरिकेने घेतलेला ताजा बळी म्हणजे अफगाणिस्तान.

## ३. तेलाचे व शस्त्रास्त्रांचे राजकारण

""११ सप्टेंबरच्या न्यूया ॅर्क–वॉशिंग्टनवरील हल्ल्यासंबंधात सर्व प्रकारचे हास्यास्पद व फसवे युक्तिवाद पुढे आले. उजव्या वॉलस्ट्रीट जर्नलने अमेरिकेचे ऐश्वर्य, यश आणि मूल्ये याबाबतची (जगभरच्या जनतेची) असूया हे कारण पुढे केले. तर अमेरिकेतील "स्वातंत्र्या'मुळे विमानतळाच्या सुरक्षिततेबाबत पुरेशी दक्षता राखली जात नसल्याने दहशतवादी हल्ले शक्य झाले असा दावा मध्यममार्गीयांनी केला. परंतु खऱ्या वास्तव कारणाबाबत कोणीच अवाक्षर बोलत नाही.''असे लॉस एंजलिस वीकलीचे स्तंभ लेखक जॉन एगेल लिहितात. (२६–९–२००१) त्यांच्यामते या हल्ल्यांपाठीमागचे खरे कारण आहे ""अमेरिकेचे आखाती देशातील तेलाचे अर्थकारण नि राजकारण. अन्यथा अमेरिकेने अत्यंत क्रूर व हूकूमशाही राजेशाहांना कुवेत आणि सौदी अरेबियात तख्तावर का राखावे? इराणमध्ये अत्याचारी रेझा पहलवी शहाला राजसत्तेवर का बसवावे? शहाला उलथवून खोमेनीची अमेरिकाविरोधी राजवट १९७९ मध्ये इराणमध्ये स्थापन झाल्यावर इराणविरोधी युद्ध करण्यासाठी सद्दाम हूसेनला कोट्यवधी डॉलर व प्रचंड शस्त्रसंभार देऊन का माजवले? सी.आय.ए. ने शिक्षण देऊन ओसामा बिन लादेनला नेतृत्व देऊन तालिबानचा भस्मासूर का उभा केला?''

""याच्या मुळाशी आहे तेल! केवळ तेल. परंतु हे वास्तव अमेरिकन प्रसारमाध्यमे दडवून ठेवत आहेत. कारण एन.बी.सी. प्रसारयंत्रणा ब्रिटिश पेट्रोलियमशी, ए.बी.सी. टेक्सॅकोशी, तर टाईम व ॅारनर मोबिल ऑईलशी संलग्नित आहेत आणि बुश व चेनी हे दोन तेलसम्राट अमेरिकेचे सत्ताधीश आहेत.''

""अमेरिकेप्रमाणेच आखाती देशातील तेलसम्राट एका बाजूला अमेरिकेशी जुळते घेतात तर दुसऱ्या बाजूला धार्मिक मूलतत्ववाद पोसतात. त्याचा हेतू आपली राजसत्ता अबाधित राहावी हाच आहे. एकाधिकारशाही अबाधित राहिल्याने तेलाचे प्रचंड उत्पन्न (पेट्रो डॉलर) त्यांच्या हातात एकवटले जाते. आणि त्याचा मोठा वाटा सामान्य लोकांचे जीवनमान सुधारणासाठी वापरला न जाता तो शस्त्रास्त्र खरेदीसाठी वापरला जातो आणि शस्त्रास्त्रांची मागणी अर्थातच अमेरिकी कंपन्यांना मिळते.''

""अमेरिकन लोकांचे स्वस्त पेट्रोलवर पळणाऱ्या मोटारगाड्यांचे व्यसन आणि अमेरिकी बड्या कंपन्यांची तेलाच्या धंद्यातून खोऱ्याने अब्जावधी डॉलर ओढण्याची नफेखोरी हेच त्याच्या मुळाशी आहे. अमेरिका जरी आखाती देशातून सुमारे १७ टक्केच तेल विकत घेत असली तरी सौदी अरेबियाचा जागतिक तेल पुरवठ्यात ५०% वाटा आहे े आणि म्हणूनच अमेरिकी तेल कंपन्यांच्या नफेखोरीला संरक्षण देण्यासाठी अमेरिकी लष्कर आखाती प्रदेशात खडे आहे.''

""पहिल्या महायुद्धापासून तेलाचे राजकारण हेच जागतिक सत्ताकारणामागे आहे. विमाने, ट्रक, टँक, मोटारीचे युग आले आणि तेलाचा धंदा हा सर्वात किफायतशीर बनला. तेव्हा ब्रिटन – अमेरिकेने अरबांच्या पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे इस्त्राएल हे राष्ट्र स्थानापन्न केले ते आखाती प्रदेशावर हूकमत ठेवण्यासाठी.''

दहशतवादी नं २ – इस्त्राएल : पॅलेस्टाईन म्हणजे भूमध्य समुद्र व मृत समुद्र यामधील चिंचोळी पट्टी–लेबानन, सीरिया, जॉर्डन व इजिप्त या देशांनी वेढलेली अरबांची भूमी. विसाव्या शतकाच्या प्रारंभी हा भूप्रदेश ऑटोमन–तुर्की साम्राज्याखाली होता व अरबांचा स्वतंत्र राष्ट्र स्थापनेसाठी झगडा चालू होता. पहिल्या महायुद्धात ऑटोमन जर्मनीच्या बाजूने युद्धात उतरले. ऑटोमन साम्राज्यातील अरबांच्या असंतोषाचा फायदा उठवून ब्रिटिश–फ्रेंचांनी अरबांना स्वातंत्र्याची आश्वासने देऊन युद्धात आपल्या बाजूने वळवून घेतले. जर्मनीचा पराभव होऊन ऑटोमन साम्राज्याचा अंत झाल्यावर लेबानन व सीरिया फ्रेंच हूकमतीखाली, जॉर्डन, उत्तर पॅलेस्टाईन व इराक ब्रिटिश वर्चस्वाखाली आणि दक्षिण पॅलेस्टाईन व जेरूसलेम हा "खास प्रदेश' म्हणून जाहीर केला. ब्रिटन–अमेरिकेने बालफोर जाहीरनाम्याखाली पॅलेस्टाईन हा खास प्रदेश म्हणून राखून ठेवला कारण तेथे ज्यूंच्या वसाहती स्थापण्याचा त्यांचा डाव होता. पहिल्या महायुद्धकाळात अमेरिका, फ्रान्स, इंग्लंडने त्यांच्या देशातील धनाढ्य ज्यू समाजाचा पाठिंबा व मदत मिळवण्यासाठी जेरूसलेम व पॅलेस्टाईन येथे ज्यूंच्या वसाहतींसाठी सवतासुभा निर्माण करण्याच्या मागणीला पाठिंबा दिला.

पॅलेस्टाईन हा अरबांचा देश. १८०० वर्षांपूर्वी रोमन हल्ल्याखाली इतिहासकालीन इस्त्राएल पूर्णतया नामशेष होऊन तेथील ज्यू तो प्रदेश सोडून जगभर पसरले. मुख्यत: ते व्यापारी व सावकारी धंद्यात स्थिरावले. १९ व्या शतकामध्ये ज्यूंची संघटना निर्माण झाली व ज्यू राष्ट्र उभारण्यासाठी प्रदेश मिळावा अशी मागणी पुढे आली. तेव्हा ब्रिटिशांनी पूर्व आफ्रिकेत स्थानिक स्वायत्तता देऊन ज्यू राष्ट्रक उभे करण्याचा प्रस्ताव मांडला. पण ज्यूंनी पॅलेस्टाईनचा आग्रह धरला. ही मागणी पूर्णतया अवास्तव व अशक्य होती. कारण पॅलेस्टाईन ही अरबभूमी आहे. २००० वर्षांपूर्वीचा इतिहास उकरून काढून नवे ज्यू राष्ट्र अरबभूमीत कसे उभारणार? परंतु धनाढ्य ज्यू जमातीचा हा प्रस्ताव अमेरिकन व ब्रिटिश शासन यांनी उचलून धरला. कारण त्यातून त्यांना तेलसंमृद्ध अरब देशांवर वर्चस्व कायम ठेवण्यासाठी आपला बलाढ्य हस्तक तेथे कायमचा पाय रोवून ठेवण्याची संधी मिळणार होती. पॅलेस्टाईनच्या फाळणीचा ब्रिटिशांचा डाव लक्षात आल्यावर अरबांनी मोठ्या प्रमाणात त्याविरुद्ध उठाव केले. परंतु संपत्तीबळाच्या जोरावर अरब नेत्यांना (उदा. जॉर्डनचे युवराज अब्दुल्ला) वश करून अमेरिका–ब्रिटिशांच्या पाठिंब्याने पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे स्थलांतर व त्यांच्या वसाहतींची स्थापना सुरू राहिली. विशेषत: १९३३ पासून नाझी जर्मनीच्या ज्यूहत्येच्या धोरणामुळे ज्यंूचा स्थलांतराचा वेग फारच वाढला. अरबांनी विरोध केला पण ज्यूंचे स्थलांतर थोपवणे त्यांना शक्य झाले नाही.

१९४५ साली दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा पराभव होऊन इंग्लंड–अमेरिकेने युद्धोत्तर वाटाघाटीत १९४८साली मेमध्ये युनोत ठराव करून पॅलेस्टाईनची फाळणी केली आणि गॅलिली भागात इस्त्राएल या

नव्या ज्यू राष्ट्राची स्थापना केली. अरब राष्ट्रांनी सशस्त्र प्रतिकाराचा प्रयत्न केला पण ते पराभूत झाले. इस्त्राएलने पॅलेस्टाईनच्या बऱ्याच अधिक प्रदेशावर अतिक्रमण केले. इस्त्राएलव्याप्त भूप्रदेशातल्या अरबांना इस्त्राएलने अतिशय जाचक बंधनांमध्ये आवळले. अरबांचा स्वातंत्र्य संग्राम १९४८ पासून चालू आहे. १९६७ साली अरब राष्ट्रांनी पुन्हा एकदा स्वतंत्र पॅलेस्टाईनसाठी युद्ध केले. पण अमेरिकेतील धनाढ्य ज्यूंचे मोठे पाठबळ, अमेरिका व ब्रिटनचा शस्त्रास्त्र पुरवठा आणि धनाढ्य इस्त्राएलचे आधुनिक लष्कर यापुढे अरबांचा टिकाव लागला नाहीं. अरबांची पीछेहाट करून इस्त्राएलने लष्करी बळाखाली पूर्व जेरूसलेम, जॉर्डन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरचा जॉर्डनचा प्रदेश (थशी◌ी◌ं इरज्ञि), सीरियाच्या गोलन टेकड्या व इजिप्तचे सिनाई द्वीपकल्प आपल्या अधिपत्याखाली आणले. युनोने ठराव करून त्या प्रदेशातून इस्त्राएलने आक्रमण उठवावे असा आदेश दिला. पण इस्त्राएलने युनोचा ठराव धुडकावून लावला. इस्त्राएलच्या आक्रमक धोरणांमुळे हजारो पॅलेस्टिनी निर्वासित बनले.

मूळ पॅलेस्टाईन राष्ट्राच्या ७०% प्रदेश तर इस्राएलने व्यापला आणि उरलेल्या फक्त ३०% भूमीवर स्वतंत्र पॅलेस्टिनी राष्ट्राला मान्यता द्यायलाही इस्त्राएल तयार नाही.

अरब व उंट : अरब व उंट या कथेप्रमाणे इस्त्राएली उंटाने अरबांनाच त्यांच्या तंबूबाहेर काढले. वास्तविक पाहाता एक इंचही पॅलेस्टिनी भूमीवर इस्त्राएलचा हक्क नाही आणि तशीच पॅलेस्टिनी मुक्ती आघाडीची भूमिका होती. परंतु अमेरिकेचे दडपण आणि इस्त्राएलच्या मग्रूर आक्रमणाखाली मुक्ती आघाडीचे नेते यासर अराफत नमले आणि त्यांनी इस्त्राएलचे अस्तित्व मान्य केले. त्यानंतर तरी करारानुसार आखून दिलेल्या सीमा इस्त्राएल पाळेल अशी अराफतना आशा होती. पण करार धुडकावून इस्त्राएलने हल्ले व अतिक्रमणे चालूच ठेवली. पॅलेस्टाईनची नाकेबंदी करून अन्न, औषध पुरवठा रोखून अन्नान्नदशा केली. पॅलेस्टाईन नामशेष करण्यासाठी चालू असलेल्या इस्राएलच्या राक्षसी हल्ल्यांमुळे संतप्त झालेले पॅलेस्टिनी आपल्या हक्कांसाठी लढत आहेत. हा "मुक्तीलढा' दहशतवादी आहे असा अपप्रचार करून त्यांना शिक्षा करण्याच्या नावाने इस्त्राएलचे अरबभूमीवर अतिक्रमण व हिंसाचार चालू आहेत.

इस्त्राएलनिर्मितीच्या षड्>यंत्री कारवाईतून अमेरिकेने अमेरिकेतील धनाढ्य–बलाढ्य ज्यूंना खूष ठेवले, जगातील ६५% ज्ञात तेल साठे असलेल्या आखाती देशांच्या मर्मस्थानी आपला हस्तक बसवून अरब देशांना मुठीत ठेवले आणि इस्त्राएल व अरब राष्ट्रे यामध्ये हाडवैर असल्याने सतत युद्धे तेवती ठेवली. त्यासाठी इस्त्राएलला प्रचंड शस्त्रपुरवठा तर केलाच, शिवाय सौदी अरेबिया, इराण, (१९७९ नंतर चोरून) इराक, कुवेत, इजिप्त, लेबानन, जॉर्डन यांना (तिसऱ्या जगाला अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंडने केलेल्या शस्त्रपुरवठ्याच्या सुमारे ६०%) विमाने, रणगाडे, क्षेपणास्त्रे, शस्त्रास्त्रे आदी विक्री करून मोठी बाजारपेठ मिळवली. अशा रीतीने एका षड्>यंत्री कारवाईतून अमेरिकेने तिहेरी फायदा करून घेतला.

युद्धे व शस्त्रोद्योग : १६ एप्रिल १९५३ रोजी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यावर आयसेनहोवरने खंत व्यक्त केली की, ""आपण बनवलेली प्रत्येक बंदूक, सोडलेले प्रत्येक क्षेपणास्त्र, बांधलेली प्रत्येक युद्धनौका तयार होेते ती चोरीच्या बळावर भुकेने व्याकूळ झालेल्यांच्या तोंडचा घास काढून, थंडीने गोठलेल्यांचे वस्त्र हिरावून ही चोरी केलेली असते.''

""शस्त्रास्त्रांवर जग केवळ पैसाच खर्च करते असे नाही तर श्रमिकांचा घाम व शास्त्रज्ञांची बुद्धीही त्यामध्ये खर्ची पडते आणि बालकांची आशा उद्ध्वस्त होते. नि:शस्त्रीकरण करून वाचवलेला निधी जगाची पुनर्बांधणी व मदत याकरता उपलब्ध करून देण्यासाठी अन्य देशांबरोबर एका नव्या युद्धात सामील व्हावे अशी आपल्या लोकांना विनंती करण्यास हे शासन तयार आहे.''

""या नव्या युद्धाची स्मारके असतील रस्ते, शाळा, घरे, इस्पितळे, अन्न, आरोग्यसेवा..... दहशत पसरवण्यासाठी नव्हे, तर जगाच्या गरजा भागवण्यासाठी आमचे सामर्थ्य समर्पण करायला आम्ही तयार आहोत.'' असे अमेरिकेचे प्रेसिडेंट म्हणाले खरे, पण प्रत्यक्ष धोरण ठरवते अमेरिकेचे सर्वेसर्वा– भांडवलाशाहीचे अध्वर्यु – तेल कंपन्या आणि शस्त्रास्त्र कंपन्या यांची नफेखोरी!

शस्त्रास्त्रांचे राजकारण : तेल हे युद्धाचे एक कारण त्याप्रमाणे शस्त्रास्त्रविक्री हे तेवढेच महत्त्वाचे कारण आहे. म्हणूनच इराकवर अखंड बॉम्बहल्ले व क्षेपणास्त्र हल्ले करून शस्त्रास्त्रे खपवण्यात आली. शिवाय नवनव्या शस्त्रास्त्रांची चाचणी आणि या प्रभावी शस्त्राची जगभर दहशत बसवणे हाही हेतू युद्ध पेटवण्यामागे होताच. अफगाणिस्तानवरील हल्ल्यातूनही हे दोन्ही हेतू साध्य केले. अमेरिकेला "आपण करू तोच कायदा' हे त्यातून अखिल जगावर ठसवता आले.

१९४५ पासून अमेरिका जगावर दहशत बसवण्याचा आणि शस्त्रास्त्र बाजारपेठ तेजीत ठेवण्याचा अमानुष डाव खेळत आहे. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा पाडाव झाला होता, जपान शरण यायला तयार होते, सोविएत लालसेना जपानमध्ये ९ ऑगस्ट १९४५ रोजी तैनात होणार होती. परंतु अमेरिकेने १६ जुलै रोजी अणुबाँबची जिवंत चाचणी घेतली व अमेरिकेच्या हाती असलेल्या महासंहारक अस्त्राची दहशत साऱ्या जगावर बसवण्याचा मोका साधण्याचा निर्णय अमेरिकेचे अध्यक्ष ट्रूमन यांनी घेतला. सोविएत युनियनच्या लालसेनाचा जपानप्रवेश रोखणे व जपानचा पुरा ताबा अमेरिकेने घेणे हाही हेतू त्यामागे होताच.

१९४५ साली जर्मनीच्या भयाने जगभरच्या अग्रगण्य शास्त्रज्ञांनी एकत्र येऊन अथक प्रयत्नांती अणुबॉम्ब हे भीषण संहारक अस्त्र निर्माण केले व मोठ्या विश्वासाने ते ज्या राष्ट्राला "लोकशाही' राष्ट्र मानत होते त्या अमेरिकेच्या हाती दिले. त्याचा प्रत्यक्ष वापर करू नये पण जर्मनीने जर अणुबाँब बनवला तर त्याचा प्रतिरोधात्मक उपयोग व्हावा अशी शास्त्रज्ञांची दृष्टी होती. म्हणून अणुबाँब प्रत्यक्षात वापरू नये यासाठी आटोकाट प्रयत्न आईन्स्टाईन व अन्य शास्त्रज्ञांनी केला. पण अमेरिकेच्या शस्त्रास्त्र उद्योगाला मोठा नफेशीर

धंदा व जगाला नमते ठेवण्याची ताकद असलेले अण्वस्त्र अमेरिकन सत्ताधीश थोडेच सोडणार होते?

अणुबाँबची दहशत : ६ ऑगस्टला हिरोशिमावर युरेनियम अणुबाँब व ९ ऑगस्टला नागासकीवर प्लुटोनियम अणुबाँबचा महासंहारक हल्ला अमेरिकेने केला आणि साऱ्या जगावर अणुबाँबची दहशत बसवून पहिले आधुनिक दहशतवादी राष्ट्र बनण्याचा मान अमेरिकेने पटकावला. अणुबाँबचे महाप्रलयंकारी स्वरूप सिद्ध झाल्यावर  अमेरिकेने ड्रॉपशॉट योजनेखाली ३०० अणुबाँब बनवून सोविएत युनियन बेचिराख करणाची योजना आखली. तेव्हा सोविएत युनियनने स्वसंरक्षणासाठी अणुबाँब संशोधन पुढे नेऊन १९४९ साली अणुबाँबचा चाचणीस्फोट केला. त्याबरोबरच अण्वस्त्रबंदीची जोरदार मागणीही केली. पण अमेरिकेने ती फेटाळली व सोविएत युनियनला अण्वस्त्रस्पर्धेत ओढले. हायड्रोजन बाँब, क्षेपणास्त्रे असे नवेनवे शोध लावून अमेरिकेतील शस्त्रास्त्र उद्योगांना वाढती बाजारपेठ दिली आणि सोविएत युनियला त्यात गुंतवून त्यांच्या आर्थिक–सामाजिक विकासाला खीळ घातली. १९४० ते १९९६ या काळात आण्विक कार्यक्रमावर अमेरिकेने सुमारे ५४०० अब्ज डॉलर (१९९६ च्या किमतीत) खर्च केले. १९४८ साली जगात फक्त अमेरिकेकडे अणुबाँब होते व त्यांची संख्या ११० होती. ती संख्या वाढत जगातील अण्वस्त्र संख्या १९८० मध्ये ५५००० पर्यंत गेली.

केन्सियन मिलिटरी इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स : दुसऱ्या महायुद्धात अमेरिका ही ब्रिटन व मित्र राष्ट्रांची शस्त्रागर बनली होती. शस्त्रास्त्र निर्मिती–उद्योग मोठ्या भरभराटीत होते. युद्ध समाप्तीनंतर शस्त्रास्त्रउद्योगांची मागणी एकदम कमी होऊन औद्योगिक मंदीचा मोठा धोका होता. तो टाळण्यासाठी अमेरिकेने "केन्सियन मिलटरी इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स' उभारण्याचा निर्णय घेतला. याचा अर्थ केन्सच्या अर्थशास्त्राच्या तत्वाप्रमाणे औद्योगिक मंदी येऊ नये म्हणून राज्य शासनाने लष्करी उद्योग वाढीला प्रोत्साहन द्यायचे. कराद्वारे गोळा केलेला पैसा अत्याधुनिक लष्करी तंत्रविज्ञानाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करायचा व तो धंदा फायदेशीर बनला की खाजगी कंपन्यांनी तो ताब्यात घ्यायचा असे धोरण स्वीकारले. नागरिकांनी लष्करी संशोधनाकरता कराचे मोठे ओझे निमूट मान्य करावे यादृष्टीने अमेरिकेने एका बाजूला कम्युनिझमचा बागोलबुवा उभा करून अण्वस्त्रे–क्षेपणास्त्रे उद्योगांसाठी मोठी बाजारपेठ तयार केली. कम्युनिझमला रोखण्याचे निमित्त करून तैवान, कोरिया, विएतनाम येथील अमेरिकेच्या टाचेखालील शासनांना शस्त्र पुरवठा केला व प्रत्यक्ष युद्धातही अमेरिका उतरली. प्रथम चीन (१९४५–४९) नंतर कोरियावर आक्रमण केले (१९५०–५३) व २५ लाखांचा बळी घेतला. विएतनाममध्ये (१९६५–७५) आक्रमण करून ३० लाख लोक मारले, देश उध्वस्त केला, रासायनिक फवारे मारून जंगले व शेती नष्ट केली. जगभरचे क्रांतिकारी लोकलढे दडपण्यासाठी प्रतिक्रांतिकारकांना शस्त्रास्त्रे पुरवली. शिवाय प्रतिगामी बाहुले शासनांना पैसा व शस्त्रपुरवठा करून अनेक प्रागतिक शासनांचे उच्चाटन करून अमेरिकेने आपले

हस्तक सत्तास्थानी आणले व या हूकुमशाही शासनकत्र्यांयनी लोकलढे चिरडून हजारोंचे बळी घेतले. उदा. इराण (१९५१), चिले (१९७६), अफगाणिस्तान (१९७८-२००१), निकरागुआ (१९८०), युगोस्लाव्हिया (२०००) इ. अमेरिकेच्या अशा पाशवी हस्तक्षेपाने सुमारे १ कोटी जनता मृत्युमुखी लोटली.

जागतिक मंदी : ११ सप्टेंबरच्या न्यूया्ॅर्कवरच्या हल्ल्याचे निमित्त करून अफगाणिस्तानवर बॉंब हल्ले करून युद्ध लादण्याचा मोका अमेरिकेने साधला, याला जागतिक मंदी हेही एक कारण आहे. १९९७ पासून जागतिक भांडवलशाही आर्थिक अरिष्टात सापडली आहे. आर्थिक विकासाचे आदर्श "आशियाई वाघ'- दक्षिण कोरिया. तैवान, इंडोनेशिया आदी देशातील भरभराटीचा डोलारा १९९७ मध्ये कोसळला. जपान मंदीच्या फेऱ्यात सापडले. खुद्द अमेरिकेतही माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात आर्थिक अरिष्ट येऊन मंदीचे सावट दाट होऊ लागले. अशा आर्थिक अरिष्टातून बाहेर पडण्याचा साम्राज्यशाही देशांचा मार्ग म्हणजे युद्ध व विध्वंस. असा विध्ंवस करून वर मदतीचा आव आणून निर्वासितांना अन्नाची पुडकी, पांघरुणे, औषधे पुरवून त्याचीही बाजारपेठ निर्माण केली जाते. मुख्य म्हणजे बॉंब हल्ल्याने उध्वस्त केलेली शहरे, गावे, रस्ते आदी पुनर्बांधणीच्या कामासाठी अमेरिकी करदात्यांकडून गोळा केलेला निधी "मदत' म्हणून अफगाणिस्तानला देऊन त्याआधारे बाजारपेठ विस्तारायची असाही डाव आहे. अफगाणिस्तानविरोधी पुकारलेल्या युद्धाचे बुश यांनी "नव्या शतकातील पहिले जागतिक युद्ध' असे वर्णन केले ते सूचक आहे. २० व्या शतकातील दोन्ही महायुद्धे आर्थिक अरिष्टातून बाहेर पडण्यासाठीच खेळली गेली. ती युरोपात खेळली गेली. आता आशिया खंडात - भारतीय उपखंडाच्या अंगणात अमेरिकेने नव्या शतकातील पहिले जागतिक युद्ध २००१ साली अफगाणिस्तानमध्ये तर २००३ साली दुसरे युद्ध इराकमध्ये पेटवले, हे भयूसूचक आहे.

अमेरिकी जनमत : अमेरिकेमध्ये सदसद्विवेकबुद्धी असलेले विचारी अमेरिकन अमेरिकेच्या जागतिक दहशतीबद्दल व क्रूर अत्याचार व विध्वंसाबद्दल निश्चितच प्रश्न विचारत आहेत. पण मीडियाचा प्रसार मात्र सूडाचा आहे आणि तो सूड वेगळ्या वंशाच्या, वेगळ्या धर्माच्या आणि प्रसारमाध्यमांनी "दैत्य' म्हणून जनमानसात द्वेषाचे विष पेरेलेल्या ओसामा व अल् कायदाविरुद्ध उगवायचा आहे. अमेरिकेतील प्रसारमाध्यमे जनसामान्यांच्या मनाची घडणच बालपणापासून हाणामाऱ्या, लढाया आणि सूड, क्रौर्य याचे बाळकडू देऊन भ्रष्ट व विकृत बनवतात. म्हणूनच इराकवर, अफगाणिस्तानवर बॉम्बहल्ले करून हजारो निरपराध नागरिकांची हत्या अमेरिकी सेना करीत असताना, त्याचे चित्रण अमेरिकी नागरिक थंडपणे पाहातात. तेथील प्रसारमाध्यमे बड्या तेलकंपन्या, लष्करी कंपन्या यांच्या मुठीत आहेत. त्यांची जगभरची लूट व आक्रमण यांना अमेरिकन जनतेने होकार भरावा असा मतलबी प्रचार करून जनतेला त्या काबूत ठेवून आहेत आणि म्हणूनच नागरिकांकडून वसूल केलेल्या कराचा वापर अमेरिकेची जागतिक हूकूमत टिकवायला आणि निरपराध नागरिकांची हत्या करायला वापरली तरी जनतेचा विरोध नाही. कारण अखेर

जगाची लूट करून बहूराष्ट्रीय कंपन्या गबर होत जातात, हे जेवढे खरे, तेवढे हेही खरे की, त्यातून अमेरिकेची श्रीमंती वाढते. त्यातले काही तुकडे कामगार, सेवक यांच्याही पदरात पडतात. अमेरिकन गोर्‍यांच्या दृष्टीने काळे, पिवळे, मुस्लिम, अरब हे धोकादायक ठरवले जातात. अमेरिकन स्वातंत्र्य (जगाची लूट करण्याचे) आणि संस्कृती (निरपराध जनतेची कत्तल करण्याची) याला विरोध करणारे कम्युनिस्ट,> असा अपप्रचार करून कम्युनिस्टांना चिरडून टाकण्याच्या कामगिरीवर अमेरिका ७५ वर्षे होती. गेल्या ५० वर्षात अत्याधुनिक शस्त्रे, विमाने व युद्धयंत्रे अधिकच विकसित झाल्याने तर अमेरिकेची जागतिक जुुलुमजबरदस्ती आणि दहशतवाद एवढे भीषण स्वरूप धारण करून आहे की, त्याला विरोध करायची टाप आज कोणत्या देशात उरलेली नाही. सद्दाम हूसेनप्रमाणे विरोध केलाच तर संपन्न इराकचे स्मशान आणि १२ वर्ेेष आर्थिक निर्बंधांखाली चिरडून लाखो इराकींची अन्नऔषधाविना हालहाल होऊन यमसदनी रवानगी हे फलित भोगावे लागले. यावर कळस म्हणजे इराकमध्ये महासंहारक अस्त्रे आहेत असा खोटा आरोप करून अमेरिकेने २० मार्च २००३ रोजी इराकवर सरळ आक्रमण करून इराक पादाक्रांत केले व तेथे आपला लष्करी अंमल जारी केला.

बाँब हल्ल्यात इराकमधील शहरे, वीजनिर्मिती केंद्रे, पाण्याचे साठे, रस्ते व पूल, तेल विहिरी, तेल उद्योग व इतर उद्योग, इस्पितळे, शासकीय कचेर्‍या, शिक्षणसंस्था उध्वस्त करण्यात आल्या. हजारो लोक मृत्युमुखी पडले आणि लाखो घायाळ झाले. इराकवर अमेरिकन सेनेची अधिसत्ता सुरू झाल्याबरोबर चोर्‍यामार्‍या, जाळपोळ आणि लुटालूट यांचा थयथयाट सुरू झाला. तोवर बगदादमध्ये स्त्रिया सुरक्षितपणे व मोकळेपणाने वावरू शकत होत्या. अमेरिकी शासनाखाली स्त्रियांची व मुलींची सुरक्षितता धोक्यात आली. अमेरिकेने हजारोंवर बेकारी लादली. इराकी जनतेची चोहोंबाजूंनी दुर्दशा केली. एवढा असुरी विध्वंस अमेरिकेने घडवला केवळ तेलासाठी! इराकी जनता मात्र अमेरिकेच्या लष्करी अमलाविरुद्ध झुंजार लढा देत आहे.

१.३ लाख  अमेरिकी सेनेमार्फत बेमुर्वतपणे हजारो इराकींची कत्तल (मृतांची नेमकी मोजदाद अशक्य, अंदाजे  संख्या २० ते ५० हजार) करून हाती सत्ता ठेवणार्‍या पॉल ब्रेमरने मात्र ओरड सुरू केली की, ""इराकींना जर वाटत असेल की तोफेच्या गोळ्यांच्या जोरावर सत्ता मिळवता येते तर ते चालून देणार नाही.'' इराकवर आक्रमण करून बाँब, तोफांच्या जोरावर इराकवर सत्ता कायम ठेवण्याचा अमेरिकेला अधिकार आहे, पण आक्रमण रोखणारे इराकी मात्र दहशतवादी! स्वातंत्र्य व लोकशाहीच्या विटंबनेची ही परिसीमाच!

इराकवर आपली अधिसत्ता कायम ठेवण्यासाठी धर्माचा एक्काही अमेरिका अत्यंत अधम पद्धतीने वापरत आहे. २००३ एप्रिलपर्यंत बाथ पक्षाच्या राजवटीत अरब सुन्नींच्या हाती सत्ता केंद्रित होती. अमेरिकी

लष्करशाहीच्या कडव्या विरोधात अरब सुन्नीच आघाडीवर आहेत. सद्दाम राजवटीत ते मोठ्या संख्येने सैन्यात असल्याने त्यांच्याजवळ मोठा शस्त्रास्त्र साठाही आहे. परंतु सुन्नी अल्पसंख्य आहेत. तेव्हा शिया (५५%) व कुर्द (२०%) नेत्यांना हाती धरून अमेरिकेने "बाहूले'शासन स्थानापन्न केले. शिया विरुद्ध सुन्नी अशी दुफळी वाढवून यादवी युद्ध माजविणे, इराकची फाळणी करणे, अशी खेळी अमेरिकी वर्चस्व कायम ठेवण्यासाठी अमेरिका खेळत आहे. बाथ पक्षाने धर्म व शासन यांची फारकत, बुरख्याबाहेर पडून स्त्रियांना शिक्षण, नोकरीची संधी अशी धोरणे स्वीकारलेली होती. याउलट अमेरिकी लष्करी जुलुमशाहीखाली धार्मिक मूलतत्त्ववादाला खतपाणी घातले जाऊन इतिहासाची चाके मागे फिरवली जात आहेत.

धार्मिक मूलतत्त्ववाद : धार्मिक मूलतत्त्ववाद जगात नवा नाही. त्यामुळे प्रगतीचा गाडा नेहमीच उलटा फिरवला गेला आहे. मग तो बौद्ध विचार मागे सारून आपले वर्चस्व पुन:स्थापन करणारा कर्मठ ब्राम्हणवाद असो, अरब राष्ट्रात बुद्धिप्रामण्यवादी मुताझिलितांचा कर्मठ अशराईतांनी १२ व्या शतकात केलेला पराभव असो किंवा ताजिकीस्तानमध्ये सोविएत काळात स्थिरावलेल्या शासनसंस्थेतील धर्मनिरपेक्ष भूमिकेची पीछेहाट करून तेथे शासनावर धर्मवादाचा पगडा बसवण्याचा गेल्या दहा वर्षातला प्रयत्न असो. परंतु अमेरिकी ब्रँडचा अलिकडचा दहशतवादी धार्मिक मूलतत्ववाद विशेषच घातक आहे. कारण तो पैशाच्या जोरावर जगभर पसरवला जात आहे. अमेरिकेच्या, सौदी अरेबियाच्या पैशावर पोसलेल्या अल्–कायदा आदी संघटना धर्मांध कडव्या राजवटीचा पुरस्कार करत आहेत. ही धर्मांध राजवट मध्ययुगीन शरियाच्या नावाखाली समाजाला बंदिस्त करील, जगातल्या निम्म्या लोकसंख्येला – स्त्रियांना सामाजिक अस्तित्वच नाकारून चार भिंतीच्या तुरुंगात कोंडेल आणि लोकशाहीहक्क, नागरीहक्क याची पुरी पायमल्ली करून धर्माच्या नावाने मुल्लांची हूकुमशाही सर्व जनतेवर लादेल. अल्–कायदाची महत्त्वाकांक्षा आहे की मक्का मदिनेची पवित्र भूमी पावन करण्याच्या नावाने सौदी अरेबियाच्या भ्रष्ट शेखांना पदच्युत करून सौदी अरेबियाच्या गडगंज तेल संपत्तीच्या जोरावर मुस्लिम मध्ययुगीन हूकुमशाही अंमल जारी करायचा व जनतेचे आचार, विचार, आविष्कार – सर्व स्वातंत्र्य हिरावून घ्यायचे. अमेरिकेने निर्माण केलेला दुराचार नष्ट करण्याच्या नावाने आज अमेरिकेबाबत जगभर असलेल्या द्वेषभावनांवर स्वार होऊन हा प्रसार चालू आहे आणि त्यामुळे जनसामान्यांची दिशाभूल होत आहे. खरेतर, लादेन हा सी.आय.ए.चा हस्तक. अनेक कंपन्या व धंद्यांचा मालक, वाममार्गाने पैसा गोळा करणारा, सी.आय.ए.प्रमाणेच दहशतवादी कारवाया करणारा, सी.आय.ए.चेच प्रतिरूप आहे. त्याला अमेरिकेनेच उभा केला.पण १९९८ साली त्याला दहशतवादी ठरवला.

१९९१ साली सोविएत युनियनमधील समाजवाद कोलमडल्यावर अमेरिकेला कम्युनिझम हा शत्रू उरला

नाही तेव्हापासून अमेरिकेने इस्लामशी शत्रुत्वाची भाषा सुरू केली. कारण युद्धे व शस्त्रोत्पादन याला नवे समर्थन शोधण्याची अमेरिकेला गरज निर्माण झाली. तेव्हा "इस्लामी दहशतवाद' हा नवा शत्रू (ीःहश 'ीःिहशी') अमेरिकेने उभा केला.धर्मवेड्या दहशतवादाला गेल्या १५–२० वर्षांत अमेरिका खतपाणी घालू शकली, त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे सोविएत युनियनमधील समाजसत्तावादाची पीछेहाट झाल्याने नवसमाजनिर्मितीबाबत निर्माण झालेली पोकळी आणि सोविएत युनियनचा अंकुश दूर झाल्याने साम्राज्यवाद्यांची बेगुमान हूकूमशाही. जागतिक साम्राज्यशाही शोषणामुळे आफ्रिका, दक्षिण अमेरिका, भारत – जगभरची जनता जीवनातून उठवली जात आहे. आणि अशा वैफल्यग्रस्त तरुणांना अमेरिकी पैसा कडव्या धार्मिक दहशतवादी संघटनांकडे ढकलत आहे. त्याबरोबर अशी मिथके प्रसृत केली जातात की "इस्लाम' धर्मातच जिहादची* – दहशतवादाची शिकवण आहे. या पार्श्वभूमीवर धर्म ज्या समाजाची स्वप्ने पाहातो – न्याय, बंधुताधिष्ठित समाज – पण केवळ धर्मोपदेश – प्रचार केल्याने जे साध्य होणे शक्य नाही, ते समाजवादी समाजअर्थरचनेत कसे शक्य झाले व त्याबरोबर धर्माचे स्थानही कसे बदलले याचा सोविएत युनियनमधील अनुभवाचा आढावा उद्बोधक ठरेल.

***जिहाद** : माणसातल्या पशुतुल्य वृत्तींशी झगडा म्हणजे महाजिहाद (सीशरींशी गळहरव). निसर्ग आणि इतर माणसांचे शोेषण करण्याच्या अपप्रवृत्तीला आवर घालण्यासाठी माणसाने केलेला अंतर्गत झगडा म्हणजे जिहाद. लघु (श्रशीीशी) जिहाद म्हणजे व्यक्तीवर हल्ला झाला तर जीवित, वित्त याच्या बचावासाठी झगडा, राष्ट्रावर युद्ध लादले गेले तर स्वरक्षणासाठी लढा. आधुनिक संदर्भात "पददलितांना' न्याय मिळवण्यासाठी झगडा म्हणजे जिहाद.

## ४. समाजसत्तावादाखाली धर्मवादाचा लय

समाजसत्तावादाची स्फूर्ती : माक्र्सचा कम्युनिस्ट मॅनिफेस्टो १८४८ साली प्रसिद्ध झाला आणि "नाहिरें'ना एक नवी जाज्वल्य स्फूर्ती मिळाली. सत्तासंपत्तीधारकांची हूकुमशाही उलथवून श्रमणाऱ्यांची, राबणाऱ्यांची सत्ता स्थापन करायची; श्रमिकांचे शोषण करून त्या लुटीच्या आधारे मूठभरांची गडगंज श्रीमंती व ऐषाराम यासाठी जगाची साधनसंपत्ती वापरली जाते ही मक्तेदारी तोडून सर्व जनतेला अर्थपूर्ण काम आणि चांगले जीवन जगण्यासाठी जगाची संपत्ती वापरायची आणि यासाठी जगभरच्या कामगारांची एकजूट उभारून आणि प्रदीर्घ लढा देऊन कामगारांची अधिसत्ता स्थापन करायची हे ध्येय कम्युनिस्ट जाहिरनाम्याने श्रमिक जनतेपुढे ठेवले. शोषणविरहित, न्याय्य समाजाचे हे स्वप्न नवे नव्हते. पण या विचारप्रणालीत माक्र्सने प्राण घातला तो त्याला शास्त्रीय विचारांनी भक्कम भौतिक बैठक देऊन. अर्थसमाजव्यवस्थेचे शास्त्रशुद्ध वि ेषण करून भांडवलाची हूकुमत कशी उखडता येईल याचे मार्गदर्शन  माक्र्सविचाराने केले. माक्र्सविचार हे श्रमिकांचे अस्त्र बनले. त्याच्या आधारे कामगारांच्या संघटना, वासाहतिक देशांचे स्वातंत्र्यलढे जोमाने वाढले. कम्युनिस्ट पक्षांची स्थापना होऊन हजारो ध्येयप्रेरीत विचारवंत, कामगार व तरुण माक्र्सविचाराने प्रभावित होऊन क्रांतिलढ्यात उतरले. त्याचा परिपोष म्हणजे १९१७ सालची रशियातील समाजवादी क्रांती व सोविएत युनियनची समाजवादी दिशेने वाटचाल. येथे सोविएत युनियनमधील मध्य आशियाई प्रजासत्ताकामधील मुस्लिम समाजामध्ये समाजवादाने घडवलेल्या परिवर्तनाचा धावता आढावा घेऊ. भौतिक परिस्थितीत आमूलाग्र सुधारणा झाल्याने समाजजीवनातील धर्माचे स्थान कसे बदलते हे त्यातून स्पष्ट होईल. धार्मिक मूलतत्ववादामुळे निर्माण झालेल्या स्फोटक परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा यादृष्टीने हे समालोचन उपयुक्त होईल.

मुस्लिम समाजात समाजवादी परिवर्तन : सोविएत आशियाई मुस्लिम समाजात सोविएत युनियनने एका पिढीत मोठे क्रांतिकारक बदल घडवले ते सर्व स्त्री–पुरुषांना शिक्षण, काम व चांगले जीवन जगण्याची संधी व शाश्वती सोविएत शासनाने दिल्यामुळे. मध्य आशियाई प्रजासत्ताकांची ही क्रांतिकारी वाटचाल स्पष्ट करते की न्याय्य, समानतापर, समाजवादी व्यवस्था, आर्थिक स्वास्थ्य आणि समृद्ध सांस्कृतिक जीवन प्रस्थापित केल्याने तोपर्यंत जीवनाच्या अंगप्रत्यंगावर पकड असलेल्या इस्लाम धर्माला तरुण पिढीच्या दृष्टीने व्यक्तिगत इच्छा व गरज यानुसार अधिभौतिक पातळीवर स्थान राहिलेआणि हे बदल समाजवादी समाज निर्मितीच्या दिशेने केलेल्या सांस्कृतिक व भौतिक प्रगतीमुळे घडून आले. धर्म व शासन यांची फारकत, धर्म व कौटुंबिक कायदा यांची, धर्म व सामाजिक रीतीरुढी (बुरखा) यांची फारकत घडवून इस्लामचे स्थान व्यक्तिगत अध्यात्मिक  पातळीवर राहिले. हीच गोष्ट ख्रिश्चन धर्माची झाली. ही प्रक्रिया

समजण्यासाठी आपणास या बदलांचा धावता ऐतिहासिक आढावा घेणे गरजेचे आहे.

सोविएत मध्य आशियाई प्रजासत्ताके म्हणजे अफगाणिस्तानच्या उत्तरेचा सिंकियांग (चीन) व कॅस्पियन समुद्रापर्यंतचा प्रदेश. उन्हाळ्यात ४०° सेटीग्रेडच्या वर तापमान जाते तर हिवाळ्यात – २०° सेटीग्रेड. पाऊस तुरळक – ५०–६० मि.मी. ते २०० मि.मी. डोंगरदऱ्या, विस्तीर्ण गवती कुरणे व वाळवंटाचा मुलुख. भटके मेंढपाळ व तुरळक शेतीची हिरवी बेटे. चीनमधून आखाती देश व युरोपकडे जाणारा रेशीम मार्ग मध्य आशियातून जातो. त्यामुळे भारताप्रमाणेच कधी परकीय साम्राज्ये, कधी सैन्यांची धाड (चंगीजखान, तैमुरलेन) आणि एरवी विविध लहानमोठ्या खान, अमीर यांच्या लढाया, असे वादळी अस्थिर जीवन. अमीर–खान, जमीनदार, मुल्ला–इनाम यांच्या राजकीय–आर्थिक–धार्मिक हूकुमशाहीखाली श्रमिक जनता पूर्णतया भरडलेली होती. अन्नान्न दशेमुळे मूठभर तांदळाची भीक मिळावी म्हणून अल्लाला आळवणारी. संपूर्ण निरक्षर व अंधश्रद्धांनी वेढलेली. स्त्रिया तर पडद्याआड, गुलामीच्या अंधारमय जीवनात कोंडलेल्या होत्या.

मध्य आशियात इस्लामचा प्रसार झाल्यावर टोळी जीवनातील "शमान'ची जागा मुल्लाने घेतली. त्याच्या अंगी दैवी शक्ती आहे, अशी जनतेची गाढ श्रद्धा. जनतेप्रमाणेच मुल्लाही गरीब व अडाणी असत. पण मंत्रतंत्र, जादूटोणाच्या जोरावर निसर्गाचा कोप, साथीचे रोग, भुतेखेते ते रोखू शकतात अशा भावनेने जनता त्यांच्या पकडीत होती. दैवी चमत्काराच्या आधारे दैन्य विपन्नावस्था सोसत राहिली. मृत्यूनंतरच्या स्वर्गाच्या आशेवर आजचे दु:ख सहन करत होती. रोजच्या उध्वस्त जीवनात धार्मिक सण, जत्रा अशा विरंगुळ्याच्या दिलाशावर जगत होती. मुल्ला, इमाम आदी धार्मिक गुरू जनतेच्या अंधश्रद्धेचा पुरा फायदा उठवून आपले वर्चस्व कायम ठेवून होते.

एकोणिसाव्या शतकात मध्य आशियाई देश रशियन झारशाहीखाली आल्यानंतर उद्योग, रेल्वे–रस्ते, व्यापारवृद्धी असा अल्पसा भांडवली विकास तेथे सुरू झाला व रशियन जनतेशी संबंध वाढला. त्यातून वेगळ्या विचाराचे वारेही पोचू लागले आणि १९१७ साली सोविएत समाजवादी क्रांती झाल्यावर जरी खान, अमीर व मुल्ला, इमाम यांनी कडवा विरोध केला व ते सोविएतविरोधी$ झुंड–गुंड टोळ्यांना सामील झाले, तरी जनतेच्या चिवट लढ्यामुळे सोविएत शासन तेथे स्थिरावले. १९२० पासून सामाजिक–आर्थिक–सांस्कृतिक बदलांना सोविएत शासनाने आरंभ केला. अमीर –खान व धर्मगुरुंची अधिसत्ता नष्ट करून सोविएत शासनाने औद्योगिक विकास, धरणे–कालवे, वीज व शेतीचा विकास वेगाने केला. श्रमिक जनतेला या विकास कार्यक्रमात समर्थपणे सहभागी होता यावे यादृष्टीने आरोग्य सुविधा व शिक्षण विस्तार, शास्त्रीय तंत्रवैज्ञानिक व सांस्कृतिक प्रगती, वैचारिक प्रगल्भता आणि स्त्री–विमुक्ती हे पायाभूत होते. त्यादृष्टीने शासनाने सर्वांगिण कार्यक्रम हाती घेतले. साक्षरता मोहीम आणि स्त्री विमुक्ती चळवळ यासाठी रशियातून

शिक्षित स्त्रिया व कामगार, प्राध्यापक, शास्त्रज्ञ मोठ्या संख्येने तेथे आले. त्यांनी प्रशिक्षण वर्गातून स्थानिक शिक्षक मोठ्या संख्येने तयार केले. तेथील मुस्लिम स्त्रियाही कडव्या सामाजिक विरोधाला तोंड देत बुरखा–त्याग करून शिक्षण मोहिमेत सामील झाल्या. शिक्षण मोहिमेला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत गेला. १९०० च्या प्रारंभी रशियातील शिक्षणतज्ज्ञांच्या मते मध्य आशिया पुरा साक्षर करायला ४६०० वर्षे लागतील तर सोविएत क्रांतीने ते केवळ दोन पिढ्यात – ५० वर्षांत साधले. माध्यमिक शिक्षणापर्यंतचे शिक्षण सार्वत्रिक केले (सर्वच शिक्षण मोफत) आणि उच्च शिक्षणसंस्थांतील विद्यार्थ्यांयचे प्रमाण जर्मनी–फ्रान्समधील प्रमाणाच्या दोन–अडीचपटीवर गेले. स्त्रीमुक्तीसाठी साक्षरता मोहीम व स्त्रियांना जमिनीचे हक्क देऊन शेतावर स्वतंत्रपणे कामासाठी संघटित करून त्यांना नव्या आगळ्या–मोकळ्या जगात आणले व त्यांनी वायूवेगाने भरारी मारली. बुरखा, जाचक सामाजिक बंधने झुगारली. शिक्षिका, शास्त्रज्ञ, डॉक्टर, सामूहिक शेतप्रमुख, आदी हरतऱ्हेची जबाबदारीची पदे मिळवली. प्रत्येक स्त्रीला कामाची संधी दिल्याने एकूण कामकऱ्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ४५% वर गेले. शिक्षण व काम याबरोबर उत्तम आरोग्य, खेळ आणि गाणी, नृत्य, नाटक यात स्त्रिया आघाडीवर पोचल्या. अशा आनंदी समृद्ध जीवनामध्ये धर्माच्या वर्चस्वाला स्थान उरले नाही.

धार्मिक स्वातंत्र्य : सोविएत युनियनमध्ये सर्व नागरिकांनी धर्माप्रमाणे उपासना करण्याची पूर्णपणे मोकळीक होती. तसेच इमाम, उलेमा यांच्या शिक्षणासाठी धार्मिक महाविद्यालये (मदरसा) व विद्यापीठ यामध्ये माध्यमिक शिक्षण पुरे झाल्यावर धर्मविषयक शिक्षण घेण्याची सोय होती. मशिदी, कबरी, दुर्मिळ धार्मिक ग्रंथ आदींचे जतन केले. पण तरुण पिढी शाळेत, शिक्षणात, खेळात, कारखान्यात जशी रमू लागली तशी मशीदीतील उपस्थिती कमी होऊन धर्माचे महत्त्व भौतिक विकासाबरोबर आपोआप कमी होत गेले. वैज्ञानिक दृष्टीमुळे अंधश्रद्धा व रुढींचा पगडा दूर झाला. आहार, वेषभूषा यामध्ये पारंपरिक, सांस्कृतिक वारसा टिकवत नवेही स्वीकारले. कृषी समाजातील उमदेपणा, पाहूण्यांचे अतिथ्य हे गुणविशेष कायम राहिले. भांडवलशाहीतील जीवघेण्या स्पर्धेत हे गुण टिकूच शकत नाही. पण स्वास्थ्य, फुरसत व सहकार्याआधारित समाजवादी समाजातील वातावरण हे गुणविशेष राखण्यास पोषक होते.

सोविएत युनियनने शिक्षणप्रसारावर विशेष भर दिला. हजारो पुस्तके, वृत्तपत्रे, विविध भाषांमधून प्रसिद्ध करून नाममात्र किमतीत उपलब्ध करून दिली. कारण वाचनातून विचाराला चालना मिळते आणि विवेकबुद्धी, वैज्ञानिक दृष्टिकोण प्रगल्भ होण्यास मोठी मदत होते. याऊलट अमेरिकेमध्ये विशीच्या दशकापासून टीव्हीच्या प्रसारावर मोठा भर आहे. लहान वयापासून मुलांना टीव्हीमध्ये गुंतवून उपभोगवाद, स्पर्धा, लढाया याचे त्यांना बालकडूच दिले जाते. कारण जाहिरातबाजी करून कंपन्यांचा माल खपवणे हेच ध्येय तेथील प्रचार माध्यमांपुढे आहे. शहाणा, विवेकशील, सज्जन, प्रेमळ माणूस बनवण्याचे, चांगला

समाज बनवायचे ध्येय सोविएत समाजाने पुढे ठेवले. त्यामुळे भौतिक प्रगतीबरोबरच शास्त्र–कला विकासाला मोठे उत्तेजन दिले. अभिजात व आधुनिक संगीत, नृत्य, क्रीडा, निसर्गसान्निध्यातील सहली सर्वांच्या आवाक्यात ठेवून रसिकता जोपसली.

समाजसत्तावादाची पीछेहाट : भांडवलशाही देशांच्या लष्करी, घातपाती कारवाया, अण्वस्त्रस्पर्धा, सांस्कृतिक आक्रमण यामुळे समाजवादी देशातील राजकीय व आर्थिक संस्थांमध्ये लोकसहभाग, विकेंद्रीकरण, लोकशाहीकरण साधण्यात अडथळे आले. राजकीय व अर्थव्यवहारातील सत्तेचे केंद्रीकरण, त्यातून उद्भवणारा भ्रष्टाचार आणि कामगारांचा परात्मभाव यामुळे समाजवादी आदर्श व ऊर्मी टिकवणे आणि उन्नत्त राजकीय – सामाजिक संबंध निर्माण करणे ही प्रक्रिया खंडित झाली. अकार्यक्षमता, उधळमाधळ, बेपर्वाई, वशिलेबाजी याने आर्थिक विकास मंदावला. प्रतिगामी गट प्रबळ होऊ लागले आणि त्याचे पर्यवसन म्हणजे १९९१ साली सोविएत युनियनचे विघटन झाले. सर्व प्रजासत्ताके स्वतंत्र राष्ट्रे बनली. रशियाची आर्थिक मदत बंद झाली. सी.आय.ए., पाकिस्तानच्या मदतीने फोफावलेल्या तालिबानचे हस्तकही धर्मांधतावाद माजवू लागले. ताजिकिस्तानमध्ये तर यादवी माजून जनता पुन्हा गरीब व अगतिक बनली. त्याचा फायदा उठवून दहशतवादी गट त्यांना धर्मवेडाकडे ओढू लागले. कझाकस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान यांनी मात्र मध्यममार्गी धोरण स्वीकारून हळूहळू अर्थव्यवस्था सावरली. समाजसत्तावादाच्या काळातील आधुनिकीकरण, औद्योगिक विकास, धर्म व शासन यांची फारकत, स्त्री–विमुक्ती आदी धोरणे कायम ठेवली. धार्मिक मूलतत्त्ववाद फोफावू देणे हे राजकीय स्थैर्य व सामाजिक–आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने विघातक असल्याने तो काबूत ठेवण्यात आला.

बोस्नियातील धर्मवेड : सोविएत युनियनप्रमाणे पूर्व युरोपीय देशातही समाजसत्तावादाचा अस्त झाला व युगोस्लोव्हियाचे विघटन होऊन तेथे वांशिक–धार्मिक अराजक माजले. युगोस्लाव्हियात कम्युनिस्ट राजवटीखाली बहूसंख्य मुस्लिम लोकसंख्या असलेल्या बोस्नियात निधर्मी, धार्मिक मुस्लिम, ख्रिश्चन हे सारे आर्थिक–सामाजिक प्रगतीत सहभागी होते. वातावरण खुले, बहूरंगी होते. लिंगभेद, धार्मिक दडपण नव्हते. पण १९९२ साल उगवले. डॉक्टर, वकील, प्राध्यापक अशा शिक्षित बुद्धिवाद्यांनीही "इस्लामच्या रानटीपणाच्या धोक्याचा' डांगोरा पिटत ख्रिश्चनांची ऐतिहासिक भूमी "पवित्र' करण्याच्या नावाने वंश विच्छेदन आरंभले. अडीच लाख मुस्लिमांचा बळी घेतला. दहा लाख परागंदा झाले. सारजिवो नष्ट केला. वाचनालये जाळली. कर्मठ पाद्र्यांच्या आशीर्वादाने मृतांच्या शरीरावर सुरीने क्रु$साची खूण निशाणी कोरली. प्रागतिक कम्युनिस्ट विचार–आचारप्रणालीची जागा क्रूर ख्रिश्चन भांडवली दहशतवादाने घेतली

नाहिरेंच्या एकजुटीतील अडचणी : समाजसत्तावादी समाजरचनेचा मार्ग कूबा वगळता आज कोणताच देश चोखळत नाही आहे. त्यामुळे भांडवलशाहीला पर्यायच नाही असा भ्रामक प्रचार चालू आहे. भौतिक

बदलातून न्याय्य, समानतापर मानवी समाज उभारण्याचे आदर्श आज स्वप्नील भासत आहेत, कारण १५० वर्षांपूर्वी कामगारांची संख्या मोठी व वाढती होती आणि ती ट्रेड युनियनच्या छत्राखाली एकेका मोठ्या कारखान्यात संघटित होती, ट्रेड युनियन संघटना क्रांतीच्या शाळा होत्या, आज ती परिस्थिती नाही. बहूराष्ट्रीय कंपन्यांची जगभर साम्राज्ये, संगणकीकरण, कामगारांची घटती संख्या आणि धर्म–वंशाच्या आधारे साम्राज्यवादी शक्तीने पद्धतशीर घडवलेली फाटाफूट यामुळे कामगारवर्ग एकसंघ नाही. साम्राज्यवादी देशातील कामगारांना बहूराष्ट्रीय कंपन्या जगभर लूट करतात त्यातील काही तुकडे मिळतात. त्यामुळे राजकीय जाणिवा प्रगल्भ झाल्याविना जागतिक कामगारांची एकजूट होणे सोपे नाही. समाजवादी क्रांतीसाठीच्या "नाहिरें'च्या एकजुटीत अशा विविध अडचणी असल्याने अनेक देशांमध्ये समाजवादाच्या ध्येयाने प्रेरित संघटना तरुणांना नवी दिशा देतील एवढ्या ताकदवान नाहीत. पण याचा अर्थ समाजवादी विचारांचा पराभव झाला किंवा महत्व संपले असा नाही. रशिया–चीन आदी देशात साम्राज्यशाही आक्रमणाच्या सततच्या माऱ्याखाली समाजवादी समाजरचनेच्या दिशेने प्रयत्न करण्यात पर्वतप्राय अडचणी आल्या आणि काही काळानंतर इच्छित प्रगती खंडित झाली. पण या इतिहासापासून आपण निश्चितपणे शिकू शकतो की यंत्रतंत्राची गुलामी, नोकरशाहीच्या जोखड यामुळे कायम राहाणारा परात्मभाव, संपत्ती व सत्तेचे केंद्रीकरण व त्यातून उद्भवणारी आहेरेंची हूकुमशाही झुगारून  लोकसहभागी, भातृभावी व समानतापर संबंध निर्माण करणारा न्याय्य समाज उभारण्यासाठी वाटचाल कशी करावी यादृष्टीने आज देशोदेशी प्रयत्न चालू आहेत. शिवाय समाजवादाची –  प्रत्येक नागरिकाचा जगण्याचा हक्क व लोकशाही हक्क मान्य करणारा समाज उभारण्याची गरज तर आजच्या "बळी तो कान पिळीच्या' जमान्यात जगातल्या कोटी कोटी श्रमिकांना तीव्रतेने जाणवत आहे.

साम्राज्यशाहीची मुसंडी : १९६५ पर्यंतचा काळ स्वातंत्र्यलढे आणि समाजसत्तावादाच्या वाढीचा होता. अर्थात त्याविरोधात १९१७ सालापासूनच साम्राज्यशाही राष्ट्रे युद्धे, षड्>यंत्री कारवाया आणि श्रमिकांमधील फाटाफूट यामार्गांनी सतत हस्तक्षेप करीत होती. १९४५ पासून नव्याने स्वतंत्र झालेले भारतासारखे वासाहतिक देश भांडवलशाही चौकटीतच पण आर्थिक विकासास शासकीय मदत देऊन प्रयत्न करत होते, त्यास मर्यादा येऊन ते बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या अधिकाधिक अंकित होऊ लागले. साम्राज्यशाहीची हुकूमत घट्ट होऊ लागली. बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या जगभरच्या मुक्त संचाराला १९९५ साली नव्या गॅट करारामार्फत "कायदेशीर' रूप देण्यात आले आणि त्याची फळे म्हणजे वाढती विषमता, वाढती गरीबी, शेतकरी, आदिवासी यांची निर्वाहसाधनांपासून फारकत आणि वाढत्या आर्थिक अरिष्टामुळे वाढते वांशिक, धार्मिक विद्वेष–विच्छेद. अमेरिका व बहूराष्ट्रीय कंपन्या करीत असलेले आर्थिक शोषण आणि सामाजिक व सांस्कृतिक आक्रमण एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला समाजसत्तावादी विचारप्रणालीच्या

रुपाने "नाहिरें'च्या हातात न्याय्य व समानतापर समाजनिर्मितीसाठी झगड्याचे जे हत्यार होते ते सोविएत विघटनामुळे बोथट झालेले अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये जगात धर्मवेडाने मुसंडी मारली.

अमेरिकेतील धर्मवाद : अमेरिकेसारख्या साम्राज्यशाही देशांमध्ये तेथील अत्यंत भ्रष्ट शासनाबाबत असंतोष आहे. डेमोक्रॅ$ट व रिपब्लिकन हे भांडवलशाही सत्ताधारी पक्ष सारखेच भ्रष्ट आहेत त्यामुळे जनतेपुढे पर्याय नाही. पर्यावरणवादी हिरवे पक्ष, स्त्रीवादी पक्ष असे काही पर्यायांचे प्रयत्न झाले; पण त्यांचा कार्यक्रम मर्यादित व अपुरा आहे. समाज–अर्थव्यवस्थेला, राजकीय व्यवस्थेला ठोस पर्याय त्यांच्याजवळ नाही, त्यामुळे त्या देशातील वैफल्य, चीड ही कोठेतरी धर्मवाद, आतंकवादाकडे ओढली जाते. यातून अमेरिकेतील ओक्लाहामा बॉंब हल्ला किंवा जपानमध्ये भूमिगत मार्गावर सरीन गॅस सोडण्याची दहशतवादी घटना घडतात. अमेरिकेत न्यूया ॅर्क–वॉशिंग्टनवर ११ सप्टेंबरला झालेले हल्ले हेही अमेरिकेतल्या आतंकवादीने केले असण्याची शक्यता आहे. अमेरिकन शासन अर्थातच तसे कबूल करणार नाही. अमेरिकेत स्पर्धा, स्वार्थ व पैसाकेंद्री भांडवलशाही समाजसंबंधांमुळे मानवी ओलावा, आतिथ्य, औदार्य नाहीसे होऊन व्यक्ती एकाकी पडलेल्या व म्हणून उध्वस्त झालेल्या आढळतात, माणसांवर विश्वास नाही म्हणून कुत्र्यामांजरावर प्रेमाचा वर्षाव करतात, केवळ संगणकाबरोबर जगतात, अमली पदार्थांच्या व्यसनात बुडतात, मानवी संबंधांचा पायाच नष्ट होत चालल्याने अमेरिकेमध्ये वैफल्य, विकृती व अतिरेकी कारवाया वाढत असलेल्या आढळतात.

साम्राज्यवादी देशांमध्ये समाजाने दुय्यम ठरवलेले किंवा समाज तुच्छतेने पाहातो असे अनेक गट आहेत. उदा. अमेरिकेत निग्रो, पोर्टोरीकन, अरब व अन्य आशियाई. गोऱ्यांकडून न्याय्य संधी नाकारली गेल्याने कोंडीत सापडून ते धर्माकडे व धर्मांधतेतून जिहादकडे वळल्याची उदाहरणे आढळतात. वासाहतिक काळात आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक साम्राज्यवादाखाली चिरडलेले मुस्लिम–अरब देश यातील शिकलेल्या तरुण पिढीला आजही अमेरिका– युरोपात स्थान मिळेल असे नाही. कारण गोऱ्यांच्या दृष्टीने ज्यू–ख्रिश्चन संस्कृती ही श्रेष्ठ, लोकशाही व उदारमतवादी आणि इस्लामी संस्कृती> आक्रमक, जुलमी धर्मवेडी, अमेरिका व युरोपीय देश आधुनिक प्रागतिक तर इस्लामी देश मागास, बुरसटलेले. ही तुच्छतापूर्ण दृष्टी तरुण हूषार मुस्लिम मुलांना समाजात स्थान नाकारते आणि मूलतत्ववादाकडे ढकलते. जे तस्कर किंवा चोर–गुंड बनायला तयार नाहीत, त्यांना धर्मवादात उदात्त व आदर्श जीवन दिसू लागते. भौतिक जगात संधी – स्थान नाकारल्याने ते काल्पनिक आदर्शाच्या मागे लागतात. भौतिक जगात त्यांना स्थान का मिळत नाही आणि ते मिळवण्यासाठी काय केले पाहिजे याविषयीचे विûलेषण धार्मिक विचारप्रणालीजवळ नाही. पण नास्तिकता, निधर्मीपणामुळे समाजात अनीती, अन्याय, अनाचार, भ्रष्टाचार बोकाळला आहे, खऱ्या धर्माकडे वळले तर आदर्श जग निर्माण करता येईल ही मांडणी कोठेतरी बुद्धिभ्रंश करते आणि त्या

नशेमध्ये आत्मबलिदानालाही ते तयार होतात.

परंतु आतंकवादी गटांमध्ये मुख्य भरती होते ती आजच्या अत्यंत विषम समाजामध्ये गरिबी व बेकारीत ढकलेल्या जगभरच्या तरुणांची. हे गरीब मुस्लिम तरुण भाकरीसाठी, अमेरिकी-सौदी पैशावर उभारलेल्या "जिहादी' शाळेत भरती व्हायला राजी होतात. पॅलेस्टाईनमध्ये इस्त्राएलने आक्रमण केल्यामुळे निर्वासित बनवलेली मुले, अफगाण निर्वासित, सौदी अरेबियातील भटक्या जमाती, सुदानमधील दुष्काळग्रस्त, पाकिस्तानमधील बेकार असे हजारो तरुण पोटासाठी "जिहादी' शाळेत जाऊन आतंकवादी कारवायात सामील व्हायला तयार होतात.

सांस्कृतिक आक्रमण : तंत्रविज्ञान व औद्योगीकरण याबरोबर पाश्चिमात्य संस्कृती व इंग्रची भाषेचे प्राबल्य जगभर वाढत गेले. इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांमुळे पाश्चिमात्य संस्कृतीचा अधिकच झपाट्याने प्रसार होत आहे. बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या वाढत्या आक्रमणाबरोबर नव्यानव्या वस्तू खेड्यातही पोचत आहेत. वस्तूंचा व त्यासाठी पैशाचा हव्यास वाढत आहे. परिणामी पारंपरिक सामाजिक मूल्ये, राजकीय ध्येयवाद, सांस्कृतिक रुढी-चालीरीती, कुटुंबव्यवस्था या सर्वांना धक्के बसत अहेत. जाहिरातबाजीमुळे अंधानुकरण बळावत आहे आणि तरुण पिढी स्वार्थकेंद्री व सामाजिक बंध-मुळे (ीीं) गमावलेली, दिशाहीन बनत चालली. त्यांच्यासमोर राजकीय आदर्श नाहीत कारण पुढारीवर्ग भ्रष्टाचारी व स्वार्थलोलुप आहे. अमेरिकी चंगळवाद, अनैतिकता, सामाजिक ऱ्हास इस्लामकडे वळून रोखता येईल म्हणून इराणमध्ये खोमेनीसारखे धार्मिक नेते पुढे आले. अमेरिकी विकृतीला "विशुद्ध इस्लामी राज्य' हा पर्याय मांडू लागले.

धार्मिक अस्मिता : आपल्या धर्माचे, जमातीचे अस्तित्व नाहीसे होईल या भयगंडानेही अतिरेकी धर्मवादी चळवळी आणि त्यातून आतंकवाद वाढलेला आढळून येतो. उदाहरणार्थ भारतामध्ये शीखसमाज लहान आहे. शिक्षण व पाश्चिमात्य संस्कृतीचा पगडा याखाली शीख धर्मकांड व पारंपरिक वेषभूषा तरुण नाकारू लागले तेव्हा धर्माच्या कर्मकांडाचा आग्रह आणि खलिस्तानच्या फुटिरता चळवळीमार्गे धर्माचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यातून भिंद्रनवालेंसारखे कर्मठ पुढारी उभे राहिले. अकालींना शह देण्याच्या राजकीय खेळीसाठी इंदिरा गांधींनी त्यांना हाताशी धरले आणि त्यांनी पुढे दहशतवादी चळवळ वाढवली. त्यामध्ये वैफल्यग्रस्त तरुण आकर्षित झाले व सुवर्णमंदिरातील लष्करी करावाईने मंदिर भ्रष्ट केल्याचा सूड घेण्यासाठी इंदिरा गांधींचा खून त्यांच्या शीख अंगरक्षकांनी केला आणि त्याचा सूड म्हणून दिल्लीत मोठ्या प्रमाणात शिखांची हत्या करण्यात आली हे धर्मवाद व राजकारण याच्या अभद्र युतीमधून घडले.

अशा रीतीने धर्म हा "तारक' म्हणून पुढे आला की त्यांचे स्वरूप कडवेच बनते आणि समाजाच्या अंगप्रत्यंगामध्ये त्याचा अंमल सुरू होतो. शासनसंस्था, कायदेकानून, शिक्षणसंस्था, सांस्कृतिक

आविष्कार, वेषभूषा, चालीरीती रुढी या सर्वात मध्ययुगीन किंवा प्राचीन समाजात ग्रंथित केलेले धर्मग्रंथ (मनुस्मृती, बायबल, कुराण) यांच्या आधारे धर्मांध पुढाऱ्यांनी प्रतिपादलेली जीवनपद्धती स्वीकारण्याचा आग्रह धरून आधुनिक समाजाला पुराणग्रंथात बंदिस्त करून प्रगती रोखण्याची जुलुमजबरदस्ती सुरू होते. अशा धर्मांध चळवळींच्या दृष्टीने एका बाजूला "धर्मनिरपेक्ष' शत्रू बनतात, तर दुसऱ्या बाजूला अन्यधर्मीय. त्यांच्या विरोधात धर्माची दहशत सुरू होते. यातून धार्मिक वितुष्ट वाढून दोन्ही धर्मातील जनता अधिकाधिक धर्मवेडी होऊन त्यांच्यातील वितुष्टाचे द्वेषात व द्वेषाचे रुपांतर हल्ले-युद्धे येथपर्यंत पोचते. भारतासारख्या बहूधर्मीय व बहूपंथीय परंतु हिंदू धर्मीय बहुसंख्य असलेल्या देशात इस्लाम धर्माच्या आधारे भारताची फाळणी होऊन पाकिस्तान निर्माण झाल्याने हिंदू-मुस्लिम धर्मवाद व जमातीय ताणतणावाचे प्रश्न विशेषच गुंतागुंतीचे बनलेेले आहेत.

शरियत : इस्लामी कायदा. कुरआन व हदीस - पारंपरिक चालीरीतींना धरून मुस्लिम पंडितांच्या एकवाक्यतेतून शरियतची निर्मिती. त्याची व्याप्ती व व्यवहार धर्मपंथानुसार ठरते.

हदीस : इस्लामी स्मृतीग्रंथ - महंमदांच्या परंपरा व उक्ती व कृतींचे संकलन.

वहाबी : अब्दुल वहाब (१७०३-१७८७) हा संस्थापक. अल्लाखेरीज काही पूजनीय नाही. कुराण व सुन्ना यावर आधारलेले नाही ते स्वीकारू नये असा मूलतत्ववादी पंथ. सय्यद अहमद (१७८६) यांनी वहाबी पंथ भारतात आणला.

सूफी : (सूफ = फाटकीतुटकी लोकरी वस्त्रे) अध्यात्म व विरक्तीचा ध्यास, पवित्र व शुद्ध साधे जीवन अशा सूफी संतांनी बंधुता व प्रेमाचा संदेश देऊन जनमानसात स्थान मिळवून धर्मप्रसार केला. पीर = सूफी संत

मदरसा : कुराण, हदीस, शरियत असे इस्लामचे शिक्षण देणाऱ्या शाळा. धार्मिक शिक्षणाबरोबर इतरही शिक्षण कमी-जास्त प्रमाणात दिले जाते. मदरसा सामान्यत: मशिदींना जोडून असतात.

## ५. भारतातील धर्म व राजकारण

थोडेसे ऐतिहासिक : भारतामध्ये इस्लाम धर्म सर्वप्रथम मलबारमध्ये अरब व्यापाऱ्यांच्या मार्फत आला. उत्तर हिंदुस्थानात तुर्की, अफगाण व मुघल बादशहांच्या राजवटी स्थापन झाल्यावर व त्यांच्या स्वाऱ्यांबरोबर इस्लामी राजांची संस्थाने दक्षिणेपर्यंत पसरल्यावर मुस्लिम लोकसंख्या देशभर पसरली. त्यामध्ये परकीय मुस्लिम मोजकेच होते. पण भारतामध्ये मुख्यत: जाती व्यवस्थेने अस्पृश्य ठरवून मानवी स्थानच नाकारलेले शूद्रअतिशूद्र मोठ्या संख्येने आणि राजाश्रयाने मानस्थान मिळवण्यासाठी काही वरिष्ठ जातीमध्ये काही प्रमाणात धर्मांतर झाले. त्याबरोबर इस्लाम धर्म आणि संस्कृती यांचा एतदेशीय संस्कृतीशी मेळ होऊन एक संकरित जीवनपद्धती विकसित झाली. संगीत, शिल्पकला, वास्तुकला, भाषा, साहित्य, पाककला, तत्वज्ञान, शासनपद्धती या सर्व क्षेत्रात हा मिलाफ आढळतो. मोउनुद्दिन इब्न अरबी या सुफी संताने एकात्मतेचा सिद्धांत (वाहदात–अल वाजूद) मांडून वैश्विक भावाचा विचार विकसित केला. जात–वंश श्रेष्ठत्व वादाचे मिथक उघडे पाडणारा हा मौलिक  विचार लोकप्रिय झाला. सूफी संतांची शिकवण व भक्तीमार्गाचा स्वीकार भारतीय कष्टकऱ्यांनी केला. अनेक वंश, पंथ, धर्म, विचार–आचार यांच्या शेकडो वर्षाच्या सरमिसळीने आणि देवाणघेवाणीने भारतीय संस्कृती विविधतापूर्ण आणि समृद्ध बनलेली आहे. मुस्लिम धर्मामध्येही सूफी पंथापासून देवबंदीपर्यंत अनेक प्रवाह आहेत. विविध धर्मपंथातील कष्टकरी जनता एकोप्याने नांदत होती. परंतु उच्चवर्णीय, सत्ताधारी व धर्मगुरू मात्र आपली सत्ता टिकवण्याच्या हेतूने धार्मिक कडवेपणाचा आसरा घेत. तरी जमादवाद – हिंदू–मुस्लिम तेढ ही पोसली ब्रिटिश राज्यकर्त्यांयनी आपली सत्ता टिकवण्यासाठी आणि त्यातून जमातवाद फोफावला.

जमातवाद : जमातवादाचा उदय पाश्चात्य साम्राज्यशाही देशांनी लादलेल्या वसाहतवादातून व धर्मावर आधारित राष्ट्रवादाच्या कल्पित सिद्धांतातून झाला. यासाठी पाश्चिमात्य इतिहासकारांनी इतिहास व संस्कृती याकडे धर्माच्या दृष्टीतून पाहाण्याची पद्धती मुद्दाम रुजवली. हिंदुस्थानातील हिंदू व मुस्लिम धर्माच्या वरिष्ठ  व मध्यमवर्गीय घटकांचे जमातीकरण १८५७ नंतर सुरू झाले. तोवर हिंदू मुसलमानांची कप्पेबंद विभागणी नव्हती. औरंगजेबच्या सेनेचे नेतृत्व मिर्झाराजे जयसिंग तर शिवाजीच्या तोफखान्याचे नेतृत्व इब्राहिमखान गार्दी करू शकत होते. पठाणांचे घोडदळ मोगल सेनेवर चाल करताना किंवा मराठे सरदार एकमेकांविरुद्ध लढताना धर्म आडवा येत नव्हता. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदू व मुस्लिमांची मिश्र गंगा–जमुना संस्कृती विकसित झाली होती. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी मोठ्या प्रमाणात मौलवींची कत्तल केली. म्हणून १८८० साली मौलाना महंमद कासीम साहाब नानतोईनी देवबंद (उत्तर प्रदेश) येथे दार–उल–उलूम या मदरशाची स्थापना केली. ख्रिस्ती मिशनरी व आर्य समाज इस्लामवर कडाडून हल्ले करीत होते त्याचे खंडन हजरत मिर्जा गुलाम अहमद कादीयानी (पंजाब) अनेक

ग्रंथ लिहून केले. एकमेकांच्या धर्मावर व धर्मपुरुषांवर बिनबुडाचे, अवमानकारक आरोप करण्यास मज्जाव करणारा कायदा करावा अशी १८९५ साली व्हाईसरॉयना विनंती केली. परंतु ब्रिटिश पुरे जाणून होते की, हिंदू–मुस्लिम दुही ही त्यांचे साम्राज्य टिकवण्यास पायाभूत आहे. त्यामुळे दोन्ही धर्मांच्या उच्चवर्गीयांना आलटूनपालटून हाताशी धरून वितुष्ट वाढवण्याचे राजकारण ब्रिटिश खेळले. त्यातून आर्यसमाज, हिंदू महासभा (१९१६), राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (१९२५) या कडव्या हिंदूत्ववादी संघटना तर हिंदुत्ववादाच्या "शुद्धीकरणा'च्या चळवळीला प्रतिकार करण्यासाठी तबलीक जमातीची (१९२८) स्थापन झाली.जनाब महंमद इलियास यांनी तबलीक जमातचा पाया घातला. मुसलमानांचे धार्मिक शुद्धीकरण व नैतिक–अध्यात्मिक विकास हे तबलिकचे उद्दीष्ट. भारतातील बहूसंख्य मुस्लिम हे कारागीर व अस्पृश्य जातीतून धर्मांतर झालेले व अन्य हिंदू समाजाबरोबरच राहाणारे असल्यामुळे अनेक पारंपरिक चाली–रीती पाळणारे, गावच्या सणउत्सवात भाग घेणारे होते. त्यांना नमाज व इतर इस्लामी विधी शिकवून विशुद्ध मुसलमान बनवण्याची मोहीम तबलिक जमातीने सुरू केली. त्यासाठी मोठे मेळावे संघटित केले. स्वयंसेवकांचे जथे गावोगावी पाठवले. विशिष्ठ प्रकारची वेशभूषा, भाषा यातून वेगळ्या "अस्मिते'चा आग्रह सुरू झाला. इस्लामची शिकवण – समानता, बंधुभाव यावर भर न देता धर्माचार, दैववादावर भर दिल्याने समाज सनातन व अगतिक बनला. हिंदू संघटनांचा मुस्लिमविरोधी प्रचार आणि तबलिक जमातीची अलगतावादी भूमिका यातून समाजातील पारंपरिक सलोखा, सामंजस्य बिघडू लागले. अशा अविश्वासाच्या वातावरणात धर्मांधांनी बुद्ध्या "अफवा' पसरवून धार्मिक दंगली माजवण्यास आरंभ केला व जमातीय वितुष्ट वाढवले. तरीही १९२८ साली कलकत्त्याला सर्वपक्षीय परिषदेत जीनांनी आवाहन केले की, ""आपण सारे एकाच भूमीचे पुत्र आहोत. आपण एकत्र रहायला हवे. हिंदू व मुसलमानांच्या एकीविना हिंदुस्थान प्रगती करू शकणार नाही.'' परंतु हिंदुत्ववाद्यांनी जीनांच्या समझोत्याच्या प्रस्तावास विरोध केल्याने ते मुस्लिम लीगबरोबर गेले.

हिंदुस्थानची फाळणी : हिंदू व मुस्लिम पुढारी, उच्च पदस्थ नोकरशहा, जमीनदार, लष्करशहा या सर्वांनाच सत्तास्थाने पटकवण्यासाठी हिंदू मुस्लिम सवतासुभा निर्माण करणे आकर्षक वाटू लागले. मुस्लिम लीगने १९४० साली पाकिस्तानची मागणी केली तरी त्यांना मुस्लिम बहूसंख्य असलेल्या प्रदेशांचे राज्य व भारताचे संघराज्य(ल–षशवशीरींळ) असे स्वरूप अनुस्यूत होते. पण हिंदुत्ववाद्यांनी भारताची फाळणी अशी ओरड सुरू केली. भारताचे विभाजन साम्राज्यशाही राष्ट्रांना फायद्याचे असल्याने ब्रिटिशांनी ती उचलून धरली व त्यातून पाकिस्तानचा जन्म झाला. धर्माच्या आधारे पाकिस्तानचा जन्म झाला खरा परंतु पंजाबी लष्करशाहांच्या हूकमतीखाली दडपलेली पूर्व पाकिस्तानची बंगाली जनता बंड करून उठली व १९७१ साली बंगलादेश स्वतंत्र झाला. बलुचिस्तान व पख्तुनिस्तानची स्वायत्ततेची मागणी आहेच. एवंच धर्म हा

राष्ट्राचा आधार बनू शकला नाही. भारताने स्वातंत्र्यापासून आपले बहूधर्मीय स्वरूप कायम राखण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि म्हणूनच भारतभर विखुरलेले लाखो मुस्लिम  व अन्यधर्मीय व निधर्मी लोक भारतामध्ये आत्मसन्मानाने जगू शकत होते.

संघ परिवाराचे धर्मवादी राजकारण : केवळ सत्ता मिळण्यासाठी भारतीय जनता पक्ष धर्माचा राजकीय वापर करून आहे.१००० वर्षांपूर्वी मूठभर मुस्लिम स्वारी करून, आपसामध्ये सतत लढाया–स्पर्धेमध्ये गुंतलेल्या येथील राजेरजवाड्यांना पराभूत करून भारतात साम्राज्य स्थापन करू शकले व सुमारे ५०० वर्षे भारतातील कमीअधिक मुलखाचे ते बादशहा राहिले, हा इतिहास उकरून हिंदूंमध्ये अपमानाची भावना व बदल्याची भावना पद्धतशीरपणे पोसण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. खरेतर, भारतीय समाजाला दुभंगणाऱ्या, विस्कळित, विकलांग करणाऱ्या जातिव्यवस्थेमुळे परकीयांना सहज आक्रमणे करून राज्य स्थापन करणे शक्य झाले. परंतु जातिनिर्मुलनासाठी झटण्याऐवजी चिरफाळलेल्या हिंदू समाजात मुस्लिम द्वेष चेतवण्याचे प्रयत्न सुरू केले.

शिक्षण, सण, उत्सव आणि प्रसारमाध्यमातून हिंदूंच्या धर्मांध संघटना मुस्लिमद्वेष आणि कडव्या हिंदुत्ववादाचा प्रसार करतात. आजच्या वास्तवतेचे भान न राखता गतइतिहासातच जनतेला बुडवायचे, त्यातच अस्मिता शोधायची आणि सत्ताकारणासाठी धर्माचा वापर करायचा यामध्ये प्रत्येक धर्मातील पुढाऱ्यांचे व धर्मगुरुंचे हितसंबंध गुंतलेले आहेत. भाजप व अन्य हिंदुत्ववादी पक्षामार्फत भारतातील मुघल साम्राज्याबाबत कल्पितकथा प्रसृत केल्या जाऊन भावना चेतवून बाबरी मशीत पाडण्यात आली आणि तेथे राममंदिर उभारून बदल्याचे समाधान मिळवण्याचा प्रयत्न आहे. भारतामध्ये या उच्चजातीय–उच्चवर्णीय पक्षाला मर्यादित पाठिंबा होता. हिंदूंमधील कनिष्ठ जातींमध्ये पाय रोवल्याविना सत्ता बळकावणे शक्य नव्हते, म्हणून संघ परिवाराने धर्माचे अवडंबर माजवले. आदिवासींना हिंदूधर्मीय बनवणे, महंत, साधू यांना उत्तेजन, धर्म संसदेची स्थापना, शिक्षण व प्रसारयंत्रणेतून धर्माचा पगडा वाढवण्यासाठी पद्धतशीर योजना आणि मंदिर बांधणीसारखे प्रश्न तापवून भावना चेतावून हिंदू धर्मांधता वाढवण्याचा प्रयत्न चालू आहे. अल्पसंख्य मुस्लिम, शीख, ख्रिश्चन यांच्या विरोधात प्रचार, प्रसंगी त्यांच्यावर हल्ले, दंगे असा धर्माचा राजकीय वापर करून धर्मांधता पोसली जात आहे.

"हिंदूराष्ट्र' आणि हिंदूमताच्या जोरावर राज्यसत्ता काबीज करण्याचा पद्धतशीर डाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, भारतीय जनता पक्ष, आदी संघ परिवारातील संघटनांनी रचला. १९८४ सालच्या "धर्म–संसदे'मध्ये यामागील संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. या विचारधारेप्रमाणे हिंदू धर्मियांमध्ये धर्माचार्य व त्याचे अनुयायी समाजाचे नेतृत्व करतील. मठ व मंदिरे वस्तीवस्तीमध्ये स्थापून ती सामाजिक एकत्रीकरण, संपत्ती गोळा करून पुरोहित, व्यवस्थापक यांचे शिक्षण करतील व आध्यात्मिक (!)

उन्नतीसाठी कर्मकांड व विधीनिषेधाचे तसेच नैतिक शिक्षण समाजाला देतील. मठ, मंदिरे शासकीय यंत्रणेवर प्रभुत्व ठेवतील. संस्कृत ही राष्ट्रभाषा केली जाईल. थोडक्यात मध्ययुगीन चर्च–पोप–फादर या धर्तीवर हिंदूधर्माचे संघटन करून भारत हे "हिंदूराष्ट्र' करण्याची भा.ज.प.ची मनिषा आहे. धर्माचे साऱ्या समाजावर व शिक्षणावर वर्चस्व स्थापन करून वैज्ञानिक दृष्टिकोण, विवेकदृष्टी, याचे उच्चाटन करून काळाचा प्रवाह उलटा फिरवण्याचा प्रयत्न आहे. त्याचा प्रत्यय म्हणजे रामजन्मभूमी हा श्रद्धेचा प्रश्न आहे, त्याबाबत वस्तुनिष्ठ ऐतिहासिक पुरावा गैरलागू, न्यायालये त्याबाबत निर्णय घेऊ शकत नाहंीत, ही भाजपची भूमिका किंवा इतिहास शिक्षणातून सत्यस्थितीदर्शक व वास्तववादी इतिहास पुसून टाकून वैदिक विज्ञान व समाज याबाबत भ्रामक मिथके प्रसृत करण्याचा प्रयत्न.

भाजप देशांतर्गत$हिंदूराष्ट्राभिमानाची टिमकी वाजवतो, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेची खुशमस्करी करतो. भा.ज.प.ला पाठिंबा देणारे भांडवलदार, व्यापारी, उच्चवर्णीय व उच्चवर्गीय यांचा अमेरिकी कंपन्यांचा अनुनय करून आपले नफे टिकवण्याचा प्रयत्न आहे. तर मध्यमवर्गाचे डोळे अमेरिकी "स्वर्गाकडे' आहेत. अमेरिकेलाही निमूटपणे आज्ञा पाळणारा भाजपसारखा प्रतिगामी पक्ष आपला हस्तक म्हणून सोयीस्कर वाटतो.

भाजपचा अमेरिकानुनय : अमेरिकेची "मर्जी' संपादण्यासाठी भाजपने आटापिटा चालू केला. १९९८ साली पोखरणला अणुबॉबस्फोट करून भारताला पी–५ मध्ये (अण्वस्त्रधारी पाच राष्ट्रे) सामील करून घ्या म्हणून भाजपने अमेरिकेची मनधरणी केली. पण झाले उलटेच. भाजपच्या चाचणी स्फोटानंतर १५ दिवसात पाकने अणुबाँब चाचणी स्फोट केले व भारतीय उपखंडात अण्वस्त्रे पसरल्याने अमेरिकेने भारत व पाकिस्तान दोघांनाही तंबी देऊन आर्थिक व तंत्रज्ञान विषयक निर्बंध लादले. महाशक्ती बनण्याचे भाजपचे स्वप्न उधळले गेले. कारगिल संघर्षाच्या वेळी पाकिस्तानला दहशतवादी म्हणून अमेरिकेने जाहीर करावे असा भाजपने प्रयत्न केला. पण अमेरिकेने पाक व भारत दोघांनाही सबुराईचा सल्ला दिला.

आर्थिक गुलामगिरी : सत्तेवर आल्यापासून भाजप अमेरिकेचा अनुनय करीत राहिला. आर्थिक क्षेत्रात मोठे किफायतशीर विमा क्षेत्र व दूरसंचार क्षेत्र ही परकीय कंपन्यांना खुली केली. २००० व २००१ मध्ये आयातीवरील सर्व राशीबंधने उठवून शेती व उद्योगांवर गंडांतर कोसळवले. वनस्पती पेटंट कायदा संमत करून वनस्पतीसंपदेवरचा हक्क गमावला. फायदेशीर सार्वजनिक उद्योगांची धूमधडाक्याने विक्री चालवून सरकारचे उत्पन्नाचे मोठे साधन नष्ट करून बहूराष्ट्रीय व बड्या भारतीय कंपन्यांची सरबराई केली. परकीय कंपन्यांच्या दबावाखाली कामगार–कायदे बदल करून कामगारांच्या हक्कांवर गदा आणणारी धोरणे स्वीकारली. वीज क्षेत्राचे खाजगीकरण करून अर्थव्यवस्थेचा कणा मोडण्याचे भाजप आघाडीने ठरवले. अमेरिकी बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या वजनाखाली, दडपणाखाली जाज्वल्य देशाभिमानी(?) भाजप अशी

देशविरोधी धोरणे रेटली.

राजकीय खुशामत : १९९८ साली अमेरिकेच्या केनिया व टांझानिया येथील वकिलातीवर बॉंब हल्ले झाले ते निमित्त करून अमेरिकेने सुदान व अफगाणिस्तानवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. त्याला भाजप शासनाने पाठिंबा दिला. अमेरिकेचा युद्धखोरी क्षेपणास्त्र कार्यक्रम (Nरींळरश्र चळीीळश्रश Dशषशलश डूीीशा) उचलून धरला. इस्त्राएलशी दोस्ती व लष्करी क्षेत्रात सहकार्य वाढवले. अमेरिका व इस्त्राएलचे शस्त्रसामथ्र्य, व "बळी तो कानपिळी' ही विचारप्रणाली भाजप उचलून धरतो. आक्रमतेत, युद्धखोरीत पुरुषार्थ मानतो. म्हणूनच अलिप्ततावादी धोरण स्वीकारून विकसनशील देशांशी सहकार्य करण्याऐवजी वंशवादी, युद्धखोरी राष्ट्रांचा अनुनय करून त्यांच्या पंक्तीला जाऊन बसण्याच्या धडपडीला लागला. ११ सप्टेंबरचा न्यूयाॅर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाल्या रात्रीच वाजपेयींनी बुशना पत्र लिहून दहशतवाद यापुढे कधी यशस्वी होऊ नये म्हणून हाती घेण्याच्या आंतरराष्ट्रीय मोहिमेत अमेरिकेबरोबर भागीदारी करण्यासाठी भारत उत्सुक असल्याचे कळविले. १३ तारखेला सुरक्षा प्रश्नांवरील मंत्रीमंडळाच्या समितीने आपल्या बैठकीत ठरवले की अमेरिकेला अफगाणिस्तानविरुद्धच्या लष्करी कारवाईत सर्वतोपरी सहकार्य व भारतातील सर्व सुविधा उपलब्ध करून द्यायच्या. एवढे लांगुल चालन पुरेसे नाही म्हणून की काय दिल्लीमध्ये युद्धाला विरोध करणारी पत्रके वाटल्याबद्दल सहा समाजवादी विद्याथ्र्यांयना अटक केली. अमेरिकी मालावर बहिष्कार, अमेरिकाविरोध हा "राष्ट्रद्रोह' ठरवून आपल्या "इमानी'चे प्रदर्शन भाजपने केले.

भारताने एवढा अनुनय केल्यानंतर पाकिस्तानच्या गळ्यातील माळ काढून अमेरिका ती आपल्या गळ्यात घालेल आणि आपण अमेरिकेच्या बरोबरीने लष्करी कारवाईत भागीदार होऊ अशा स्वप्नरंजनात भाजपचे नेतृत्व होते. प्रत्यक्षात अमेरिकेने पाकिस्तानच्या गळ्यात घातली आहे ती माळ नसून तो गळफास आहे याचेही भान भारतीय सत्ताधारी भाजप नेतृत्वाला राहिले नाही. मुशर्रफना बुशचा हूकूम सुटला की पाकिस्तानने लागतील त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या. वास्तविक पाकिस्ताननेच सी.आय.ए.च्या मदतीने तालिबान जन्माला घातले. आणि अफगाणिस्तानमध्ये सत्ता काबीज करायला व ती टिकवायला सर्वतोपरी साहाय्य केले. त्यामध्ये पाकिस्तानचा आपमतलब होता. परंतु त्याच तालिबानविरोधात व मुस्लिम जनतेवर हल्ले करण्यासाठी पाकिस्तानने मदत देणे हे अर्थातच पाकिस्तानमधील अनेक लष्करी अधिकारी, मुल्ला–मौलवी व जनतेला मान्य नव्हते. पण अमेरिकेच्या हल्ल्याच्या भयाने व आर्थिक मदतीच्या आशेने मुशर्रफने होकार भरला.

११ सप्टेंबरनंतर जागतिक दहशतवादाविरोधात अमेरिकेसमवेत लढण्याच्या बढाया मारत भाजपने भारतातील शासकीय दडपशाही वाढवण्यास आरंभ केला. २५ ऑक्टोबरला पोटो (झीशvशींिळ ष ढशीीीळी‍ जीवळरलश) जारी करून २३ संघटनांवर बंदी घातली. काश्मीरमधील इस्लामी संघटना, सिमी आणि

माओवादी संघटना यांचा त्यामध्ये समावेश होता. अर्थात बजरंगदल, वंदे मातरम्, शिवसेना यासारख्या हिंदू आतंकवादी संघटनांना आपला दहशतवाद चालू ठेवण्यास भाजपचा आशीर्वाद! कारण भाजपला मुस्लिम दहशतवादाला लक्ष्य करून हिंदुत्ववादी राजकारणाची पोळी भाजून घ्यायची आहे. पाकिस्तानातील सत्ताधारीही देशातील जनतेला आपल्याबरोबर ठेवण्यासाठी भारतद्वेष जागृत ठेवून आहेत. ते निमित्त पुढे करून भारतातील हिंदुत्ववादी धार्मिक द्वेष–भावनांना खतपाणी घालून आहेत. ही चाल भारतीय जनतेच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे.

गुजरातमधील हत्याकांड> : भाजपचे हितसंबंध मूलतत्ववाद जोपासण्यात आहेत. बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेच्या स्वयंसेवकांच्या पुढाकाराने आणि भाजप शासन व पोलीस यांच्या सहकार्याने गोध्रा अग्निकांडाचे कारण पुढे करून २८ फेब्रुवारी २००२ पासून गुजरातमध्ये पद्धतशीरपणे महिना–दीडमहिना मुस्लिमांचे हत्याकांड संघ परिवाराने केले. बेकारीने उध्वस्त झालेल्या तरुणांना धर्मवादाच्या नावाने नरसंहार व बलात्कार अशा अमानुष कृत्यांना उद्युक्त करायचे आणि मुस्लिमांना नेस्तनाबूत करायचे असे अत्यंत क्रूर व बेजबाबदार सत्ताकारण भाजप खेळले. कारण त्यामुळे मूलभूत आर्थिक प्रश्नातून श्रमिक जनतेला धार्मिक वादंगामध्ये गुंतवून ठेवता येते आणि जनतेत जेवढी फूट तेवढी राज्यकर्त्यांयना जनतेची लूट व पिळवणूक करायला मोकळीक मिळते.

२००२ च्या मार्चमध्ये गुजरातमध्ये भाजपने केलेल्या क्रूर हत्याकांडानंतर गुजरातचा बदला म्हणून २ डिसेंबर २००२ रोजी घाटकोपर, ६ डिसेंबर – मुंबई सेंट्रल, २७ जानेवारी २००३ – विले पार्ले, १३ मार्च २००३ – मुलुंड आणि २५ ऑगस्ट २००३ – गेटवे ऑफ इंडिया व जव्हेरी बाजार असे दहशवादी हल्ले मुंबईमध्ये झाले. ११ जुलै २००६ रोजी संध्याकाळच्या ऐन गर्दीच्या वेळी ६.२४ ते ६.३५ च्या दरम्यान अकरा मिनिटांमध्ये माटुंगा–माहीम–वांद्रे–खार–जोगेश्वरी–बोरिवली–मीरा रोड असे सात बॉम्बस्फोट मुंबईच्या लोकलगाड्यांच्या पहिल्या वर्गात घडवून आणले गेले. त्यामध्ये सुमारे २०० मृत्युमुखी व ७०० वर प्रवासी जखमी झाले. एवढ्या भीषण प्रसंगीही जखमींना रुग्णालयात हलवण्यासाठी व मृतदेह बाहेर काढण्यासाठी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता जनतेचे हजारो हात पुढे आले. १६ जुलैला मुंबईकरांनी ""शांतता व एकी'' चा पुकार करत, मदतीचे आव्हान देत मोठ्या संख्येने ""पीस मार्च'' काढला. दंगल, घबराट व अराजक माजवणे हा दहशतवादी हल्ल्याचा हेतू मुंबईकरांनी सफल होऊ दिला नाही. दहशतवाद्यांना पराभूत केले.

मुंबईमधील हल्ल्याला उत्तर दिले गेले, ८ सप्टेंबर २००६ रोजी मालेगावमध्ये. त्यादिवशी नवापुरा बडा कब्रस्तानातील सुलेमानी मशीद परिसरात नमाज संपण्याची वेळ गाठून तीन बॉम्बस्फोट घडवण्यात आले. त्यात ३७ ठार व १५० हून अधिक जखमी झाले. या घटनेनंतर जखमींना वाचवण्यासाठी हजारो हात

सरसावले. हिंदु व मुस्लिम धर्मांधांचे हिंसक हल्ले चालू असले तरी या मागील कटकारस्थानाबाबत जनता जागरूक बनत आहे. ही प्रगल्भता वाढवण्यासाठी एका बाजूला व्यापक शिक्षण व प्रबोधनाची चळवळ, परस्पर संबंध व सामंजस्य वाढवायचे प्रयत्न  व दुसऱ्या बाजूला सर्व धर्मपंथातील श्रमिकांचे आर्थिक प्रश्न एकच आहेत आणि आपली लूट करणारे भारतीय राज्यकर्ते व साम्राज्यशहा हे आपमतलबासाठी मूलतत्ववाद वापरत आहेत, दहशतवाद पोसत आहेत, यामध्ये आपण गुंतलो तर मूळ प्रश्नावरील आपली जूट दुभंगते हे लक्षात घेऊन आपली संघटित एकजूट बांधणे गरजेचे आहे.

अमेरिकेचा डाव :  अमेरिकेने पुकारलेल्या दहशतवादविरोधी युद्धाचा एक हेतू भारतीय उपखंडात पाय रोवून साम्राज्यशाहीचा पगडा अधिक घट्ट करण्याचा आहे. अफगाणिस्तानमध्ये बाहूली सरकार बसवून व तेथे लष्करी तळ ठोकून रशिया व चीनवर जरब बसवण्याचा प्रयत्न आहे. काश्मीरला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या बहाण्याखाली काश्मीर भारतापासून विभक्त करून तेथे बाहूली सरकार स्थापन करून चीन, भारत व पाकिस्तान यावर अमेरिकेला वचक ठेवायचा आहे. ही कूटनीती ओळखून काश्मीर प्रश्नी अमेरिकेला हस्तक्षेप करण्याची अजिबात संधी मिळणार नाही तर त्या प्रश्नावर काश्मिरी जनता, भारत व पाकिस्तान यांनी विचार विनियमाने तोडगा काढण्याचा, समेट घडवण्याचा प्रयत्न चालू ठेवला पाहिजे.

काश्मीरचा प्रश्न  : १९४७ साली हिंदुस्थानची फाळणी होऊन बहूसंख्य मुस्लिम लोकसंख्या असलेला प्रदेश पाकिस्तानखाली आला. परंतु ७७% मुस्लिम जनता असलेले पंजाबला संलग्न जम्मू-काश्मीरचे भवितव्य मात्र संस्थानांचे सामिलीकरण ब्रिटिशांनी संस्थानिकांवर सोपवल्याने अनिर्णित राहिले. जम्मू-काश्मीरचे हिंदू संस्थानिक हरिसिंग यांनी १५ ऑगस्टपर्यंत सामिलीकरणाबाबत निर्णयच घेतला नाही. नॅशनल कॉन्फरन्सच्या नेतृत्वाखाली काश्मिरी जनता राजेशाही व जमीनदारीपासून मुक्ती आणि नंतर सार्वमताने सामिलीकरणाचा निर्णय यासाठी झगडत होती. पूंच भागातील लोकलढ्याची सप्टेंबर १९४७ मध्ये हरिसिंगने क्रूर दडपशाही केली. दरम्यान सरहद्द प्रांतातील टोळ्या व हरिसिंगचे अनेक सैनिक पूंच लढ्याला सामील होऊन त्यांनी श्रीनगरच्या दिशेने आगेकूच सुरू केली. हरिसिंगचा पाडाव होण्याची वेळ आल्याने त्याने भारताकडे धाव घेतली व सामिलीकरणाच्या (रललशीीळ) करारावर सह्या केल्यावर भारतीय सैन्य काश्मीरमध्ये उतरले. ३१ डिसेंबर १९४७ रोजी पाकिस्तानच्या आक्रमणाविरुद्ध भारताने सुरक्षा मंडळात तक्रार गुदरली. सुरक्षा मंडळाने ठराव केला, की पाक सैन्य व घूसखोर काश्मीरमधून काढावे, भारतीय सेना मागे घ्यावी आणि युनोच्या देखरेखेखाली सार्वमत घ्यावे. परंतु पाकव्याप्त काश्मीरमधून पाक सेना मागे गेली नाही. उर्वरित काश्मीर, लडाख, जम्मू भारतात सामील झाले. भारतीय घटनेमध्ये खास कलम घालून (३७०) जम्मू -काश्मीर राज्याला स्वायत्त दर्जा देण्यात आला. परंतु जनसंघाची ३७० कलम रद्द करण्याची १९४८ पासून मागणी आहे. कॉँग्रेसनेही काश्मीरवर वर्चस्व गाजवण्यासाठी

काश्मीरमध्ये राजकीय हस्तक्षेप व स्वायत्ततेचा संकोच करत नेला. १९६५ साली व १९७१ सालच्या युद्धात पाकने काश्मीरमध्ये मुसंडीचा प्रयत्न केला पण जनतेचा पाठिंबा नसल्याने त्यांच्या कारवाया फोल ठरल्या.

पाकव्याप्त काश्मीरमध्ये तरुणांचे प्रशिक्षण व घूसखोरीचे प्रयत्न १९४८ पासून चालू आहेत. पण काश्मिरी जनतेला कडव्या इस्लामी पाकिस्तानमध्ये सामील व्हायचे नाही तर भारतात राहून स्वायत्त दर्जा व आर्थिक विकास साधायचा आहे. परंतु या दोन्हींबाबत परिस्थिती उत्तरोत्तर खालावत आहे. १९८७ च्या निवडणुकीच्या धक्कादायक निकालांमुळे जनतेचा निवडणूकीवरचाही विश्वास उडाला. परिणामी असंतोष वाढून आतंकवादाने मूळ धरले. त्याबरोबर केंद्र शासनाची दडपशाही, काळे कायदे, लष्कर, एस्.आर.पी.ची जुलूम–जबरदस्ती यामध्ये सामान्य जनता भरडून निघू लागली. हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाली. १९८९ साली दहशतवादी कारवायांमुळे सुमारे ३ लाख काश्मिरी पंडितांवर काश्मीर सोडायची वेळ आली. काश्मिरी जनतेला आपली संस्कृती, भाषा, अस्मिता राखून स्वायत्त लोकशाही सुराज्य – शांतता, सुसंस्कृतता हवी आहे. पण भारत व पाकिस्तान येथील राज्यकर्त्यांयच्या राजकीय डावपेचांपायी काश्मीरचा प्रश्न अनिर्णित ठेवला गेला आहे. काश्मीरची स्वायत्तता राखून काश्मीरचा प्रश्न तेथील विविध प्रवाहांना बरोबर घेऊन पाकिस्तानसमवेत संवाद साधून सोडवला तर काश्मिरी जनता आतंकवाद व लष्करशाहीच्या कात्रीतून सुटेल आणि भारतीय उपखंडातील जमातीय तणाव कमी करण्यासही ते विशेष मदतकारक होईल. जम्मू–काश्मीरमध्ये परिस्थिती अत्यंत नाजूक आहे हे लक्षात घेऊन ती सामंजस्याच्या मार्गानेच हाताळली पाहिजे. अन्यथा अमेरिकेच्या कारवायांच्या सापळ्यात अडकण्याचा धोका आहे.

भाजपच्या लोकविरोधी आर्थिक धोरणांमुळे २००४ च्या निवडणुकीत भाजप आघाडी पराभूत होऊन काँग्रेस आघाडी केंद्रांमध्ये सत्तेवर आली. पण अमेरिकेचा अनुनय, अमेरिकेबरोबर लष्करी व आण्विक करार आणि लोकविरोधी आर्थिक धोरणे रेटणे काँग्रेस आघाडीनेही चालू ठेवले आहे. यामध्ये देशाचे व जनतेचे मोठे नुकसान आहे. ही धोरणे आमूलाग्र बदलण्यासाठी श्रमिकांची व्यापक एकजूट संघटित करणे नितांत गरजेचे आहे.

आशियातील सहकार्य : भारत हा दक्षिण आशियातला सर्वात मोठा देश आहे. भारतामध्ये या प्रदेशातील सर्व धर्म, पंथ, संस्कृती आहेत आणि भारताची सर्वसमावेशक परंपरा आहे. अलिप्तवादी धोरणाचा वारसा आहे. परंतु भारताने केलेली दहशतवादाला मदत (श्रीलंकेतील तामीळ), काश्मीरच्या स्वायत्त स्थानाला दिलेला धक्का आदी कारणांमुळे भारत प्रादेशिक वर्चस्व गाजवतो अशी भावना शेजारी देशात आहे. सामंजस्याने वादग्रस्त प्रश्न (चीनबरोबरचा सीमाप्रश्न, काश्मीरप्रश्न) सोडवण्यात भारताने पुढाकार घेतला आणि शेजारी राष्ट्रांशी मैत्री व सलोखा वाढवण्यासाठी सांस्कृतिक, वैचारिक, आर्थिक

देवाण–घेवाण वाढवली तर या प्रदेशातील सहकार्य वाढण्यास त्याची मदत होणार आहे. त्याबरोबर भारताचे देशांतर्गत धोरणही निधर्मी व सामंजस्याचे हवे. व्यापक एकजूट बांधण्यासाठी पश्चिम मध्य व दक्षिण आशियाई देशांतील परस्पर –संवाद व सहकार्यापासून प्रारंभ करणे समुचित होईल कारण हा प्रदेश आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या एक आहे आणि या अनुबंध व परस्परावलंबित्वाला चार हजार वर्षांचा इतिहास आहे. भारताचे ग्रीस, इराण, मध्य आशिया, चीन, आग्नेय आशिया यांच्याबरोबर घनिष्ट व्यापारी संबंध होते आणि या व्यापारी मार्गाने बौद्ध धर्माचा या प्रदेशामध्ये प्रसार झाला. सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचे प्रसारक देशोदेशी पाठवले. आणि मध्य, दक्षिण आशिया व चीन बौद्ध धर्माखाली आले. आंतरराष्ट्रीय व्यापारी मार्गावर ठिकठिकाणी स्थानिक राज्याच्या मदतीने लेण्या, बुद्धविहार व मठ उभारलेले होते. राजकीय दृष्ट्या  मात्र साम्राज्याच्या सीमा सतत बदलत्या होत्या. मौर्य सम्राटांच्या अमलाखाली काश्मीर व पूर्व अफगाणिस्तान होता. तर कुशाणांचे साम्राज्य मध्य आशिया, अफगाणिस्तान व उत्तर भारतात होते.

आर्थिक दृष्ट्या पाहाता या भूभागातील खनिज संपत्ती, वन व कृषी संपत्ती आणि जलसंपत्ती परस्पर पूरक आहे. त्याचे एकत्रित संयोजन केले तर या भूप्रदेशाचा स्वयंनिर्भर विकास साधता येईल. इतिहास काळात बौद्ध धर्माखाली आलेला हा प्रदेश पुढे मुस्लिम व ब्रा÷णी धर्म–पंथात विभागला गेला तरी सांस्कृतिक चलनवलन व अभिवृत्तीत खंड पडला नव्हता.

या समरसतेला तडा गेला तो ब्रिटिश व रशियन झारच्या साम्राज्यशाही कारवायांमुळे. रशियन झारने मध्य आशियाई राज्ये आपल्या वर्चस्वाखाली आणली व ब्रिटिशांनी भारतीय उपखंडात पाय रोवले. पख्तूनस्तानची डुरांट रेषेने कृत्रिम फाळणी करून ब्रिटिशांनी निम्मे पख्तूनस्तान वायव्य सरहद्द प्रांतात (ब्रिटिश भारत) सामील केले. अफगाणिस्तानवर वर्चस्व स्थापण्यासाठी युद्धे केली. हिंदुस्थान–ब्र÷देश–सिलोनमध्ये साम्राज्य स्थापन केले तरी अनेक संस्थाने अर्धस्वायत्त ठेवली. साम्राज्य चालवणे सुकर करण्यासाठी हिंदु–मुस्लिम वैमनस्य पोसले जाईल अशी धोरणे राबवून त्या दुफळीतून अखेर १९४७ साली इस्लाम बहूसंख्य असलेल्या प्रदेशाचे पाकिस्तान निर्माण झाले. इस्लामी पाकिस्तानमधून १९७१ साली बांगला देश स्वतंत्र झाले. धर्म हा राष्ट्राचा पाया करण्याचा प्रयत्न फोल ठरला. काश्मीरचा प्रश्न अनिर्णित ठेवण्याची खेळी अँग्लो अमेरिकनांनी खेळली. आपापले हितसंबंध राखण्याच्या खेळीत भारत–पाक राज्यकर्त्यांयनी काश्मीर प्रश्नांची गुंतागुंत वाढवली. अमेरिकेने पाकिस्तानमधील लष्करशहांना हाताशी धरून भारत–पाक संघर्षाला टेकू दिला. अण्वस्त्रनिर्मिती केल्यानंतर भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रांतील तणाव हा जीवन–मरणाचा प्रश्न बनला आहे. हे वास्तव लक्षात घेऊन भारतीय उपखंड, अफगाणिस्तान व मध्य आशिया यांच्यातील राजकीय समीकरणे नव्याने मांडण्याची गरज निर्माण झाली आहे.

श्रीलंकेपासून नेपाळपर्यंत आणि म्यानमारपासून अफगाणिस्तान–ताजिकिस्तान–तुर्कमेनियापर्यंत सारे

देश आर्थिक अरिष्टात अडकलेले आहेत, वंश–धर्म, विद्वेषाने चिरफाडले जात आहेत. येथील राज्यकर्ते अमेरिकेच्या अर्थ–राजकारणाच्या सारीपटावरची प्यादी बनली आहेत आणि जनतेची ससेहोलपट वाढत आहे.

आजचे खरे प्रश्न काय? राममंदिर, कृष्णमंदिर की साऱ्यांना रोजीरोटी? हिंदु–मुस्लिमांचा धार्मिक दुरभिमान व अमेरिकन साम्राज्यशाहीचा एकसुरी$ बाजारी संस्कृतीत सारे जग आवळण्याच्या पिसाटपणामुळे समाज चिरफाडला जातो आहे. यातून स्वार्थ साधला जातो आहे तो बहूराष्ट्रीय कंपन्यांचा व भारत–पाक–नेपाळ–अफगाण–उझबेक आदी राज्यकर्त्यांयचा.

जनतेने ही राजकीय खेळी नाकारली पाहिजे. मध्य व दक्षिण आशियामध्ये स्वायत्त राष्ट्रके आणि या राष्ट्रकांचे बहूसत्तात्मक राष्ट्रककुल (ल–षशवशीरींळ) स्थापन व्हावे या दृष्टीने त्यामध्ये आर्थिक–सामाजिक–सांस्कृतिक आदान–प्रदान सुरू होणे गरजेचे आहे. यासाठी आपला इतिहास, संस्कृती, आर्थिक प्रश्न याचा अभ्यास, साहित्य, कला याची देवाणघेवाण, शास्त्रज्ञ, कलावंत, विचारवंत यांची संमेलने, आर्थिक सहकार्याच्या शक्यतांचा अभ्यास, शैक्षणिक, शास्त्रीय सांस्कृतिक पातळीवर संयुक्त संवादपीठे अशा विविध उपक्रमांद्वारा जवळिक साधणे, सामंजस्य वाढवणे व मैत्रीसंबंध निर्माण करणे याबाबत आपण पुढाकार घेऊ शकतो. हा प्रदेश अजून कृषीप्रधान आहे त्यामुळे कृषीप्रधान अर्थ–समाज व्यवस्थेतील मूल्ये– अतिथ्य, औदार्य, अगत्य, सौहृद ही पैसाकेंद्रित बाजारी व्यवस्थेखाली अजून पुरी चिरडली गेली नाहीत. जागतिकीकरणाच्या नावाखाली बाजाराचा अंमल सर्वदूर पक्का करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. त्यात येथील राज्यकर्ते सामीलही झाले आहेत. पण हा हल्ला रोखून आपण समानतावादी, स्वायत्त, स्वयंनिर्भर कृषी–उद्योग व विकेंद्रित नागरी विकासावर आधारित अर्थव्यवस्था स्थापण्याचा पर्याय स्वीकारला तर आपली बहूरंगी, बहूपदरी संस्कृती आपण टिकवू शकू. सर्वांना ताठ मानेने चांगले जीवन व मानवी संबंध स्थापन करू शकू.

मध्य व दक्षिण आशियाई जनतेने आपली वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती व विकासाचा मार्ग चोखाळण्यासाठी एकजूट बांधत असतानाच व्यापक जागतिक पातळीवरील श्रमिकांबरोबर साम्राज्यशाही, दहशतवाद व जमातवाद याविरोधी लढतीतही सहभागी होणे महत्त्वाचे आहे.

साम्राज्यशाही शोषण : शोषणावर आधारित भांडवलशाही व्यवस्थेमुळे बहूराष्ट्रीय कंपन्या नफेखोरीसाठी जगाची साधनसंपत्ती उधळत आहेत. शस्त्रास्त्र उद्योग, दारु–सिगरेट आदी व्यसने या उद्योगात मोठ्या प्रमाणात नफा पटकावता येतो. तर जनतेच्या गरजा भागवणारे अन्नधान्य, निवारा, शिक्षण यामध्ये नफा सुटत नाही. म्हणूनच संहारी व घातक उद्योगात मोठी गुंतवणूक आहे. १९९६ साली अमेरिकेचा लष्करी खर्च २६५८२ कोटी डॉलर , तर इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, इटलीचा १८५३३ कोटी डॉलर, म्हणजे

या सहा देशांचा एकूण लष्कारी खर्च १८ लक्ष कोटी रूपये होता. साम्राज्यशाही बड्या सहा राष्ट्रांनी शस्त्रास्त्र–लष्करी खर्चात फक्त वीस टक्के कपात केली तर तेवढ्या रकमेमध्ये जगातल्या ५० कोटी जनतेला उपासमारीच्या कात्रीतून सोडवता येऊन मलेरिया, क्षय, देवी निर्मूलन व आवश्यक आरोग्यसेवा पुरवून चांगले जीवन जगता येईल. अर्थात यासाठी पूर्व अट म्हणजे बहूराष्ट्रीय कंपन्या करीत असलेली या देशांची लूट व उध्वस्तीकरण थांबवून तेथील जनतेच्या गरजेनुसार त्यांच्या सहभागाने विकास साधणे, तथाकथित "मदत योजनांद्वारे' नाही.

१९९६ मध्ये जागतिक धान्याचे उत्पादन २०५ कोटी टन म्हणजे दरमाणशी वर्षाला ३६० किलो धान्य उत्पादन झाले होते. प्रामुख्याने धान्यावर आधारित मुख्यत: शाकाहारी (भारतातील आहाराप्रमाणे) आहारासाठी प्रतिवर्षी दरमाणशी सुमारे २०० किलो धान्याची गरज आहे, तर अमेरिकेच्या अतिमांससेवी आहारासाठी ८०० किलोग्रॅम धान्य खर्ची पडते. जगातल्या धान्य उत्पादनातले सुमारे ३५ टक्के धान्य जनावरांना पोसण्यासाठी वापरले जाते. अमेरिकेमध्ये दरमाणशी सरासरी दररोज ३१७ ग्रॅम मांस खाल्ले जाते. मांसाहारामध्ये ६५ ग्रॅम मांससेवन पुरेसे आहे.

जागतिक पातळीवरील संपत्तीचा व उत्पन्नाचा विचार केला तर आढळून येते की जगाचे वार्षिक दरडोई उत्पन्न सुमारे दोन लाख रुपये आहे. एवढ्या उत्पन्नामध्ये अखिल जगातल्या जनतेला चांगले जीवन जगता येईल. २०१० च्याही जागतिक लोकसंख्येला चांगले जीवन जगता येईल. पण जगातले ८२ % उत्पन्न आहे पुढारलेल्या औद्योगिक देशांच्या ताब्यात, तर जगातल्या ८०% जनतेला फक्त १८ % उत्पन्न मिळते. जगातल्या सर्वात श्रीमंत २२५ कुटुंबांच्या ताब्यात १०१५ अब्ज डॉलर म्हणजे प्रत्येकी सुमारे ४.५ अब्ज डॉलर किंवा २१५ अब्ज रुपये संपत्ती केंद्रित आहे. यापैकी ६० अमेरिकेतील, २१ जर्मनीतील १४ जपानमधील आहेत. श्रीमंत देशांमध्येही गरीब लोकसंख्या आहेच. अमेरिकेमध्ये तळाच्या २०% लोकांना देशाच्या एकूण उत्पन्नाच्या केवळ ५ % उत्पन्न मिळते. हे तळचे २०% गरीब लोक प्रामुख्याने निग्रो किंवा पोर्टोरिकन, चिनी, कोरियन, मेक्सिकन आहेत. ते गरीब आहेत ते शोषणावर आधारित अर्थव्यवस्थेमुळे.

उधळपट्टीची जीवनशैली व नफेखोरी उत्पादन व्यवस्था बदलून जगातल्या साधन–संपत्तीचा विनाश, युद्धखोरीखाली लाखोंचा बळी थोपवून सर्व जनतेला चांगले जीवन मिळवून देणे, प्रत्येक नागरिकाला ताठ मानेने, निर्भयपणे व आत्मसन्मानाने जगता येणे अशी न्याय्य व्यवस्था करणे शक्य आहे. दहशतवादाशी मुकाबल्याच्या लढ्याचा हा अविभाज्य भाग आहे.

श्रमिकांची एकजूट> : जगातल्या सर्व श्रमिक जनतेने धर्म–वंश–पंथभेद बाजूला ठेवून जागतिकीकरणाच्या बुरख्याखाली साऱ्या जगाची बहूराष्ट्रीय कंपन्यांनी जी लूट चालवली, त्याविरोधात जूट बांधण्याची गरज आहे. युरोपमधील जनताही या लढ्यात उतरत आहे हे आपणास जी–८ व जागतिक

व्यापार संघटनेविरुद्ध सिएटल, वॉशिंग्टन, जुनुआ येथे झालेल्या उग्र निदर्शनातून दिसून आले. अमेरिकेविरोधी लढ्याला मुस्लिम विरुद्ध बिगर मुस्लिम असे स्वरूप न येता साम्राज्यशाही शक्ती, बहूराष्ट्रीय कंपन्या व त्यांनी मुठीत ठेवलेली विकसनशील देशातील सरकारे विरुद्ध जगभरची श्रमिक जनता असेच लढ्याचे स्वरूप आले पाहिजे.

धार्मिक मूलतत्ववादाला खतपाणी घालून वांशिकवाद वाढवून साम्राज्यशाही शक्ती या श्रमिक जनतेत फूट पाडून आपले वर्चस्व टिकवून आहेत. या सापळ्यात आपण फसता कामा नये. देशोदेशीची धर्म–संस्कृती–विचार–आचार भिन्नता ही तर मानवी जीवनाला विविधता व रंगत देते. ती समजून घेऊन, त्याचा आदर करून फक्त स्वधर्मीय, स्वजातीय आपले आणि "पर'–"दुसरे' म्हणजे शत्रू ही मानसिकता बदलण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी परस्परसंवाद, सांस्कृतिक अभिसरण वाढवून संशयाचे, अविश्वासाचे वातावरण दूर करायला हवे. आपल्या देशातील विविध भाषिक, जातीय, धर्मीय तसेच आपल्या शेजारी देशातील अन्य धर्मीय नागरिक या सर्वांबरोबर सुसंवाद व मैत्री जोपासण्याची गरज आहे. २१ व्या शतकातील आपणापुढचे हे मोठे आव्हान आहे. विविध भाषा, धर्म, जाती यामध्ये वितुष्ट वाढण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे बहूराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते आक्रमण व त्यामुळे वाढत जाणारी बेकारी. त्यामुळे श्रमिकांमध्ये स्पर्धा निर्माण होते. त्यातून वितुष्ट व तेढ वाढते. तेव्हा बहूराष्ट्रीय कंपन्या, खाजगीकरण, जागतिकीकरण विरोधीचा लढा आणि आपल्या देशातील साधनसंपत्तीचा देशातील जनतेच्या किमान गरजा भागवण्यासाठी व सर्व प्रौढांना अर्थपूर्ण रोजगार मिळेल अशा स्वायत्त व स्वयंनिर्भर विकासासाठीचा लढाही पुढे नेला पाहिजे. सामाजिक पातळीवरील भेदाभेद व अन्याय, सांस्कृतिक पातळीवरील आपपरभाव आणि आर्थिक पातळीवरील स्वातंत्र्याचा व स्वयंनिर्भर विकासाचा लढा हातात हात घालूनच आपणास पुढे नेला पाहिजे. हे ऐतिहासिक आव्हान आपण स्वीकारले तरच अमेरिकेची साम्राज्यशाही हूकुमत रोखता येईल आणि दहशतवादाला मूठमाती देता येईल.

निवडक संदर्भ :


1. Kwame Nkrumah, *Neo - Colonialim, The Last Stage of Imperialism*, International Publishers, 1965
2. Ahmed Rashid, *Taliban*, Yale University Press, New Haven, 2000
3. Kurt Kohbeck, *Holy War, Unholy Victory, Eyewitness to CIA's Secret War in Afganistan,* 1993
4. Said K. Aburish, *The Rise, Corruption and Coming Fall of the House of Saud*, St. Martin's, New York, 1994
5. Haim Bresheeth and Nira Yuval Davis (Ed) *The Gulf War and the New World Order,* Zed, London, 1991
6. D.R. Elston, *Israel*, Oxford University Press, 1963
7. Illan Pappe (Ed), *The Israel / Palestine Question : Rewriting Histories*, Routledge, 1999
8. Vijay Prashad, *War Against the Planet*, Leftword, New Delhi, 2002
9. Benjamin Barber, *Jihad versus McWorld*, Ballatine, New York, 1996
10. Asghar Khan(Ed) *Islam, Politics and the State : The Pakistan Experience*, Zed, London, 1985
11. John L. Esposito, *The Islamic Threat : Myth or Reality*, Oxford University Press, 1998
12. Karen Armstrong, *Islam : A Short History,* Phoenix Press, London, 2001
13. A.G. Noorani, *Islam and Jihad*, Leftword, New Delhi, 2002
14. A.G. Noorani, *The RSS and the BJP : A Division of Labour*, Leftword, New Delhi, 2000
15. Tapan Basu, Et al, *Khaki Shorts, Saffron Flags*, Orient Longman, 1993
16. Manoj Joshi, *The Lost Rebellion, Kashmir in Nineties*, Penguin, New Delhi, 1998
17. Asghar Ali Engineer, (Ed) *Islam and Revolution*, Ajanta Publications, New Delhi 1984
18. S M Ikram, Ainslie T. Embree, *Muslim Civilisation in India*, Columbia University Press, New York, 1964
19. Sumit Sarkar, *Modern India, 1885-1947,* Macmillan India Ltd., 1995
20. Samuel P. Huntington,*The Clash of Civilization and the Remaking of World Order*, Penguin Books, 1997
21. *Monthly Review*, *Terror Crisis in Context*, Vol 53, No. 6, Nov.2001
22. *Frontline*, Chennai, *Outlook*, Mumbai, issues for months September 2001 to June 2002

२३. प्रदीप देशपांडे, काळोखाचे सांगाती, एकता, मुंबई, २००२

२४. राम पुनियानी, फाळणीच्या अंतरंगात, एकता, मुंबई, २००२

२५. राम पुनियानी, हिंदुत्ववादाचे राजकारण, एकता, मुंबई, २००२

26. *Bush in Babylon* : *The Recolonisation of Iraq*, Tariq Ali, Verso 2003, Left Word Books, New Delhi, 2006


पूरक साहित्य : १. सदर पुस्तिकेत सादर केलेले इतिवृत्त साररूपाने सचित्र> पोस्टर स्वरूपात उपलब्ध

ए-३ आकाराची १५ पोस्टर्स, २. इंग्रजी भाषेत चित्रफीत (व्ही.सी.डी.) उपलब्ध आहे.

**शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयाची निवडक प्रकाशने**

१. दास कापिटाल : सुबोध परिचय, सुहास परांजपे, १९८४, पृ.३९२, किं १००/– रु.

२. दुष्काळ–लोकवैज्ञानिक नियोजनाचा : सुलभा ब्रह्मे, १९९३, पृ.८४, किं २०/– रु.

३. कोकण विकासाची दिशा : १९९७, किं ५/– रु.

४. एन्रॉनचा दाभोळ वीजप्रकल्प–देशविकाऊ धोरणांचा अस्सल नमुना :'९७, किं ५/– रु.

५. गुजरातकांड : सुलभा ब्रह्मे, २००२, पृ.३२, किं. ५/– रु.

६. ठंडा मतलब ... : २००६, पृ.१६, किं.५/–रु.

७. तोड तरुणा, तोड ही चाकोरी : २००६, पृ.२४, किं.५/– रु.

धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी प्रबोधनमाला :

१. बेरोजगारीचे अनर्थशास्त्र : २०००, पृ.३२, किं.१०/–रु.

३. अणुयुद्धाचा भस्मासुर : हिरोशिमा ते भारत–पाक : सुलभा ब्रह्मे, पृ. २४, किं. ५/– रु.

४. अस्वस्थ शतकाच्या कविता : पृ्‌  ११२, २०००, किं. ८०/– रु.

५. महागाई कशामुळे वाढते? : सुलभा ब्रह्मे, २०००, किं.१०/– रु.

६. अंधेर नगरी, एन्रॉन राजा : सुलभा ब्रह्मे, २०००, किं. ५/– रु.

७. पोलादाला चढले पाणी : (कादंबरी) : पृ.११२, २०००, किं.२५/– रु.

८. वाढत्या लोकसंख्येची भीती कोणाला ? : सुलभा ब्रह्मे, २००१, पृ.४८, किं.१०/– रु.

९. एन्रॉनचे गौडबंगाल : अभय मेहता, २००१, पृ.९६, किं. ३०/– रु.

१०. गॅट करार, पेटंट कायदा : सुलभा ब्रह्मे, २००१, पृ.४८, किं. १०/– रु.

११. खाजगीकरणाचे मृगजळ : सुलभा ब्रह्मे, २००१, पृ.६४, किं. १५/– रु.

१२. खरे दहशतवादी कोण? : सुलभा ब्रह्मे, २००२, किं. १०/– रु.

१३. कृष्णकारस्थान – वीज मंडळाच्या खाजगीकरणाचे : सुलभा ब्रह्मे, किं. १०/– रु.

१४. कूबाचा झुंजार क्रांतिलढा : २००२, पृ.८०, किं. २५/– रु.

१५. स्पार्ताकुस (कादंबरी) : २००२, पृ. ९६, किं. ६०/– रु.

१६. साम्राज्यशाही – जागतिकीकरणाचा खरा चेहरा : सुलभा ब्रह्मे, पृ. ८०, किं. २०/– रु.

१७. सार्वजनिक तेलव्यवस्थेचा विध्वंस : सुलभा ब्रह्मे, २००३, किं. १०/– रु.

१८. हिंदु–मुस्लिम तणाव आणि भारतीय एकात्मता : २००३, पृ.६४, किं.१५/– रु.

१९. इराक – झुंज सैतानी साम्रज्यशाहीशी : सुलभा ब्रह्मे, २००४, पृ.३२, किं.१०/– रु.

प्रथम आवृत्ती : १५ ऑगस्ट २००२, द्वितीय आवृत्ती : १५ ऑक्टोबर २००६

मुखपृष्ठ> :मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, २/१४, मारवा, अनुपम पार्क, कोथरुड, पुणे २९.

प्रकाशक–मुद्रक : सुलभा ब्रह्मे, ब्रह्मे ग्रंथालय, १२९ ब/२, एरंडवणे, पुणे ४.

मुद्रण स्थळ : श्री मुद्रा, पुणे ३७.